# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १४-९-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक १४ सप्टेंबर २०१५ रोजी (का.प.क्र.०७) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-०० वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.प्रकाश महाजन, आयएएस नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
स.स. श्री. खान जहाँगीर मुलानी
स.स. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
स.स. श्री. जाधव बन्सी ग्यानू
स.स. श्री. वाघमारे रुपचंद लक्ष्मण
स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
स.स. सौ. रोजतकर पुष्पा उत्तमराव
स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
स.स. श्री. सुरे सीताराम इसराम
स.स. सौ. स्वाती किशोर नागरे
स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
स.स. श्री. खान अय्युब म.हुसेन खान
स.स. श्री. जाधव ज्ञानोबा पांडूरंग
स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
स.स. श्री. शेजवळ सुभाष सयाजी
स.स. श्री. रावसाहेब राधाकिसन आमले
स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
स.स. श्री. सय्यद मतीन रशीद
स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
स.स. श्री. सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
स.स. श्रीमती खरात सिमा गणपत

स.स. सौ. शोभा नारायणराव वळसे
स.स. सौ. ज्योती सुभाष पिंजरकर
स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
स.स. श्री.शिंदे राजु रामराव
स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
स.स. श्री. मकरंद माधवराव कुलकर्णी
स.स. श्री. खान इरशाद इब्राहिम
स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
स.स. श्री. एडके विकास प्रकाश
स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
स.स. श्री. भादवे रामेश्वर बाबुराव
स.स. श्री. बल्लाळ मनोज आसाराम
स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
स.स. श्रीमती  शेख समिना शेख इलियास
स.स. श्रीमती  पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
स.स. श्री. शेख जफर अखतर
स.स. श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
स.स. श्री. दांडगे शिवाजी भाऊसाहेब
स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
स.स. श्री. खैरे ऋषिकेश चंद्रकांत
स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
स.स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण

स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
स.स. श्रीमती बनकर विजया संजय
स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
स.स. श्री. जगताप भाऊसाहेब उत्तमराव
स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
स.स. श्री.सोहेल शकील शेख
स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
स.स. श्रीमती मिना रामदास गायके
स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
स.स. श्री.विकास रतनलाल जैन
स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.रेणुकादास वैद्य :प्राध्यापिका व प्राचार्य म्हणून काम केलेल्या एक चांगल्या लेखिका व शिक्षीका श्रीमती शोभाताई कोरान्ने यांचे नुकतेच निधन झाले श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.राजू शिंदे :स.श्री.गजानन बारवाल यांचे चुलते रामगोपाल चंदूलाल बारवाल यांचेही निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

यास स.श्री. दिलीप थोरात,श्री.राजेंद्र जंजाळ यांनी अनुमोदन दिले.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.
या वेळी स्व.शोभाताई कोरान्ने तसेच रामगोपाल बारवाल यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.राजगौरव वानखेडे :ई-मेल द्वारे विषयपत्रिका सदस्यांना मिळाली त्याबद्दल मा.महापौर व प्रशासनाचे अभिनंदन.

श्री.कैलास गायकवाड :अनुमोदन आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्त व नगरसचिव तसेच त्यांचे टिमचे सर्वाचे अभिनंदन करावे.

मा.महापौर :ई-मेल द्वारे विषयपत्रिका देण्यात येते चांगले काम होत आहे.नगरसचिव व त्यांचे टीमच्या सर्व कर्मचा-यांचे अभिनंदन.

श्री.राजेंद्र जंजाळ :हिन्दू धर्माचा पोळा सणाच्या दिवशी गाई बैल म्हशींना कोंडवाडयात एकत्रित आणून पुजा केली त्याबध्दल पशुसंवर्धन अधिकारी त्यांचे अभिनंदन.

**<u>विषय क्रमांक १२२:-</u>**

सोमवार दिनांक १३.०७.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०४) रोजीच्या विशेष सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.रेणुकादास वैद्य :इतिवृत्त पान क्र.११ वर राजनगर ऐवजी रानानगर अशी दुरूस्ती करून तेथे पाणी देण्याची व्यवस्था करावी. तसेच गिरीजादेवी हौसींग सोसायटीला लागून पाण्याचे टँकर भरले जाते तेथे संरक्षित भिंत व रस्ता समांतर एजन्सीकडून करून घेवू श्री.कोल्हे यांनी म्हटले होते कार्यवाहीचे आदेश करावेत.

श्री.गजानन बारवाल :पान क्र.१९ वर तीन दिवसात दुषित पाण्याचा प्रश्न सोडवणार होते अदयाप कामे केली नाही कामे करण्या बाबत आदेशीत करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :पान क्र.२६ वर ठरावातील क्र.१,२ नुसार सुचना केली ती कार्यवाही व्हावी टाक्या स्वच्छ करणे, वॉचमन देणे,पाणीपुरवठा सुरळीत करणे नवीन जल वाहिनी टाकणे या विषयी खुलासा अपेक्षीत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मागिल सभेत बीओटी प्रकल्प संदर्भात प्रश्न केले उत्तर मिळाले नाही सिडको मध्ये बांधकाम करतांना सिडकोची एनओसी घेतली का ?

श्रीमती सुरेखा सानप :पान क्र.६ वर ब्रिजवाडीत काही भागात तसेच उत्तरानगरी भागात २००० लोकसंख्या असतांना तेथे पाण्याची लाईन नाही.

श्रीमती समीना शेख :पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यत वसुलीची सक्ती करू नये व मनपाने वसुली करावी असे आदेश दिले असतांना दुस-या दिवशी

आयुक्त आदेश देतात की वसुली समांतरने करावी हा सभागृहाचा अवमान नाही का?

श्री.नासेर सिद्यीकी :सभेत चर्चा होऊन निर्णय होतात अंमलबजावणी होत नाही करारनाम्याची व लेआऊटची प्रत अदयाप दिली नाही.

मा.महापौर :ज्या सुचना सदस्यांनी मांडल्या त्या संदर्भात कार्यवाही करावी पाणी पट्टी वसुली समांतर एजन्सी करते का खुलासा करावा.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी:समांतर एजन्सीकडे पाईप इतर कोणतेही साहित्य नाही एन-५ येथील टाकीची लेव्हल येत नाही. एजन्सीला काम देऊन वर्ष झाले,पाणी पुरवठा सुरळीत होत नाही असे होत असेल तर कंपनीचे २५ टक्के रक्कम कपात करून दंड म्हणुन वसुल करावे. तीन महिण्यापासून पाईपची मागणी करतो मिळत नाही. अनेक भागात रात्री ११.०० वाजता पाणी येते. हे योग्य नाही.

श्री.राजू शिंदे :अभय योजनेचा विषय मंजूर केला तो ठराव विभागास गेला नाही. मंजूर झालेले ठराव त्या त्या विभागास दिले जावे.

मा.महापौर :सभागृहाचे निर्णय संबधीत विभागाकडे दिले जावे.

श्री.सिताराम सुरे :माझ्या वार्डात पाणीपुरवठा सुरळीत करावा २ महिण्यापूर्वी आदेशीत केले होते अधिकारी व लाईनमन येत नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :स.सदस्याचे सुचनांचे पालन व्हावे इतिवृत्त मंजूर करावे.

मा.महापौर :दुषीत पाणी येत असेल लिकिजेस असेल तात्काळ कामे करावी.सर्व सदस्यांना समांतर करारनाम्याची प्रत दयावी.

श्री.फिरोज खान :प्रत दिली त्यातील काही पाने गहाळ आहे.

श्री.गंगाधर ढगे :करारनाम्यातील १९ पाने गहाळ आहे. ती पाने कुठे गेली संबधीतावर कार्यवाही करावी. ४ महिण्यापासून माझ्या वार्डात पाणी येत नाही.

शहर अभियंता :करारनाम्याची मराठी व इंग्रजी प्रत सर्व सदस्यांना दिली दोन्हीमध्ये काही बदल शंका वाटत असेल समजावून सांगितले जाईल.

श्रीमती समीना शेख :लेआऊट व मुळ कन्सेशन ॲग्रीमेंन्टची प्रत कधी देणार आहे.

श्री.राजू शिंदे :दुरूस्तीसह मंजूर करावे.

मा.महापौर :शहरात दुषित पाणी येते ती व पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठीची कामे तातडीने करावी. स.श्री.ढगे यांचे वार्डात पाणी येत नाही त्या बाबतीत कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :अधिकाऱ्यांनी बैठक घेतली. पदाधिकारी यांची दादागिरी खपवून घेतली जाणार नाही बातम्या पेपरला येतात हे योग्य आहे का नागरीकांची कामे व त्या बाबतीत प्रश्नावर चर्चा करतो. अशा बातम्या येण्यापूर्वी सभागृहाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

मा.उपमहापौर : अधिकारी व पदाधिकारी नगरसेवक यांचा संघर्ष चालू असल्याचे बातम्या पेपरला येतात.आम्ही प्रश्न मांडतो उद्देश असा की नागरीकांची कामे व्हावी. अधिकारी यांना टारगेट केले जाते असा समज करून घेणे योग्य नाही ५० कोटी कराची वसुली केली जाईल श्री.झनझन यांनी

म्हटले ती वसुली केली नाही असे आम्ही बोलत असेल तर प्रेशराईज करीत आहोत असा अर्थ होत नाही. श्री.सिकंदर अली यांचेकडे बीओटीच्या प्रकल्पा विषयी प्रश्न केला. ११ प्रोजेक्ट आहे ९ चे काम प्रलंबीत का? त्या विषयी बोलले तर नियमबाह्य बोलतो किंवा दबाव आणतो असे नाही. पैशाचा योग्य उपयोग व कामाचे नियोजन व्हावे. कुत्रे पकडण्याचा विषय येतो तेंव्हा अधिकारी कर्मचारी व गाडया नाही वर्षानुवर्ष हीच उत्तरे मिळतात सुधारणा करणे अधिका-यांचे काम असते. जनतेचे प्रश्न सुटण्यासाठी सुचना करतो त्याचे पालन व्हावे आमच्यावर दबाव टाकतात असे सांगून अधिकारी यांनी वातावरण खराब करू नये आमच्या सुचनाचे पालन व्हावे.

श्री.रेणुकादास वैद्य :सदस्य पत्र देतात, माहिती मागतात, काहीच रिस्पॉन्स मिळाला नाही तर सभेत प्रश्न उपस्थित करतात. आम्ही वैयक्तिक काम सांगत नाही ज्याचे काम त्यांनी केले तर प्रश्न सुटतील आयुक्तांना खुष करण्यासाठी अधिकारी हे करीत असावेत त्यास रोखण्याची गरज आहे अधिकारी राजकारण करीत असेल तर अडचणी निर्माण होतील. आयुक्तांचे सुचनाकडे अधिकारी दुर्लक्ष करतात काम होत नसेल सुचना मांडली व ईगो जागा होत असेल तर योग्य नाही. चुकीचे काम होते खर्च होतो तेंव्हा आम्ही बोलतो, कुणाला टारगेट करण्यासाठी नाही अधिका-यांनी राजकारण करू नये. विकास कामे करावी.

श्री नंदकुमार घोडेले :एमजीपीकडे असलेल्या कांचनवाडी ,वेदांतनगर, एन-५ नागेश्वरवाडी येथील जागा अजूनही त्यांचेकडे आहे. मनपाने हस्तांतर ताब्यात का घेतल्या नाही? मनपाच्या मालकीच्या ते जागा देण्यास तयार आहे.

शहर अभियंता :योग्य प्रश्न आहे ४ जागा आहे.

मा.महापौर :एमजीपीकडे असलेल्या जागा मनपाकडे याव्यात..निर्णय घेतो, काय करावे करू नये विचार करतो सर्वानी एकमताने काम केले तर योग्य होईल सदस्याचे प्रश्न विषय, रस्ता, प्रकल्प संबधी असेल, माहिती मागितली तर दिली पाहिजे काही चुका होत असेल तर कबूल करायला पाहिजे. तशी दुरूस्ती करता येईल बीओटीचे १० प्रोजेक्ट चालू ९ थांबले. सदस्य प्रश्न करतात तर टारगेट करतात असे बोलणे योग्य नाही. कामे सुरू व्हावे उत्पन्न मिळावे ही भावना आमची आहे. ५० डीपी रस्त्याची मार्कींग करावी.सर्वानी एकत्रित काम करावे कायदयाची भाषा करू नये ज्या सुचना केल्या त्याबाबत कार्यवाही करून दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यात येते.

शहर अभियंता :मनपाच्या एमजीपीकडे जागा आहे तेथील स्कीमच्यावर खर्च पडलेला आहे १०० एमएलडीची स्कीम घेतली जागा सुध्दा हॅडवर्क करायला पाहिजे होत्या एमजीपीला १०-११ कोटी दयायचे ते समायोजन करावे अशी मागणी त्यांची होती समन्वयाने ते काम केले जाईल.

श्री.नंदकुमार घोडेले :या विषयी पत्रव्यवहार केला मा.महापौरांकडे बैठक झाली होती एमजीपीचे अधिकारी यांनी जागा देण्याचे कबूल केले.लगेच जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी.

शहर अभियंता : कार्यवाही सुरू करून जागा ताब्यात घेतल्या जातील.

कार्य.अभियंता (पापू) :स.श्री.रेणुकादास वैद्य यांनी केलेला प्रश्नानुसार समांतर एजन्सीला पत्र दिले आहे संरक्षीत भित करण्यात बाबत कळविले आहे.

श्री.फिरोज खान :माझ्या वार्डातील अतिक्रमण काढले नाही.

मा.महापौर :स.सदस्यांच्या वार्डात जाऊन अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी.

**ठराव:-**

सोमवार दिनांक १३.०७.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०४) रोजीच्या विशेष सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**प्रश्नोत्तरे**

मा.महापौर :प्रश्न सुरू करीत आहोत समाधानकारक प्रश्नाचे उत्तर मिळाले तर शक्यतो चर्चा होऊ नये.

प्रश्न क्रमांक १३३ :स.श्री. राजेंद्र जंजाळ

श्री.राजेंद्र जंजाळ :एअरटेल कंपनीला पावसाळयानंतर खोदकामाची परवानगी दिली पावसाळयातच खड्डे खोदून ठेवले काय कार्यवाही केली विचारले असता उत्तर नाही,प्रश्न दिला त्यावर उत्तर दिले की पावसाळयानंतर काम करावे कंपनीला कळविले परंतु कंपनीने नियमाचा भंग केलेला आहे दंडात्मक कार्यवाही का केली नाही.

शहर अभियंता :जून मध्ये परवानगी दिली मध्यंतरी दीड महिना पाऊस नव्हता त्यामूळे कंपनीने विचारल्यानंतर काम करण्यास तोंडी मुभा दिली. नंतर पाऊस आला काम बंद करण्यास सांगितले दुरूस्तीसाठी कपंनीने २.५३ कोटी भरले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :दंडात्मक कार्यवाही का केली नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :या संदर्भात मा.न्यायालयाने रिट याचिका दाखल करून घेतली व डायरेक्शन दिले पान क्र.२७ वर म्हटले हे काम कुणाला दिले ठेकेदाराचे नाव, किती महिण्यासाठी काम दिले काम करण्याची अंतिम तारीख हे बोर्डवर नमुद असावे काम झाल्यानंतर रस्ता पुन्हा जशाचा तसा करून दिला पाहिजे यानुसार काम होत नाही. पैसे एजन्सी देणार महापालिकेला फक्त काम करून घ्यायचे. अटी शर्तीमध्ये हे सर्व असते परंतु ठेकेदाराच्या बाजुचे धोरण अवलंबीले जाते हे करू नये करारनाम्यात काय आह? त्याप्रमाणे काम व्हावे. राणानगर येथे पाईप लाईन टाकली सर्व पेव्हर ब्लॉक खोदून काढले अजूनही ते काम केले नाही.

श्री.सय्यद मतीन :वार्ड २० मध्ये २०० फुट कॉक्रीट रस्ता खोदुन केबल टाकले तो अदयाप रस्ता दुरूस्त केला नाही.

| | |
|---|---|
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :एमजीएम सेन्ट्रल नाक्याजवळ दोन्ही रस्ते तोडून स्मशानभुमी पर्यत ड्रेनेज लाईन टाकली अशी कामे करतांना तेवढी परवानगी घेतली जाते का?यावर खर्च कोण करते. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :या संदर्भात मा.न्यायालयाचे आदेश आहे ते प्रशासनाला मिळाली असेल तर जाणूनबूजुन दुर्लक्ष करून मा.कोर्टाचा अवमान केला आहे. |
| शहर अभियंता | :मा.कोर्टाच्या सुचनेनुसार भविष्यात अंमलबजावणी होईल. |
| मा.महापौर | :कंपनीने भरलेले पैसे इतर कामासाठी वापरले जाते.ते होऊ नये. |
| शहर अभियंता | :यापूर्वी ३०-४० कोटी आले होते ते इतर कामासाठी खर्च केले आहेत. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :याचा अर्थ शहर अभियंता यांचे कन्ट्रोल नाही.आयुक्तांनी खुलासा करावा. |
| श्री.राजू शिंदे | :शहर अभियंता कार्य.अभियंता यांचे मार्फत बील दिले जावे. लेखा विभागातून परस्पर पैसे देऊ नये. |
| श्री.विकास जैन | :रिलायन्स कडून २०-३० कोटी घेतले ते पैसे तेथील कामासाठी वापरले पाहिजे टेंडर झाले पैसे नाही म्हणून काम करीत नाही.यासाठी स्वतंत्र अकाऊंट उघडावे. |
| मा.उपमहापौर | :कंपनीकडून पैसे घेतल्या नंतर तेथील काम करण्यासाठी वार्ड अधिकारी यांचेकडे काम दयावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :जेथे कंपनीचे लोक खोदकाम करतात कोणत्या कामासाठी खोदतात ते सदस्यांना माहिती मिळावी |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :नियमाचा भंग झालेला आहे.नकाशाची मागणी केली दिले नाही शिवाजीनगर पाण्याच्या टाकीजवळ खोदकाम केले कुणाचे यावर कन्ट्रोल नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :एन-१३ भागात जळगाव रोड खोदला परवानगी नव्हती. अनधिकृत काम करतात.नियमाचा भंग केला दंडात्मक कार्यवाही करावी. |
| श्री.विकास जैन | :काम सुरू करणेपूर्वी वार्ड अभियंता यांनी कंपनीला मार्कआऊट दिले पाहिजे. या कामासाठीचा फंड बाजूला न ठेवल्यामूळे कामे केली नाही. |
| मा.महापौर | :कंपनीने चुकीचे काम केले असेल तर दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे खोदकाम केल्यानंतर तेथे दुरूस्तीचे काम करून घ्यावे.स.सदस्य श्री.नाईकवाडी यांचे वार्डात कंपनीने खोदकाम केले तेथील पाहणी करून ते काम तातडीने करावे. |
| शहर अभियंता | :अशा माध्यमातून पैसे आले तर वेगळे अकाऊंट असावे.जुने कामे मनपा फंडातून करावे लागेल. |
| प्रश्न क्रमांक १३४ | :स.श्री.राजेंद्र जंजाळ |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी रोंड्रीग मशीन ४३.८४ लक्षमध्ये खरेदी केले.किती ठिकाणी उपयोगात आणले, वार्ड ब व क मध्ये मशीन वापरल्या असे म्हटले इतर प्रभागात का वापरल्या नाही मनपाचे यामूळे आर्थीक नुकसान झाले का? |

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :स.सदस्यांना माहिती दिली वार्ड ब व क व्यतिरिक्त इतर वार्डात सुध्दा या मशीनने काम केले तीही माहिती आज देण्यात येईल.

श्री.जंजाळ राजेंद्र :पुर्ण वार्डात मशीनद्वारे काम केले नाही चुकीची माहिती देत आहे. काम केले असते तर मशीन गंजल्या नसत्या आज रोजी पडून आहे, केबल तुटलेले दिसून येईल. पुर्वीचे सदस्य येथे आहे. पद्मपुरा भागात या मशीनचा प्रथमत: डेमो घेतला तेंव्हा मशीन मध्येच अडकली व काम झाल्याचे सांगीतले ड्रेनेज लाईन चोकअप झाली नंतर २६ लक्ष आपतकाली निधीतून खर्च करून ड्रेनेज लाईनचे काम ५-२-२ मधून केले हा निधी यासाठी वापरता येतो का? मनपाचे आर्थीक नुकसान होते तेंव्हा प्रशासनाची भुमिका काय असते.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :सध्या मशीन कार्यान्वीत नाही ड्रेनेज दुरूस्तीसह चोकअप काढण्याची निवीदा काढली २०१० पासून कामे सुरू होती कामाची यादी आहे.शहरात ५५० कि.मीटरचे वर्क आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :या मशीन परत कामात येणार नाही पुर्ण खराब झाल्या ५५० कि.मी.नेटवर्क असतांना ७-१० वर्षापासून या मशीन पडून असतील तर जो ड्रेनेज लाईनसाठी खर्च झाला मनपाचे नुकसान झाले ही जबाबदारी कुणावर येते.

श्री.सय्यद मतीन :वार्डात आनंदनगर येथील सोसायटीमध्ये ड्रेनेजचे पाणी वाहते मशीनची मागणी केली चार दिवस झाले श्री एम एम खान यांनी मशीन पाठविले नाही.त्यांना त्या विभागातून बदलावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :माहिती मागितली दोन वार्डाची दिली.त्यात गल्ली नंबर १०,११,१२ मध्ये काम केले व पुन्हा चौथ्या दिवशी ग.नं.१० मध्ये काम करावे लागते हे कितपत योग्य आहे.

श्रीमती वैशाली जाधव :माझ्या वार्डात साफसफाईसाठी एक वाहन व कर्मचारी आवश्यक आहे.ड्रेनेज लाईन खराब आहे ती दुरूस्त करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :मशीन कोणत्या निधीतून खरेदी केल्या.

शहर अभियंता :सहा वार्डात प्रत्येकी दोन मशीन होते.स.मोहन मेघावाले यांचे वार्डातील २५ लक्षचे १५-२० दिवस सतत या मशीनने काम केले.वेगळया डायमीटरच्या बकेटस् होत्या तेथे आजही करण्याची गरज नाही २-३ मीटरच्या रस्त्यामध्ये यामशीनने काम करता येत नाही. इतर शहरात या मशीनचा उपयोग होतो. सोलापूरच्या कपंनीला काम दिले होते. लहानशा कामासाठी ए-१ बी १ करावे लागते. लाईन टाकण्याचे वारंवार काम पडू नये. या उद्देशाने खरेदी केल्या होत्या, कुठे काम केले कसे केले लॉकबुक ई. चौकशी मुख्यलेखा परीक्षक यांनी केली होती. येथील दुरूस्तीचे काम कुणी करीत नसे,म्हणुन देखभाल दुरूस्तीचे काम सुध्दा एजन्सीला दिले २-३ वर्ष त्यांनी काम केले पेमेन्ट मिळाले नाही. सोडून दिले. आता पुन्हा संपर्क केला पेमेंन्ट वेळेवर दिले तर येऊ शकेल मशीन दुरूस्त करून वापरू शकतो.

| | |
|---|---|
| श्री.राजेंद्र जंजाळ | :कोणत्या निधीतून खरेदी केल्या माझ्या प्रश्न गांभीर्याने घेतला नाही मनपाचे नुकसान झाले की नाही. |
| शहर अभियंता | :यात मनपाचे आर्थीक नुकसान झाले नाही. |
| मा.महापौर | :मशीन दुरूस्त करून वापरू शकतो का?कंपनीला बोलवावे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :त्यात किर्लोस्कर मशीन पुर्ण गंजले लाईफ संपली ते मशीन चालू केल्या तर सहा जीप ओढण्यासाठी व वाहक नेमावे लागेल हा खर्च करू शकतो का याचा विचार मशीन खरेदी करतांना का केला नाही. १०वर्षापासून मशीन घेतो काम होत नाही नुकसान झाले. |
| शहर अभियंता | :हे मशीन मॅनवली ऑपरेटर आहे चालक लागणार नाही टेंडर काढतांना दुरूस्ती करणे व वर्षभर चालविले असे राहिल.यात मनपाचे नुकसान झाले नाही. जो खर्च होणार होता या मशीनमुळे वाचविला २५ लक्षचे काम स.मोहन मेघावाले यांचे वार्डात केले. |
| श्रीमती सिमा खरात | :स.श्री मेघावाले यांचेच वार्डातून मी निवडून आले कोणत्या सेक्टरमध्ये १७-१८ दिवस काम केले.पत्र दिले पाईप मिळत नाही. समाधानकारक उत्तर अधिकारी देत नसेल तर पगार कपात करावा. |
| शहर अभियंता | :७ वर्षापुर्वीचे हे प्रकरण आपण तेंव्हा सदस्य नव्हता. आपण जेटींग मशीन बद्दल बोलत आहात. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :ड्रेनेजचे मोठे काम चालू आहे विनंती की जल व मल निस्सारण वाहिन्या स्लम गुंठेवारी भागात बदलल्या पाहिजे् समांतर प्रस्ताव मंजूर करतांना अंतर्गत सर्व ठिकाणी जलवाहिन्या बदलल्या जातील असे स्थायी समितीच्या बैठकीत उल्लेख आहे.व दोन वेळेस हा निर्णय सभागृहानेही घेतला त्यानुसार कार्यवाही करावी.सर्व पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री मा.राज्यमंत्री श्री.रणजीत पाटील व मा.पालकमंत्री श्री कदम साहेब यांना या संबधी विनंती करावी.शासनाची मंजूरी साठी एक अधिकारी नियुक्त करावे. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :भुमिगत गटार गुंठेवारीमध्ये व्हावी. स्मार्टसिटी साठी हे करावे लागेल ६० टक्के गुंठेवारी भाग आहे. ठेकेदार काम करीत नाही त्यांना पेमेंन्ट दिले जात नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :सभागृहा बाहेर शहरातील प्रतिष्ठित महिला डॉक्टर आलेले आहे त्यांचे म्हणने ऐकून घ्यावे. |
| श्री.राजू शिंदे | :त्यांचे म्हणणे ऐकूण घेण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना पाठवावे. |
| मा.महापौर | :थोडया वेळाने सभा थांबविल्यानंतर सर्वांना बोलवून घेवू. |
| श्री.सितराम सुरे | :माझ्या वार्डात ड्रेनेज लाईन टाकण्यात येत नाही संबधीत अधिकारी यांचा चार्ज काढावा. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :गुंठेवारी स्लम भागात कामे करण्यासाठी राज्य शासनाकडून मान्यता घ्यावी. रोड्रींग मशीन खरेदी केल्यानंतर मनपाचे आर्थीक नुकसान झाले जे कुणी यामागे असेल त्या अधिका-यांवर मनपा अधिनियम १९४९ भाग |

५६ कलम २ ई प्रमाणे नुकसान झाले तर त्यांचे पगारातून ती नुकसान भरून काढावे अशी तरतूद आहे चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी.

मा.महापौर :पाण्याची व ड्रेनेजची सर्व भागात कामे व्हावी निर्णय घेतलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्व गुंठेवारी भागातही मल जल वाहिनी व्हावी ऐनवेळचा विषय देत आहे मंजूर करावा शासनाकडे पाठवावा.

(सभेच्या कामकाजानुसार येथे ऐनवेळचा विषय क्र. १७५ हा मंजुर करण्यात आलेला आहे. इतिवृत्तामध्ये शेवटी नमूद केलेला आहे.)

श्री.राजगौरव वानखेडे :अनुमोदन आहे.ज्या लाईन टाकलेल्या आहे त्या दुरूस्तीचे काम होत नाही. भुमीगत गटार योजनेत गुंठेवारीचा उल्लेख नाही आम्ही ती कामे बजेट मध्ये टाकू शकतो का?

श्री.विकास जैन :प्रशासनाने आतापर्यत काय कार्यवाही केली आहे.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :जो प्रस्ताव ठेवला अनुमोदन आहे.

श्री.रावसाहेब आमले :वार्ड १४,१५ मध्ये मिटमिटा ते पडेगाव पर्यंतचे ड्रेनेज लाइनचे भुमीगत गटार योजनेतून काम चालू होते आता बंद आहे.ते होणार नाही असे म्हटले जल व मल निस्सारण वाहिनीचे काम माझ्या वार्डात होत नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :गुंठेवारीमध्ये मल वाहिनी टाकल्या जातील असे संबधीत अधिकारी यांनी यापूर्वी म्हटले होते. अंमलबजावणी का होत नाही.

श्री.सिताराम सुरे :सिवरेज टॅक्स तसेच उपभोक्ता कर घेता तर ड्रेनेजची कामे का होत नाही.

श्री.भाऊसाहेब जगताप :ड्रेनेज व पाणी लाईन गुंठेवारी मध्ये टाकाव्यात.

मा.महापौर :रोड्रींग मशीन संदर्भात मा.आयुक्तांनी चौकशीचे आदेश संबधीत अधिकारी यांना दयावे या मशीन खरेदी करून महापालिकेचे नुकसान झाले की फायदा,किती व कुठल्या कामासाठी उपयोगात आले.चौकशी करावी.

मा.आयुक्त :या मशीन संदर्भात मुख्यलेखा परीक्षक यांचे मार्फत चौकशी करण्यात येईल त्यात दोषी असेल त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

प्रश्न क्रमांक १३५ :स.सदस्य श्री.राजेंद्र जंजाळ

श्री.राजेंद्र जंजाळ :गुटखा तंबाखू यात मोठया प्रमाणात प्लास्टीक वापर होतो त्यानुसार केंद्र शासनाने २०११ मध्ये प्लास्टीक हाताळणी धोरण जाहीर केले येथील प्लास्टीक उत्पादन यावर मनपाचे बंधन किती, मायक्रॉन जाडीचे, उत्पादन व रिसायकल कशी केली पाहिजे व नागरीकांना मोफत कॅरीबॅग देऊ नये असे सुध्दा नियमात आहे. याची सवय लागण्यासाठी मनपाने जनजागृती करणे आवश्यक होते.या संदर्भात प्रश्न विचारला होता उत्तर दिले नाही. त्रैमासिक अहवाल शासनाला पाठविला का? मा.न्यायालयाच्या आदेशाचे पालन होते का?मा.मुख्य सचिव यांनी सुध्दा मनपास पत्र दिले आहे या बाबत काय कार्यवाही केली माहिती दयावी.

श्री.गजानन बारवाल :अशा कच-याची योग्य प्रक्रिया करून विल्हेवाट करणार होतो काय कार्यवाही केली ?

घनकचरा कक्ष प्रमुख:स.सदस्यांना प्रश्नाचे उत्तर दिले आहे

श्री.राजेंद्र जंजाळ :गंभीर बाब आहे. वेळोवेळी मनपाकडून न्यायालयाचा अपमान होत आहे. मा.मुख्य सचिव यांनी सुचना करून कार्यवाही केली नाही. मा.आयुक्तांनी स्वत: लक्ष दयावे.मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही करणे बंधनकारक असून पालन न केल्यास न्यायालयाचा अवमान होऊ शकतो ही गंभीर बाब होऊ शकते या प्रकरणी जातीने लक्ष घालून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केंद्र शासन व प्लास्टीक कचरा हाताळणी नियम २०११ तरतुदीचे पालन करावे व केलेल्या कार्यवाहीचा त्रैमासिक अहवाल शासनास सादर करावा असे सर्व मनपा आयुक्तांना पत्राद्वारे सुचना आलेल्या होत्या. हा अहवाल न पाठविल्यामूळे मनपाच्या अधिका-यावर पर्यावरण विभागाकडून गुन्हे दाखल होऊ शकतात.

श्री.गजानन बारवाल :ओला व सुका कचरा वेगळा का होत नाही.?

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्तांनी यात लक्ष घालावे. प्लॅस्टीक कच-या बरोबरच बायोमेडीकल वेस्ट कच-याचा प्रश्न .यासाठी यंत्रणा नाही. ऑन पेपर सर्व १०० डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन आहे. त्यांचेकडून पैसे भरून घेतो परंतु डिस्पोजल करण्यासाठी यंत्रणा असायला पाहिजे ती नाही.गेवराई तांडा येथे युनिट करणार होते काम होत नाही.दवाखान्यातील कचरा उचलला जात नाही ते लोक नंतर कचरा कुंडींत टाकतात. म्हणजे तो कचरा डिस्पोज होत नाही. तसेच इलेक्ट्रानिक कच-याचा विषय ते काम कोण सांभाळते. कार्यवाही होते की नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :ई-वेस्ट कचरा वेगवेगळा न केल्यामूळे नारेगावला स्फोट झाला होता नियम असतांना कार्यवाही होत नाही पर्यावरण अहवाल का सादर केला नाही? एक वर्षाचा अहवाल सादर केला २०१३-१४ चा अहवाल तयार केला त्यात कचरा केमीकल द्वारे डिस्पोज करतो असे म्हटले परंतु हे कागदावरच आहे.

श्री.राजू शिंदे :नारेगाव येथे औषधाचे, सलाईनचे, इन्जेक्शनचे ट्रकभर प्लास्टीक एका साईडला, रात्री आणून टाकतात. मेलेले जनावर आणून टाकतात. प्रक्रिया होत नाही तेथे स्फोट झाला होता एक महिलेचा मृत्यू झाला. आरोग्य व घनकचरा विभाग काय उपाययोजना करतात. ओला व सुका कचरा वेगळा होत नाही नारेगावातून कचरा डेपोकडे कच-याच्या जाणा-या गाडया त्या जालना रोड मार्गे केम्ब्रीज शाळेजवळून जाव्यात. तेथील नागरीकांना त्रास होतो आहे तो कमी होईल.

आरोग्य वैद्य.अधिकारी :बायोमेडीकल वेस्ट २००३ मध्ये एका खाजगी संस्थेला २० वर्षासाठी ठेका दिलेला आहे. पाटोदा पैठण रोडवर हा प्रोजेक्ट चालतो तेथे विविध पध्दतीने त्याची विल्हेवाट होते. मागे तक्रार होती बायोमेडीकल

वेस्ट हे डायरेक्ट नारेगावला जात होता दंडात्मक कार्यवाही केली परत नोटीस दिली आहे खाजगी दवाखान्याचे ८५० मेंबर झाले आहे.

श्री.विजय औताडे :बाहेरील जो जैविक कचरा जातो त्या ठिकाणी २ तारखेला मी भेट दिली बॉयलर मध्ये जो जाळला जातो तो कचरा एकाच जागेवर तसाच पडलेला असून बॉयलर लिकेज झाले आहे. कार्बन डायऑक्साईड जे तयार होते. टाक्या ७-७ महिनेपासून पुर्ण भरल्या असून सलाईन बॉटल व इतर कचरा २-३ महिन्यापासून पडलेला आहे. पुर्ण शहरातील ५-६ क्विंटलच कचरा जातो का? ९०० नोदंणी झाली. ३८८ नर्सींगहोमची नोदणी, एमजीएम सारख्या दवाखान्यातून ५००-६०० सलाईन बॉटल निघतात परंतु तेथे फक्त ४००-५०० बॉटल त्या साईटवर येतात.बॉयलरची इंजिनियर कडून टेस्ट झाली का प्लॅन्टवर काम कराणारे कर्मचारी दारू पितात. ते लोक काम करीत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :दवाखान्याचे रजिस्ट्रेशन आहे. आणखी संख्या वाढू शकते परस्पर कचरा टाकला तर त्यावर काय नियंत्रण आहे? पाटोदा येथे प्लॅन्ट चालू आहे काय? यंत्रणा चालू आहे का? मनपा व त्या एजन्सीचे करार किती वर्षापासून? ती एजन्सी प्रभावीपणे काम करते का?

श्री.विजय औताडे :ठेकेदाराचा कालावधी किती याचे उत्तर मिळाले नाही. एका दवाखान्यात ८०-९० बेड असतांना तो ठेकेदार त्या प्रमाणानुसार मनपास पैसा देत नाही. एक वर्षात किती पैसे भरतो.

आरोग्य वैद्य.अधिकारी :पुढील बैठकीत याची माहिती दिली जाईल. आता डॉक्टरांनी ऑनलाईन पेमेंन्ट भरावे असे सुरू केले आहे.

श्री.विजय औताडे :२०-३० बेड दवाखान्यात असतांना सुध्दा ते पैसे मनपास येत नाही. ठेकेदार मनपास कमी पैसे भरतात.

मा.महापौर :किती पैसे महापालिकेस मिळतात?

आरोग्य वैद्य.अधिकारी :जे कलेक्शन होते त्याचे २३ टक्के रॉयल्टी मिळते.

श्री.दिलीप थोरात :हे शुल्क मनपा वसुली करीत होते. आता ठेकेदार वसुल करतो. त्यांनी मनपास रूपयाही भरला नाही.

आरोग्य वैद्य.अधिकारी :दर महिन्याला पैसे भरतात.

श्री.रेणुकादास वैद्य :कचरा गोळा करण्याची काय पध्दत आहे? विल्हेवाट कशी लावली जाते व कचरा उचलला नाही तर काय कार्यवाही होते? किती वेळा कार्यवाही केली?

मा.उपमहापौर :डॉक्टर मनपाच्या भरवशावर पैसे भरतात सेवा देणे आपले काम असते.विभाग प्रमुख म्हणुन आपली जबाबदारी आहे.

आरोग्य वैद्य.अधिकारी :ठेकेदार सेवा देतो. काही डॉक्टर परस्पर जातात. त्यासाठी रजिस्ट्रेशन आवश्यक केले. नर्सींगहोमचे रजिस्ट्रेशन करीत होतो, आता ओपीडीचीही नोंदणी करतो.

श्री.रेणुकादास वैद्य :पैसे घेऊन ठेकेदार दवाखान्यातून कचरा जमा करतो का मनपाचे यावर काय नियंत्रण आहे व काय कायर्वाही केली?

आरोग्य वैद्य.अधिकारी :जे रजिस्ट्रेशन झाले तेथील कचरा उचलतो ४८ तासात एकदा कचरा उचलायला पाहिजे. असा नियम आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :कचरा उचलतो तर कचरा कुडयांत दवाखान्यातील कचरा कसा दिसतो सलाईन, सिरींज कुंड्यात असते.

आरोग्य वैद्य.अधि :असा कचरा कुंडीत टाकला तर डॉक्टरांना दंड करतो. सभागृहाला पुर्ण माहिती दिली जाईल.

श्री.रेणुकादास वैद्य :ठेकेदारास दंड न करता डॉक्टरांना केला जातो, हे चुकीचे आहे.

श्री.दिलीप थोरात :या प्रकरणाची चौकशी करावी.

मा.महापौर :या प्रकरणाची पुर्ण माहिती ३-४ दिवसात दयावी.

श्री.विजय औताडे :या बाबतीतला चार्ज यांचेकडेच आहे. आरोग्य वैद्य.अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठविले पाहिजे चौकशी करावी.

श्रीमती विमल केंद्रे :वार्ड मेहरनगर भागात मनपाचा दवाखाना आहे तेथे योग्य सुविधा दिल्या जात नाही. याकडे आरोग्य अधिकारी यांनी विशेष लक्ष दयावे.

या वेळी डायस समोर अनेक स.महिला व स.पुरूष सदस्य जमा होतात व कार्यवाहीची मागणी करतात.

श्री.नासेर सिद्यीकी :आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे.

श्री.अब्दुल र. नाईकवाडी: रजा मंजूर करावी रजेवर पाठवावे.

मा.महापौर :सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ ३-१५ वा पुन्हा ३-२५ वा. सभा सुरू झाली.)

श्री.गजानन बारवाल :आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे संदर्भात अनेक तक्रारी आहेत.त्यामूळे त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे त्यांची चौकशी व्हावी.

मा.महापौर :पाठविले.

श्री.राजेंद्र जंजाळ :प्लास्टीक कचरा हाताळणी संदर्भात किती लोकांवर कार्यवाही केली? दंड केला? खटला दाखल केला?

घनकचरा कक्ष प्रमुख :त्रैमासिक अहवाल देण्याची कार्यवाही होईल. नुकताच चार्ज माझ्याकडे आलेला आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन होत नाही. कार्यवाही केली नाही तर याचे विरोधात मी मा.कोर्टात दाद मागणार आहे. ३१ जुलै सद्यस्थिती प्रदुषण अहवाल सुध्दा सादर केला नाही.

मा.आयुक्त :प्लास्टीक डिस्पोजल संदर्भात शासनाने नियम केले आहे. डिस्पोजल कसे करावे या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शन आहे. शासनाचे मार्गदर्शन इंग्रजी मध्ये आहे. कदाचित अधिका-यांना समजले नसेल ते समजावून दिले जाईल व यापुढे नियमीत कार्यवाही केली जाईल. गेल्या वर्षीचा अहवाल प्रसिध्द केला आहे. या वर्षीचा राहिलेला आहे. लवकरच प्रसिध्द करण्यात येईल व नियमीत दर वर्षीचा अहवालही प्रसिध्द केला जाईल.

श्री.नासेर सिद्यीकी :सभा तहकूब केली होती काय निर्णय घेतला?

मा.आयुक्त :संबंधीत अधिकारी रजेवर गेलेल्या आहेत व नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

प्रश्न क्रमांक १४० :स.विजय औताडे

मा.महापौर :स.सदस्यांना उत्तरे प्रशासनाकडून मिळाली तर चर्चा साठी कमी वेळ देता येईल.

श्री.विजय औताडे :मालमत्ता रिव्हीजन करणे. आवश्यक असून १९८९ मध्ये केले होते २५ वर्ष झाले जे की एनआरव्ही प्रमाणे टॅक्स वसुल होत नाही.

मा.महापौर :मालमत्ता संदर्भात ४ दिवसात बैठक आयोजित केली जाईल.

प्रश्न क्रमांक १४१ :स.श्री.इरशाद खान

श्री.इरशाद खान :काम दिले त्यात अटी शर्ती काय साईडचे फुटपाथ दुभाजक त्यात नव्हते का ?

कार्य.अभियंता (अ ड) :अंदाजपत्रक होते त्यांची प्रत दिली जाईल.

प्रश्न क्रमांक १४५ :स.समीना शेख

श्रीमती समीना शेख :खुलासा समाधानकारक नाही.

सहा.संचालक (न.र.) :भुसंपादन अधिकाऱ्यांकडे पैसे भरले अवार्ड डिक्लेर झाला भुसपांदन अधिकारी यांचे प्रतिनिधी येथे आहे २०१४ मध्ये भुसंपादन अधिकाऱ्यांकडून तहसीलदार यांना पजेशन घेण्यासाठी कळविले होते. घेतले नाही आता पुन्हा कळविण्यात येईल.

श्री.कैलास गायकवाड :या रस्त्यातील ९० टक्के मालमत्ता धारकास मोबदला दिला १० टक्के अनधिकृत आहे ते काढावे रस्त्याचे काम तातडीने करावे.

श्री.चेतन कांबळे :डीपी रस्त्यावर मार्कींग करून अतिक्रमण केव्हा काढणार आहे.

मा.महापौर :गणेश उत्सव झाल्यानंतर मार्कींगचे काम हाती घ्यावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :मार्कींग करावी अतिक्रमण काढावे जयभवानीनगर सारखी परीस्थिती होऊ नये.

श्री.राजू शिंदे :डीपी रोडवर किती फुटाचा रस्ता आहे मनपाच्या नावाचे बोर्ड लावावे.

श्रीमती शोभा वळसे :माझ्या वार्डात लाईट बंद आहे.

मा.महापौर :शहरातील लाईट पुर्ण चालू करावे तसेच जेथे आवश्यक तेथील रस्त्याचे पॅचवर्क काम करावे.

श्रीमती विमल केंद्रे :विजयनगर ते वाडकर कॉर्नर रस्त्याचे काम का बंद पडले.

शहर अभियंता :गणेश उत्सव व इतर उत्सावाच्या काळात रस्ते चांगले राहणे आवश्यक आहे.जुने पॅचवर्कचे टेंडर त्या अंतर्गत काम सुरू केले जाईल स्ट्रीट लाईट टेंडर काढले टेंडर ओपन करणार आहोत जे येतील त्यांचेकडून लाईटची लगेच कामे सुरू करणार आहोत.विजयनगर ते वाडकर कॉर्नर रस्ता गणेश उत्सवानंतर करण्यात येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :एन-११ स्मशानभुमी समोरील रस्त्याचे २५ टक्के काम केले उर्वरीत काम केंव्हा होणार आहे.

मा.महापौर :ठेकेदारानी कामे घेतली परंतु काही अडचणीमूळे करू शकले नाही. बजेटमध्ये तरतूद करू नसता चांगले नियोजन करून सर्व कामे करता

येतील. कोणते रस्ते अर्धवट,काम केंव्हा होणार सदस्यांनी मागितलेली माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता :लेमन-ट्री ते टी पॉईन्ट पर्यंतच्या रस्त्यामध्ये हा भाग व्हाईट टॅपींग मधून वगळला कारण त्याचे टेंडर झाले होते जेवढे काम केले तेंवढे त्यास पेमेंन्ट मिळाले नाही.त्यामूळे काम थांबले.

मा.महापौर :अर्धवट कामे झालेल्या रस्त्याची यादी तयार करावी कोणते रस्ते होणार,कोणते झाले सदस्यांना यादी दयावी होत नसेल तर तसे पुढील बैठकीत सांगावे.जे ठेकेदार काम करीत नसेल त्यांचेवर कार्यवाही करावी. पेमेंन्ट थांबवावे.

शहर अभियंता :वर्षानुवर्ष टेंडर चालू आहे कामेही होत नाही.हे थांबवून उर्वरीत राहिलेले कामाचे एकत्रित कार्यवाही करून कामे केल्यास योग्य होईल.

मा.महापौर :प्रश्नावर जास्त चर्चा करता येत नाही नियमावलीत आहे.कमीत कमी चर्चा करावी.

प्रश्न क्रमांक १५४ :स.सदस्य श्री.कैलास गायकवाड

श्री.कैलास गायकवाड :गारखेडा परीसर ५०० एकरचा व तेथे ५० ठिकाणी आरक्षीत जागा असेल. मी प्रश्न केला तेंव्हा ६ ठिकाणी आरक्षीत जागा असल्याचे म्हटले जागा भुसंपादीत केल्या डीपी रोड किंवा हायस्कूल व प्ले ग्राऊंड असेल या जागेची पीआर कार्ड किंवा सातबारावर नोंद घेतली का विचारले,त्यांचे उत्तर दिले नाही.२००५ मध्ये गारखेडा परीसरातील एकाच मालमत्तेचा डबल मोबदला घेतला तो स.श्री.देसरडा व श्री. विसपुते यांनी थांबविले होते. लक्ष्मीनगर,देशमुखनगर भागात मनपाच्या जागेवर भुमाफियांनी २०X३० चे प्लॉट करून विक्री केले त्याची प्रत ही दिली. बॉण्ड करून विक्री करतात. त्यांचेवर गुन्हे दाखल करायला पाहिजे होते. केले नाही. सार्वत्रिक निवडणुकीच्या अगोदर कारगिल उद्यान समोर १९८२ ला तीन एकर जागा मनपाने घेतली. संबधीतास रोख रक्कम दिली. तेथे लोकांनी अतिक्रमण केले म्हणून उपोषण झाले होते. त्यावर तत्कालीन आयुक्तांनी अतिक्रमण काढून संबधीतावर गुन्हे दाखल करावे आदेशीत केले. कार्यवाही केली नाही. ज्यांना पैसे दिले त्यांनीच पुन्हा अतिक्रमण केले त्यांचे नावाचा बोर्ड लावला. जागेची आजची किंमत १५-२० कोटी असेल, प्रशासकीय अधिकारी इमारत निरीक्षक तेथे जात नाही. फुलफगर नावाचे व्यक्तीने बोर्ड लावले. दादागिरी करतो. मी पत्र दिले तरी तेथील बोर्ड काढला नाही. गुन्हा दाखल केला नाही. ४२० चा गुन्हा दाखल करावा. जागा संरक्षित करावे व मनपाचे बोर्ड लावावे.

श्री.रेणुकादास वैद्य :बरोबर बोलले आहे. विजयनगर लक्ष्मीनगर भागातील जमिनी कुणाच्या मालकीच्या कुणीही सांगू शकत नाही. तेथे अनेक प्रॉपर्टी वादग्रस्त असतांना सुध्दा मोबदला दिला जातो. तीन भावाची मालमत्ता एकाच्या नावाने चेक दिला संबधीताने तसे पत्र दिले. मोबदला देतांना

मालमत्ताची मालकी हक्क तपासले जात नाही. मागे निरंतर परीसरात टीडीआर घोटाळा, पैसे दिले परंतु मुळ मालक कोण आहे अजूनही कळाले नाही. गणेश मुर्ती ठेवल्या त्या खाजगी प्रॉपर्टी असल्याचे सांगीतले गुंतागुंत्तीची न्यायालयात प्रकरणे आहे.असे असतांना कुणीतरी घरे बांधतात पत्रे उभे करतात ,कारखाने होतात नागरीकांना त्रास होतो डीपी रोड, गुंठेवारीतील आरक्षीत जागेवर २०X३० चे प्लॉट करून विक्री होते. गरीबांना फसविले जाते. गुंठेवारी शिवाजीनगर गारखेडा भागात प्लॉट करून विक्री होतात.इमारत निरीक्षक यांनी प्लॉटींग करणा-यांना अभय देण्यासाठी १५-२० लक्ष घेतले. आताच कार्यवाही व्हावी नसता जयभवानीनगर सारखी परीस्थिती निर्माण होईल. संबधीतावर गुन्हे दाखल करावे.

श्री.गजानन बारवाल :५०० एकरवर गारखेडा भागात आरक्षण असेल चौकशी करावी.

श्री.कैलास गायकवाड :टीडीआर ,रोख रक्कमेत ,एफएसआय नुसार ज्या जागा बाधीत झाल्या असतील १९८२ ते आजपर्यत त्याची माहिती दयावी विचारले असता टीडीआर संदर्भात अभिलेख विभागात नगर रचनाचे रजिस्टर ठेवले तेथे पहावे असे सदस्यांना उत्तर देणे योग्य नाही. फुलफगर नावाचे व्यक्तीने मनपाच्या जागेवर अतिक्रमण केले त्यांचेवर ज्यांनी कार्यवाही केली नाही त्या अधिका-यांवर ४२० चा गुन्हा दाखल करावा.

श्री.नंदकुमार घोडेले :फुलफगर नावाचे व्यक्तीने बोर्ड लावले ती मनपाची जागा आहे. त्यांचेकडून मनपाने विकत घेतली ७/१२ वर मनपाचे नाव नाही नाव लावण्यासाठी प्रयत्न केले परंतु समोरच्या व्यक्तीने आक्षेप घेतल्याने मनपाचे नाव लागले नाही.या जागेसह इतर ही मनपाच्या जागेवर मनपाचे नाव लावण्यासाठी आदेशीत करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :२५ हजार पेक्षा जास्त मोबदला दयायचा असेल तर सभेची मान्यता घेता, टीडीआर च्या बाबतीत मंजूरी का घेत नाही. देण्यात येणारा टीडीआरची प्रत व कुणाचे आक्षेप त्याची यादी कार्यालयाच्या बाहेर लावावे टीडीआर दिले. परंतु त्या जागा आपल्या ताब्यात नाही. सर्व चौकशी करून निर्णय घ्यावा.

सहा.संचालक (न.र) :फुलफगर यांना १५ वर्षापुर्वी जागेचा मोबदला दिला परंतु खरेदीखत करून घेतले नाही. सिटी सर्वे ऑफिस कडे नावावर करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. भुसंपादन अधिका-याच्या मार्फत पैसे दिले नाही मनपाने खाजगी वाटाघाटीने पैसे दिले मनपाने पंचनामा करून ताब्यात घेतले खरेदीखत केले नाही. खरेदी खत करून घ्यावे नसता नियमानुसार कार्यवाही करू असे संबधीतास कळविले. सिटी सर्वेलाही कळविले १०-१५ दिवसात उत्तर आले नाही. तर पुढील कार्यवाही होईल. गारखेडा परिसरातील डेव्हलपमेंन्ट प्लॅनची प्रत ३-४ दिवसात देण्यात येईल.

श्री.कैलास गायकवाड :अतिक्रमण काढावे व गुन्हा दाखल करावा मा.आयुक्तांनी आदेशीत केले होते.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :मा.आयुक्तांचे तसे आदेश आहे तर गुन्हे दाखल करावे. |
| उपआयुक्त(मा.म) | :या संबधीत संचिका बघून कार्यवाही केली जाईल. |
| सहा.संचालक (न.र) | :या प्रकरणी उपआयुक्त मालमत्ता यांचे समवेत बसून संचिका बघुन मा.आयुक्ताकडे सादर करून कार्यवाही केली जाईल.१५ वर्षापुर्वीची घटना आहे. |
| मा.महापौर | :या प्रकरणी कुणी निष्काळजीपणा केला.ते बघावे संबधीतावर गुन्हे का दाखल केले नाही. ३ दिवसात हे प्रकरण हाताळावे. कार्यवाही करावी.ज्या मनपाच्या नावावर जागा नाही त्या तातडीने कराव्या. |
| श्री.राजू शिंदे | :मोबदला दिला जागा ताब्यात आली का, रजिस्ट्री झाली का? हे काम कोणाकडे आहे. |
| श्री.कैलास गायकवाड | :मालकाकडून व अतिक्रमण करून ज्यांनी घरे बांधली त्यांचे समवेत सगंनमत करून अधिकारी पैसे घेतात त्यामुळे कार्यवाही होत नाही. |
| मा.महापौर | :या बाबत सर्व चौकशी करावी. |
| श्रीमती ज्योती अभंग | :वार्ड क्र.४ मध्ये अतिक्रमण करून घरे व गोडाऊनचे बांधकाम होत आहे. पत्र दिले कुणीही पाहणी केली नाही. अमुक ठिकाणी काम चालू आहे उडवाउडवीची उत्तरे मिळतात. |
| मा.महापौर | :प्रभाग निहाय इमारत निरीक्षक देण्यात यावे. |
| मा.उपमहापौर | :स्वच्छता निरीक्षकांच्या मार्फत अनधिकृत बांधकामाची माहिती घेऊन कार्यवाही केली तर सोयीस्कर होईल. |
| श्री.मनोज गांगवे | :चिकलठाणा ते सिडको पर्यंतच्या रस्त्याच्या साईडचे अतिक्रमण काढतांना माझ्या वार्डाच्या समोर चर्मकार समाजाची रोहिदासनगर वस्ती आहे. तेथे २५ वर्षापासून संत शिरोमणी गुरूरोहिदास महाराजाचे जुने मंदीर आहे. त्या मंदीराची कमान डायरेक्ट सुचना न देता काढली धर्माच्या भावना दुखवल्या गेल्या. त्या रस्त्यावर बरेच अतिक्रमण होते ते का काढले नाही? |
| श्री.रेणुकादास वैद्य | :रस्त्याच्या कडेला कमान ही अतिक्रमण समजून एखादया समाजाच्या भावना दुखविणे योग्य नाही. ती कमान मनपाने बांधून दयावी. |
| मा.महापौर | :अतिक्रमण असेल तर काढावेच. आताच म्हटल्या प्रमाणे कमान वगैरे काढतांना कुण्या धर्माच्या भावना दुखवल्या जावू नये. यापुढे लक्ष दयावे अतिक्रमण काढतांना प्रशासनाने योग्य पध्दतीने कार्यवाही करावी. |
| प्रश्न क्रमांक १५६ | :स.श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी |
| श्री.अ.रहिम नाईकवाडी | :सलीम अली सरोवर येथील एसटीपी प्लॅन्ट केंव्हा पुर्ण केला खर्च किती व चालू आहे का माहिती विचारली चालू असल्याचे म्हटले. परंतु तो प्लॅन्ट बंद आहे. |
| कार्य.अभियंता-ड्रेनेज | :उत्तर सदस्यांना दिले. हा प्लॅन्ट रात्र-दिवस चालू आहे. |
| मा.उपमहापौर | :पेपरला आले की सलीम अली सरोवर मध्ये प्रवेश बंद असतांना लोक जातात. |
| कक्ष प्रमुख -बीओटी | :गेट अज्ञात लोकांनी तोडला होता. तो आता बंद केलेला आहे. |

मा.महापौर :नागरीकांना तेथे बघण्यासाठी प्रवेश देता येईल. यासाठी ताबडतोब कार्यवाही करावी तेथे वॉचमन दयावे.

प्रश्न क्र.१५७ :

मा.महापौर :मुख्य नाल्यात भुमिगत गटार लाईन टाकली जाईल. त्यानंतर इतर लाईन त्यास जोडल्या जातील.

प्रश्न क्रमांक १५९ :

श्री.अ.रहिम नाईकवाडी :उत्तर दिले नाही.

उपआयुक्त(मा.म) :या जागेवर फिश मार्केट सुरू केले होते. लोकांचे आक्षेप आले आता शहागंज येथे मार्केट होत आहे लगेच सुरू होईल.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :माहीती प्रमाणे एक आमदार यांचे सांगण्यावरून तेथील फिश मार्केट रद्द केले आता शहागंज मध्ये होत आहे तेथे लोकांना ये जा करण्यासाठी खर्च येणार आहे. फिश व मटन मार्केट सेन्ट्रल नाका येथेच व्हावे.

मा.महापौर :रितसर ठराव घ्यावा लागेल कार्यवाही करावी लागेल.

प्रश्न क्रमांक १६१ :स.श्रीमती सायरा खान

श्रीमती सायरा खान :शहागंज भाजी मंडई जवळच मटन, फिश, फ्रुटचे जुने मार्केट तसेच मोठे शॉपींग मार्केट असल्याने येथे मोठा कचरा साचतो. उचलला जात नाही. कर्मचारी व वाहनाची मागणी केली ९ पत्र दिले उत्तर दिले नाही. ३ गाडया आहे ८ ची मागणी केली अद्याप दिले नाही. चार ठिकाणचा कचरा एका ठिकाणी जमा होतो. दुर्गंधी सुटते. वेळेत उचलला जात नाही. कुत्र्यांचा मोठा सुळसुळाट आहे. त्यासाठी कार्यवाही करावी.

कक्ष प्रमुख घनकचरा :वार्ड २३ मध्ये शहागंज भाजी मंडई येथे भेट दिली असता, भाजी व फळांचा कचरा पडलेला आढळून आला त्यानंतर तेथील कचरा लगेचच उचलला. या वार्डासाठी १८ मजूर त्यात जवान १ इतर पुरूष व स्त्री मजूर असे १८ आहे. गाडया खरेदीसाठी २.९६ कोटीचा प्रस्ताव पाठविला त्यास मंजूरी आल्यानंतर वाहनाची पुर्तता केली जाईल. या भागातील कचरा वेळेवर उचलला जाईल.

मा.महापौर :कचरा उचलला जातो की नाही पाहणी करावी.

श्री.गजानन बारवाल :महास्वच्छता अभियान राबवित आहोत. यांत्रिकी विभाग व घन कचरा कक्ष प्रमुख या विभागाने समन्वय ठेवून काम करावे.

श्री.जमीर कादरी :माझ्या वार्डात बाजूलाच परभणी कृषी विद्यापीठाची जागा आहे. ड्रेनेज लाईनचे काम करण्याची मागणी केली ७ लक्षचे टेंडर झाले. ८० फुटाचा रस्ता आहे. विद्यापीठ प्रशासन लाईन टाकून देत नाही.

मा.महापौर :या ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर जाऊन मा.आयुक्तांनी पाहणी करावी. तसेच दुसरा मुद्दा की कृषी विद्यापीठास ९ एकर जागा दिली होती. लिज संपलेली आहे. त्या बाबतीतही कार्यवाही करावी.

श्री.गंगाधर ढगे :ज्या भागात हॉटेल दुकाने जास्त आहे. तेथे मजूरांची संख्या वाढवावी. बुढ्ढीलेन भागात एका कुंडीवर एक ट्रक कचरा साचतो.

| | |
|---|---|
| श्री.चेतन कांबळे | :बुढ्ढीलेन भागात उघडयावर मांस विक्री होते ते थांबवावे. |
| मा.महापौर | :जेथे मार्केट व बाजारपेठ असेल अशा ठिकाणी मजूर कर्मचारी जास्त दयावे. |
| प्रश्न क्रमांक १६६ | :स.श्रीमती सरिता बोर्डे |
| श्रीमती सरीता बोर्ड | :माहिती दिली नाही. |
| मा.आयुक्त | :संबधीत अधिकारी यांना माहिती देण्याचे सुचना दिल्या जातील. |
| प्रश्न क्रमांक १६७ | : |
| प्रशासकीय अधिकारी | :३१ तारखेला चार्ज मिळाला. मुकूंदवाडी येथील अतिक्रमण व रोजाबाग जालना रोडवरील अतिक्रमण काढण्याचे काम चालू होते. मागील दोन दिवस सुट्टी होती. |
| श्रीमती सुरेखा सानप | :ब्रीजवाडी भागात अतिक्रमण होत आहे. फोन केला असता, व्हिडीओ शुटींग करावे व आयुक्तांना आणून दाखवावे असे अधिकारी सांगतात. |
| मा.महापौर | :या ठिकाणी त्वरीत जाऊन कार्यवाही करावी. |
| श्री.गोकुळ मलके | :२०-२५ दिवसापुर्वी पत्र दिले. गट नं.९,१० नारेगाव येथे १३ एकरमध्ये अतिक्रमण होत आहे. कुणीही आले नाही. |
| मा.महापौर | :अनधिकृत प्लॉटींग होऊ नये यासाठी प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावा. जे जमीन मालक व प्लॉट विक्री करतात. त्यांचेवर गुन्हे दाखल करावे. अतिक्रमण होणार नाही यासाठी इमारत निरीक्षक कर्मचारी वाढवावे. |
| श्री.चेतन कांबळे | :२०X३० प्लॉट करून विक्री करणारे भुखंड माफियांची यादी मा.पोलीस आयुक्तांकडे कार्यवाहीसाठी दयावी. |
| मा.महापौर | :अशा लोकांची यादी तयार करावी व आयुक्तांकडे सादर करावी. |
| श्री.अ.रहिम नाईकवाडी | :भुमाफिया जागा घेतात व कमी दराने प्लॉट विकतात. गरीब लोक घेतात. त्यांचे ले-आऊट व बेटरमेंट चार्जेस भरलेले नसतात. या संदर्भात जनतेला सुध्दा आवाहन करावे. |
| प्रश्न क्रमांक १६८ | : |
| मा.महापौर | :नियमानुसार कार्यवाही करावी. |
| प्रश्न क्रमांक १६९ | :स.श्री.रमेश जायभाय |
| श्री.रमेश जायभाय | :उत्तर मिळाले नाही. |
| मा.महापौर | :स.सदस्यांना वेळेच्या आत उत्तर देण्यात यावे. |
| प्रश्न क्रमांक १७५ | :स.श्री.गोकुळ मलके |
| श्री.गोकुळ मलके | :नारेगाव कचरा डेपो संदर्भात मा.कोर्टाचे काय आदेश आहे? |
| विधी सल्लागार | :मा.उच्च न्यायालयात श्री.शेख नावाचे व्यक्तीने पीआयएल केले व त्यात असे म्हटले, की डेपो विमानतळापासून कमी अंतरावर आहे. इल्लिगल आहे व प्रदुषण नियंत्रण बोर्डाच्या नियमानुसार उल्लंघन होत आहे. या बाबत मा.कोर्टाने म्हणणे ऐकून महापालिकेने यासाठी पर्यायी जागेची व्यवस्था अंतिम करावी. तेथे कचरा टाकू नये असे म्हटले २००३ मधील हे निर्देश आहे. सदस्यांना प्रत दिली जाईल. |
| श्री.राजू शिंदे | :महापालिकेने मा.न्यायालयात काय बाजू मांडली. |

| | |
|---|---|
| विधी सल्लागार | :प्रकरण चालू होते तेंव्हा आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत पर्यायी जागेची कार्यवाही चालू होती. जागेचा प्रस्ताव दिला होता नागरीकांचा विरोध असल्यामूळे जागा अंतिम झाली नाही. सहा महिण्यात कार्यवाही करावी असे म्हटले होते. |
| श्री.राजू शिंदे | :२००३ चे हे प्रकरण १२ वर्ष झाले कोणतीही जागा अंतिम केली नाही.आजही दररोज कचरा नारेगाव येथेच जातो. नारेगावच्या नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले प्रदुषण वाढत आहे. ठोस निर्णय घेण्यात यावा. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :इतर शहरात कच-याची विल्हेवाट कशी लावली जाते त्या बाबतीत माहिती घेऊन धोरण ठरवावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :शहराच्या बाजूला आरक्षीत जागेवर ८ ठिकाणी कचरा संकलन करावे नारेगाव येंथील कचरा ९० टक्के कमी होईल. |
| श्री.राजू शिंदे | :ओला सुका कचरा वेगळा करणे आवश्यक आहे.ज्या त्या ठिकाणीच त्यावर प्रक्रिया होऊन विल्हेवाट लावावी.कोरडा कचरा विकला जातो ओला कच-यावर खतनिर्मिती प्रक्रिया करावी.नारेगावातून जाणारी वाहने तुर्त बंद करून पर्यायी जालना रोड मार्गे जावी.कचरा डेपो शिफ्ट करण्यासाठी वेळीच कार्यवाही करावी. |
| श्री.दिलीप थोरात | :कच-यावर प्रक्रिया करून कोळसा, खत,इंधन निर्मिती करणारे भारतात अनेक प्रोजेक्ट आहे.त्याबाबतीत अभ्यास करून कार्यवाही करावी त्यासाठी फक्त जागा उपलब्ध करून दयावी लागेल शिवाय उत्पन्न सुध्दा मिळेल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :देशपातळीवरील वृत्तपत्रात जाहिरात देऊन सर्व कचरा कलेक्ट करेल व संपुर्ण कच-याची विल्हेवाट लावेल अशा पध्दतीने काम करणारी एजन्सी निवडावी टेंडर फायनल करावे. |
| मा.महापौर | :यावर कायमस्वरूपी पर्याय प्रशासनाने काढावा. जमा झालेला कचऱ्यावर व सुका ओला कचरा वेगळा करणेसाठी व त्यातून खत निर्मिती करता येते का हे पहावे. हा प्रश्न अनेक दिवसापासून प्रलंबीत आहे नारेगाव व बाजूच्या परीसरात नागरीक आजारी पडतात,दुषित पाणी येते कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता देशपातळीवरील वृत्तपत्रात जाहिरात देऊन एक महिण्यात निविदा मागवाव्या. कचरा घेऊन जाणारी वाहने ती नारेगाव मार्गे न जाता जालना रोड मार्गे नेता येईल का या बाबतीत मा.पोलीस आयुक्तांशी चर्चा करून योग्य निर्णय घ्यावा. |
| मा.आयुक्त | :कचरा प्रोसेसींग बध्दल ब-याचदा चर्चा केली स्वच्छ भारत अभियान मध्ये हा भाग येतो.अनेक टेक्नॉलाजी आहे कचरा-याची प्रोसेसींग करण्यासाठी सर्व कागदपत्र तयार शहर अभियंता यांचेशी चर्चा केली लवकरच या संदर्भात निविदा काढण्यात येईल. कचऱ्याची वाहने नारेगाव मधून न नेता बाहेरील जालना रोड मार्गे जाण्यासाठी तो रस्ता |

कितपत योग्य मा.पोलीस आयुक्त यांचेशी चर्चा करून कार्यवाही केली जाईल.

प्रश्न क्रमांक १७६ :

श्री.गोकुळ मलके :नारेगांव येथे घरकूल का होत नाही.

कक्ष प्रमुख-बीओटी :नारेगांव घोषीत स्लम आहे घोषीत स्लममध्ये घरकूलची कामे हाती घेण्यात आली आहे. ७/१२ व पी आर कार्ड नाही त्यामूळे अडचण येते.

श्री.गोकुळ मलके :आंबेडकरनगर ब्रीजवाडी, मसनतपूर संजयनगर या भागात सातबारा व पीआर कार्ड घेवून घरकूल केले का? दारिद्रय रेषेखालील बीपीएल मधील लोक नारेगाव भागात आहे.

कक्ष प्रमुख बीओटी :आंबेडकरनगर स्लम घोषीत आहे. नारेगांव घोषीत स्लम आहे संबधीतांना नोटीस दिल्या त्यांनी कागदपत्र सादर केले नाही.

मा.महापौर :या ठिकाणचा सर्वे करून स्लम एपीएल बीपीएल दोन्ही सर्वे करावा.

प्रश्न क्रमांक १८१ :स.श्री.राजू शिंदे

श्री.राजू शिंदे :भुमीगत गटार योजनेतील टाकलेले पाईप खराब झाल्यास दुसरे ठिकाणी वापरता येऊ शकतात का ?

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :आरसीसी पाईप वापरू शकतो एचडीपी पाईप ३० वर्षानंतर वापर करता येत नाही.६-६ मी.चे पाईप आहे कॉलर टाकून वापरता येऊ शकेल.

प्रश्न क्रमांक १८४ ते १८७ स.श्री.गजानन मनगटे

श्री.गजानन मनगटे :आज सकाळी प्रश्नाचे उत्तर मिळाले त्यावर अभ्यास झाला नाही. पुढील सभेत हे प्रश्न घ्यावे.

**<u>विषय क्रमांक १२३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २९-अ(१) नुसार सार्वत्रिक निवडणुक-२०१५ चे प्रभाग रचना आणि सन-२०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार आणि त्याचप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेची वाढीव हद्दीसाठी समाविष्ट लोकसंख्या अशी एकुण १२,२८,०३२ लोकसंख्येसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५(२)(अ) या लोकसंख्येसाठी वाढीव हद्दीसह एकूण ११५ प्रभाग (वॉर्ड) ची लोकसंख्या विचारात घेऊन तसेच नव्याने स्थापन करावयाचे प्रभाग समितीचे भौगोलिक क्षेत्र व हद्दी लक्षात घेऊन खालीलप्रमाणे ९ प्रभाग समित्या आणि त्यांचे कार्यालय स्थापन करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

| प्रभाग समिती (झोन) क्रमांक | प्रभाग समिती अंतर्भुत होणारे निवडणुक प्रभाग (झोन) क्रमांक | एकुण प्रभागांची संख्या | लोकसंख्या | प्रभाग समिती (झोन) कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १. | १२,१३,१४,१५,१६,१७, १८, १९,२०,२१,२२,४९,५२ | १३ | **१,३०,३७०** | महानगरपालिका मुख्य कार्यालय, टप्पा क्र.३ |
| २. | ४६,४७,४८,५०,५१,५३, ५४,५५,५६,६६,६७,६८,६९ | १३ | **१,३५,१०१** | वसंत भवन/मोंढा येथील वॉर्ड कार्यालय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | २३,२४,२५,२६,२७,४१, ४२, ४३,४४,४५,५७,५८,६०, ६१ | १४ | **१,५०,१८३** | परमवीर अब्दुल हमीद सभागृह बारी कॉलनी/ सेंट्रल नाका |
| ४. | १,२,३,४,५,६,७,९,१०, ११,२८,२९,३० | १३ | **१,३६,६२७** | हर्सुल येथील जुने वॉर्ड कार्यालय |
| ५. | ८,३१,३२,३३,३४,३५,३६, ३८,३९,४०,६२,६३,६४ | १३ | **१,३१,७३७** | मनपा सिडको वॉर्ड कार्यालय |
| ६. | ३७,८०,८१,८२,८३,८४,८५, ८६,८७,८८,८९,९०,९१,९२ | १४ | **१,४८,१८५** | मनपा सिडको वॉर्ड कार्यालय |
| ७. | ५९,६५,७७,७८,७९,९३, ९४, ९५,९६,९७,९८,११२,११३ | १३ | **१,४२,५१८** | मालखरे अपार्टमेंट मनपा वॉर्ड कार्यालय |
| ८. | १०५,१०६,१०७,१०८, १०९,११०,१११,११४,११५ | ०९ | **१,२२,१५२** | तत्कालीन सातारा नगर परिषद कार्यालयाची इमारत |
| ९. | ७०,७१,७२,७३,७४,७५, ७६,९९,१००,१०१, १०२, १०३, १०४ | १३ | **१,३१,१५९** | मनपा इमारत क्रांतीचौक |
| | | | एकुण | **१२,२८,०३२** |

सार्वत्रिक निवडणुक-२०१५ आणि प्रभाग ११४ व ११५ साठी आगामी नजिकच्या काळात पुन्हा होणाऱ्या प्रभाग (वॉर्ड) च्या निवडणुकानुसार लोकसंख्येत झालेल्या बदलाप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २९-अ(१) मधील तरतुदीनूसार ९ प्रभाग समितीची संख्या व रचना यास महानगरपालिकेची मंजुरी घ्यावी लागेल. तसेच प्रभाग समिती कार्यालय प्रस्तावित केल्यानुसार कायम ठेवणे किंवा त्यात बदल करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देणेस व प्रभाग समिती रचनेसाठी मान्यता मिळणेकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर.

**<u>संवाद</u>**

श्री.राजेंद्र जंजाळ :दुरूस्तीसह मंजूर करावे.प्रभागाचा विषय आहे.

श्री.गजानन बारवाल :वार्ड ड कार्यालय रेल्वेस्टेशन येथील मनपाच्या जागेवर शिफ्ट करावे.

मा.महापौर :प्रभाग कार्यालय अंतर्गत कोणकोणते वार्ड जवळ पडतील सर्व सदस्यांशी एकत्रित बसून कार्यवाही केली जाईल. दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २९-अ(१) नुसार सार्वत्रिक निवडणुक-२०१५ चे प्रभाग रचना आणि सन-२०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्ये नुसार आणि त्याचप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेची वाढीव हद्दीसाठी समाविष्ट लोकसंख्या अशी एकुण १२,२८,०३२ लोकसंख्येसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५(२)(अ) नुसार वाढीव हद्दीसह एकूण ११५ प्रभाग (वॉर्ड) ची लोकसंख्या विचारात घेऊन तसेच नव्याने स्थापन करावयाचे प्रभाग समितीचे भौगोलिक क्षेत्र व हद्दी लक्षात घेऊन खालीलप्रमाणे ९ प्रभाग समित्या आणि त्यांचे कार्यालय स्थापन करण्याकरीता सभागृहाच्या

निर्णयानुसार मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा.उपमहापौर श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, मा.सभापती स्थायी समिती श्री.दिलीप गंगाधर थोरात, मा.सभागृहनेता श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ यांचेशी विचारविनिमय होऊन खालील प्रमाणे प्रभाग समित्यांची रचना करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच प्रभाग समिती कार्यालय प्रस्तावित केल्यानुसार कायम ठेवणे किंवा त्यात बदल करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यात येतात.

| प्रभाग समिती (झोन) क्रमांक | प्रभाग समिती अंतर्भुत होणारे निवडणुक प्रभाग (झोन) क्रमांक | एकुण प्रभागांची संख्या | लोकसंख्या | प्रभाग समिती (झोन) कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १. | १२,१३,१४,१५,१६,१७, १८, १९,२०,२१,२२,४९, ५०,५२ | १४ | **१,४१,३७२** | महानगरपालिका मुख्य कार्यालय, टप्पा क्र.३ |
| २. | २३,४६,४७,४८,५१,५३, ५४,५५,५६,६७,६८,६९ | १२ | **१,२३,४५५** | वसंत भवन/मोंढा येथील वॉर्ड कार्यालय |
| ३. | २४,२५,२६,२७,४१, ४२, ४३,४४,४५,५७,५८,६०, ६१ | १३ | **१,४०,७७७** | परमवीर अब्दुल हमीद सभागृह, बारी कॉलनी/ सेंट्रल नाका |
| ४. | १,२,३,४,५,६,७,९,१०, ११,२८,२९,३० | १३ | **१,३६,६२७** | हर्सुल येथील जुने वॉर्ड कार्यालय |
| ५. | ८,३१,३२,३३,३४,३५,३६, ३७, ३८,३९,४०,६२,६३,६४ | १४ | **१,४२,०४०** | मनपा सिडको वॉर्ड कार्यालय |
| ६. | ७९,८०,८१,८२,८३,८४,८५, ८६,८७,८८,८९,९०,९१, ९२ | १४ | **१,४८,८६२** | मनपा सिडको वॉर्ड कार्यालय |
| ७. | ५९,६५,७७,७८,९३, ९४, ९५,९६,९७,९८,९९,११२, ११३ | १३ | **१,४०,९३७** | मालखरे अपार्टमेंट मनपा वॉर्ड कार्यालय |
| ८. | १०५,१०६,१०७,१०८, १०९,११०,१११,११४,११५ | ०९ | **१,२२,१५२** | तत्कालीन सातारा नगर परिषद कार्यालयाची इमारत |
| ९. | ६६,७०,७१,७२,७३,७४,७५, ७६,१००,१०१, १०२, १०३, १०४ | १३ | **१,३१,८१०** | मनपा इमारत क्रांतीचौक |
| | | एकुण | **१२,२८,०३२** | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४:-** **(आस्थापना विभाग-१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.एएमसी-१६९३/१२१९/प्र.क्र.९७/नवि-२४,दि.१६ मे,१९९४ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी सेवाभरती नियमास मंजूरी दिलेली आहे.

सदरील सेवाभरती नियमामध्ये 'कार्यालय अधिक्षक' संवर्गातील पदाची अर्हता व नियुक्तीची पध्दत खालीलप्रमाणे आहे.

- **अर्हता :-**
  १. सहाय्यक अधिक्षकाच्या प्रवर्गातील किमान ५ वर्षाचा अनुभव.
  २. महानगरपालिकेची निम्नश्रेणी परीक्षा उत्तीर्ण.
  ३. कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक.
- **नियुक्तीची पध्दती:-** उक्त अर्हता आणि अनुभव असणाऱ्या औरंगाबाद महानगरपालिकेतील सहाय्यक अधिक्षकाच्या प्रवर्गात काम करणाऱ्या व्यक्तीमधून १००% पदोन्नतीद्वारे नियुक्ती.
  टिप:- पदोन्नतीच्या बाबतीत एकूण कर्मचारी संख्येच्या २०% वरिष्ठ स्वच्छता निरीक्षकाच्या पदांमधून केली जाईल.

सदर सेवाभरती नियमामध्ये 'सहाय्यक अधिक्षक' या पदाची अर्हता व नियुक्तीची पध्दत दर्शविण्यात आलेली आहे. परंतू सदरील सेवाभरती नियम मंजूरीपूर्वी आणि त्यानंतरही 'सहाय्यक अधिक्षक' हे पद औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजूर नाही. त्यामुळे आतापर्यंत महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना 'वरिष्ठ लिपीक' संवर्गातून 'कार्यालय अधिक्षक' संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे.

करिता औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'सहाय्यक अधिक्षक' हे पद मंजूर नसल्याने आणि या पदावर कोणीही कार्यरत नसल्याने यापुढे 'वरिष्ठ लिपीक' संवर्गातून थेट 'कार्यालय अधिक्षक' या पदावर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

आस्थापना अधिकारी-१ :मनपाचे सेवाभरती नियम १९९४ ला मंजूर झाले.यात कार्यालय अधिक्षक या पदाची अर्हता व नियुक्तीची पध्दत दिली कार्यालय अधिक्षक पदासाठी सहायक अधिक्षक या पदामधून पदोन्नतीसाठी पात्र आहे ते पद मनपाकडे मंजूर नाही वरिष्ठ लिपीक संवर्गातून कार्यालयीन अधिक्षक पदावर नेमणूक देत आलो.

श्री.रेणुकादास वैद्य :२० टक्के जागा जेष्ठ स्वच्छता निरीक्षक पदामधून भरण्याचे नियमाने आहे का? काहींचाच यात फायदा व्हावा हे समोर ठेवून प्रस्ताव दिला का?

आस्थापना अधि.-१ :सेवा भरती नियमामध्ये प्रोव्हिजन आहे

श्री.राजेंद्र जंजाळ :हा विषय स्थगित करावा.

मा.महापौर :स्थगिती देण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक १२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा अंतर्गत वखार्ड कॉर्नर येथील जागा रितसर रिक्षा स्टँडसाठी मिळणेबाबत तसेच वखार्ड कॉर्नर येथे मागील २० वर्षापासून नारेगाव येथील नागरिकांच्या सुविधेसाठी रिक्षा स्टॅण्ड आहे. तेथील रिक्षा स्टॅण्ड मागील ८ ते १० दिवसांनी काही पोलीसांनी ताकीद करून बंद केल्यामुळे तेथील रिक्षा चालकांची उपासमार होण्याची वेळ आली आहे व नारेगाव येथील नागरीकांना जाण्या

येण्यासाठी भरपुर प्रमाणात अडचणी, गैरसोयी निर्माण होत आहे. मध्यंतरी हे अधिकृत रिक्षा स्टॅण्ड काही कंपनीवाल्यांनी अतिक्रमण करून हटविण्याचा प्रयत्न केला होता.

करीता रस्त्यावर ट्राफीकला अडथळा न येण्यासाठी रस्त्याच्या बाजुला रिक्षा स्टॅण्डसाठी कायमस्वरुपी जागा उपलब्ध करून देण्यात यावी करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकुळ संपतसिंग मलके

श्री.राजेंद्र जंजाळ :नियमानुसार कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे : यापुर्वीच ठराव मंजूर झाला होता मनपाचे संबधीत अधिकारी व पोलीस विभाग यांनी एकत्रित प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी व जागा निश्चित करून घ्यावी.

मा.महापौर :यात पोलीस विभागाशी समन्वय करून महापालिकेने तेथील जागा ठरवून नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा अंतर्गत वखार्ड कॉर्नर येथील जागा रितसर रिक्षा स्टँडसाठी मिळणे करीता पोलीस विभागाशी समन्वय करून महापालिकेने तेथील जागा ठरवून नियमानुसार रस्त्याच्या बाजुला रिक्षा स्टॅण्डसाठी कायमस्वरुपी जागा उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक १२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.५२ खडकेश्वर हा वॉर्ड अनुसूचित जाती संवर्गासाठी राखीव आहे. या वॉर्डामध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करण्यासाठी रुपये ५०.०० लक्ष निधी प्राप्त होणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेस्तव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास प्रकाश एडके **अनुमोदक:-**श्रीमती शकीला बेगम फय्याजोद्दीन.

श्री.राजेंद्र जंजाळ :१२६ ते १३० पर्यत सदस्यांचे विषय आहे मंजूर करावे

मा.महापौर :विषय क्रमांक १२६ ते १३० पर्यंत सर्व विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.५२ खडकेश्वर येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करण्यासाठी रुपये ५०.०० लक्षचा निधी उपलब्ध होणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८३ मुकूंदवाडी अंतर्गत माजी विधान परिषद सदस्य स्व.शालीग्रामजी बसैय्ये (बंधू) यांचे स्थानिक विकास निधीमधून दिनांक १७.०८.२००० रोजी सांस्कृतिक सभागृह बांधण्यात आलेले आहे. या सभागृहाची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली असून त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

करीता सदर सभागृहाची दुरुस्ती करण्यात यावी, व या सभागृहास "स्व.शालीग्रामजी बसैय्ये (बंधु) सांस्कृतिक सभागृह" असे नांव देण्यात यावे, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती कमलताई रामचंद्र नरोटे. **अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात
मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८३ मुकूंदवाडी येथे बांधण्यात आलेल्या सांस्कृतिक सभागृहाची दुरुस्ती करून या सभागृहास "स्व.शालीग्रामजी बसैय्ये (बंधु) सांस्कृतिक सभागृह" असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८३ मुकूंदवाडी अंतर्गत असलेल्या सर्वे नं.१७,२२,२३ व २६ या मध्ये मनपाची चार एकर खुली जागा आहे. या जागेवर भव्य क्रिडा संकुल व्हावे, अशी या भागातील नागरीकांची बऱ्याच वर्षापासुनची मागणी आहे. सदर मागणी बाबत नगरसेविका म्हणून मी पाठपुरावा करीत आहे.

करीता वरील सर्वे नंबरमधील ४ एकर खुल्या जागेवर क्रिडा संकुल उभारणेसाठी मा.जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेशी पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच या जागेवर क्रिडा संकुल उभारणेसाठी निधी मिळण्याची शक्यता आहे. तरी वॉर्ड क्र.८३ मुकूंदवाडी अंतर्गत असलेल्या सर्वे नं.१७,२२,२३ व २६ या खुल्या जागेस "छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल" असे नांव देणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती कमलताई रामचंद्र नरोटे. **अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात
मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८३ मुकूंदवाडी अंतर्गत असलेल्या सर्वे नं.१७,२२,२३ व २६ या खुल्या जागेस "छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल" असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७१ क्रांतीनगर उस्मानपूरा अंतर्गत विविध भागात रस्त्याचे काम करण्यात आलेले नाही. या भागात सर्वात जास्त गरीब व हातावर काम करणारे नागरिक राहतात. या भागात अनुसूचित जातीचे सुमारे ८०% पेक्षा जास्त नागरीक आहेत. या भागात रस्ते व्यवस्थीत नसल्याने परिसरातील नागरीकांची तसेच वाहनधारकांची गैरसोय होत असुन रस्ते खराब असल्याने या भागात दररोज छोटे मोठे अपघात होत आहेत.

करीता या भागातील रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरण करणे, डांबरीकरण करणे आणि सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ५०.०० लक्ष आवश्यक आहे.

करीता सदरील कामे करण्यासाठीचा दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी प्राप्त होणे करीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सर्वसाधारण सभे समोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सरिता अरुण बोर्डे **अनुमोदक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ
मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७१ क्रांतीनगर उस्मानपूरा अंतर्गत विविध भागातील रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरण करणे,डांबरीकरण करणे आणि सिमेंट कॉंक्रीटीकरण

करणेसाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रुपये ५०.०० लक्षचा निधी मिळणे करीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या मार्फत दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णय प्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी या विभागाकडुन या योजने अंतर्गत वार्ड क्र.४६ नवाबपुरा भागात ट्रीमीक्स कॉंक्रेट रस्ता करण्यासाठी २५ लक्ष रक्कम मंजुर करुन घेणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.खान फिरोज मोईनुद्दीन **अनुमोदक:-** श्रीमती सरिता अरुण बोर्डे

मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या योजनेअंतर्गत वार्ड क्रमांक-४६ नवाबपुरा भागात ट्रिमीक्स कॉंक्रेट रस्ता करण्यासाठी र.रु.२५ लक्षचा निधी मिळणेकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकरी यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विकास आराखडया प्रमाणे जयभवानी चौक ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन या २४ मिटर रुंद रस्त्यावरील अतिक्रमण नुकतेच महानगरपालिकेतर्फे निष्कासित करण्यात आलेले असुन या मोहिमेत शेकडो नागरीकांची घरे पाडण्यात आल्याने ते बेघर झालेले आहेत. या परिसरातील बहुतांश रहिवाशी हे मध्यमवर्गीय असल्याने त्यांनी मेहनतीने व बचत करुन बांधलेला निवारा गेला असल्याने ते आर्थिकदृष्टया कमजोर झालेले आहेत. तरी विकास आराखडयानुसार नोंदणीकरणामध्ये ज्या नागरीकांची घरे/मालमत्ता बाधीत झालेल्या आहेत अशा नागरीकांना महानगरपालिकेतर्फे नियमानुसार मोबदला देण्यात यावा, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे,श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.भगवान (बापू) देविदास घडमोडे

**अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात,श्री.नितीन रमन चित्ते.

श्रीमती मनीषा मुंडे :या रस्त्यावरील गरीब नागरीकांची घरे पाडली त्यांना मोबदला नुकसान भरपाई दयावी.

मा.उपमहापौर :जयभवानी चौक ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे रूंदीकरण करीत असतांना बरीच अतिक्रमण निष्कषित केली.या संदर्भात मा.न्यायालयाचे आदेश होते ते कळविले होते.यात ज्यांचे नुकसान झाले त्यांना मोबदला दयावा

श्री.कैलास गायकवाड :प्रस्ताव मंजूर करावा. या रस्त्यावरील अतिक्रमण काढले ८० फुट रस्ता झाला मुंकूदवाडी रेल्वेस्टेशनच्या परीसरात पार्कीगसाठी जागेचे आजच नियोजन करावे तेथे मार्कींग करावी पुन्हा अतिक्रमण म्हणून काढण्याची वेळ येणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्यांची घरे पाडली गेली ते खरोखरच गरीब आहे अशा लोकांच्या घराची, जागेची व्हिडीओ शुटींग करून पंचनामा करावा या लोकांनी पोलीस विभागास तक्रार दयायला पाहिजे रेकॉर्ड तयार होईल व दोन्ही बाजू विचारात घेऊन मोबदला देऊ शकू.

श्री.राजगौरव वानखेडे :तेथे घरे का होऊ दिली कोण अधिकारी दोषी त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :मा.कोर्टाच्या आदेशाने ज्यांचीघरे पडली ही जमीन एका व्यक्तीने विकत घेतली व लोकांना विकली.ज्यांची घरे पडली त्यांना मोबदला मिळालाच पाहिजे.बेघर झाले त्यांना पर्यायी जागा दयावी.चिकलठाणा भागात ओल्ड बँकेने अतिक्रमण काढले प्रत्येक नागरीकांना जागेचा मोबदला दिला.

श्री.गजानन बारवाल :कालावधी निश्चित करून एक महिण्याच्या आत मोबदला कसा देता येईल तशी कार्यवाही करावी.

मा.उपमहापौर :मनपाकडे २००६ हस्तांतर केले यानंतर अतिक्रमणे झाली. प्रशासन काय करीत होते. डी नोटी फाईड आहे हे आधीपासून डिक्लेर होते तरी कार्यवाही का केली नाही. प्रशासकीय अधिकारी व इमारत निरीक्षक यास जबाबदारी आहे. पुर्नवसन करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची येते.

सहा.संचालक(न.र) :मुळ मालक त्यांनी मोबदला मागितला नाही. ज्यांची घरे, जागा होती चित्रिकरण करून पोलीस विभागाचा मनपाचा पंचनामा करून त्या नागरीकांची नांवे निश्चित करून कार्यवाही करता येईल. सन २०१२-१३ मध्ये रस्ता रूंदीकरण केले तेथील बाधीत मिळकत धारकांना हर्सुल येथे ग.नं.२१६,२१७ मध्ये भुखंड दिले. त्या धर्तीवर शासनाकडे जमिनीची मागणी करून मदत करण्यासाठी विचार करता येईल.

श्री.राजेंद्र जंजाळ :इमारत निरीक्षकची संख्या कमी आहे त्यामूळे स्व.निरीक्षक व जवान यांचे मार्फत ही अतिक्रमणाची माहिती घेतली पाहिजे. अतिक्रमण काढले पाहिजे.

मा.महापौर :सर्व सदस्यांच्या सुचनांचा विचार करून ज्यांची घरे पाडली गेली. त्या नागरीकांना मनपाच्या जागेवर घरकुल किंवा इतर स्कीमच्या माध्यमातून घरे देता येतील का? याचा अभ्यास करावा. प्रशासनाच्या नियमानुसार काय मदत करता येईल ती करावी. हा विषय मंजूर करण्यात येतो. पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी उपाययोजना कराव्यात. विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विकास आराखडया प्रमाणे जयभवानी चौक ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन या २४ मिटर रुंद रस्त्यावरील अतिक्रमण नुकतेच निष्कासित करण्यात आलेले असुन विकास आराखडयानुसार नोंदणीकरणामध्ये ज्या नागरीकांची घरे/मालमत्ता बाधीत झालेल्या आहेत त्या नागरीकांना मनपाच्या जागेवर घरकुल किंवा इतर स्कीमच्या माध्यमातून

घरे देता येतील का? याबाबत नियमानुसार योग्य ती मदत कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे मिटमिटा वॉर्ड क्र.१४ येथे मोठ्या प्रमाणात अल्पसंख्यांक वस्ती असून तेथे नागरीकांना सार्वजनिक सामाजिक कार्यक्रम घेण्यासाठी तेथे सामाजिक सभागृह बांधणे अत्यंत आवश्यक आहे. सदरील भागात कुठल्याही प्रकारचे सभागृह नाही.

करीता मिटमिटा वॉर्ड क्र.१४ येथे सार्वजनिक सभागृह बांधणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ

**अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी,श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१४ मिटमिटा येथील नागरीकांना सार्वजनिक सामाजिक कार्यक्रम घेण्यासाठी सार्वजनिक सभागृह बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालया मार्फत दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णय प्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवन मानाचा दर्जा उंचवण्यासाठी विभागाकडुन या योजने अंतर्गत अनुदान २५ लक्ष रुपये वार्ड क्र.७१ मधील कोकणवाडी काली मस्जीद अंतर्गत कॉंक्रेटींग करणे व अनुदान २५ लक्ष रुपये मोहल्ला उस्मानपुरा येथे कॉंक्रेटींग करणे यासाठी शासन निर्णय परिच्छेद अ,११ चे परिपुर्ती करीत आहे.करिता प्रस्ताव मंजुर करुन कोकणवाडी काली मस्जीद अंतर्गत व उस्मानपुरा येथे कॉंक्रेटींग करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सरीता अरुण बोर्डे

**अनुमोदक:-** श्री. नाईकवाडी अब्दुल रहीम शेख, श्रीमती संगिता सुभाष वाघुले.

श्री.राजेंद जंजाळ :शासन निर्णय परिच्छेद अ ११ काय आहे.हा वार्ड नवीन झाला दोन वार्ड मिळून झाला तेथे अल्पसंख्याक आहे का हे बघावे.

मा.महापौर :शासनाचा जी आर तपासून घ्यावा. नियमानुसार कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :स्थगित करावे प्रशासनाकडून माहिती घ्यावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या योजने अंतर्गत वार्ड क्र.७१ मधील कोकणवाडी काली मस्जीद अंतर्गत कॉंक्रेटींग करणेस र.रु.२५ लक्ष तसेच मोहल्ला उस्मानपुरा येथे कॉंक्रेटींग करणेसाठी र.रु.२५ लक्षचा निधी मिळणे करीता प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालया मार्फत दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवन मानाचा दर्जा उंचवण्यासाठी विभागाकडुन या योजने अंतर्गत अनुदान २५ लक्ष रुपये वार्ड क्र.१०५ मधील सादात नगर अंतर्गत कॉंक्रेटींग करणे व अनुदान २५ लक्ष रुपये मोहल्ला राहुलनगर येथे कॉंक्रेटींग करणे यासाठी शासन निर्णय परिच्छेद अ,११ चे परिपुर्ती करीत आहे.

करिता प्रस्ताव मंजुर करुन सादातनगर अंतर्गत व राहुलनगर येथे कॉंक्रेटींग करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-** श्री.सय्यद मतीन रशीद

मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या योजने अंतर्गत वॉर्ड क्र.१०५ सादात नगर अंतर्गत कॉंक्रेटींग करणे करीता रक्कम रुपये २५ लक्ष तसेच मोहल्ला राहुलनगर येथे कॉंक्रेटींग करणे करीता रक्कम रुपये २५ लक्षचा निधी मिळणेकरीता प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालया मार्फत दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवन मानाचा दर्जा उंचवण्यासाठी या विभागाकडुन या योजने अंतर्गत अनुदान ३० लक्ष रुपये वार्ड क्र.६३ अविष्कार कॉलनी मधील चिश्तीया कॉलनी यासाठी शासन निर्णय परिच्छेद अ.११ चे परिपुर्ती करीत आहे.

करिता प्रस्ताव मंजुर करुन वार्ड क्र.६३ मधील लहान लहान गल्ल्या मध्ये सिमेंट कॉंक्रेट रस्ते तयार करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख. **अनुमोदक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे.

मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालया मार्फत शासन निर्णयाप्रमाणे वार्ड क्र.६३ अविष्कार कॉलनी मधील चिश्तीया कॉलनी मधील लहान लहान गल्ल्या मध्ये सिमेंट कॉंक्रेट रस्ते तयार करण्याकरीता ३० लक्षचा निधी मिळण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालया मार्फत दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवन मानाचा दर्जा उंचवण्यासाठी विभागाकडुन या योजने अंतर्गत अनुदान २५ लक्ष रुपये वार्ड क्र.३४ मधील अबरारनगर अंतर्गत कॉंक्रेटिंग करणे व अनुदान २५ लक्ष रुपये काद्रीया कॉलनी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे यासाठी शासन निर्णय परिच्छेद अ.११ चे परिपुर्ती करीत आहे.

करिता प्रस्ताव मंजुर करुन अबरारनगर अंतर्गत कॉंक्रेटिंग करणे व काद्रीया कॉलनी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती संगीता सुभाष वाघुले

**अनुमोदक:-** श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख, श्रीमती सरीता अरुण बोर्डे

मा.महापौर :-विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालया मार्फत शासन निर्णयाप्रमाणे वार्ड क्र.३४ मधील अबरारनगर अंतर्गत कॉंक्रेटिंग करणे काद्रीया कॉलनी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे यासाठी रक्कम रुपये २५ लक्षचा निधी मिळण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक ५४, गांधीनगर खोकडपुरा वसाहतीतील गफुर वस्ती हा परिसर अल्पसंख्यांक बहुल परिसर असुन या परिसरात महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालया मार्फत दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचवण्यासाठी या योजने अंतर्गत गफुर वस्ती परिसरात ट्रीमीक्स कॉंक्रीट रस्ता करण्यासाठी रक्कम रुपये २५.०० लक्ष मंजुर करुन घेण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री. भादवे रामेश्वर बाबुराव **अनुमोदक:-** श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे

मा.महापौर :-विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालया मार्फत शासन निर्णयाप्रमाणे प्रभाग क्रमांक ५४, गांधीनगर खोकडपुरा वसाहतीतील गफुर वस्ती परिसरात ट्रीमीक्स कॉंक्रीट रस्ता करण्यासाठी रक्कम रुपये २५.०० लक्षचा निधी मिळण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक:क्षेविका-२०१५/प्र.क्रं.७६/का.९,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२ दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरीक सुविधा उपलब्ध करुन अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवन मानाचा दर्जा उंचवण्यासाठी या विभागाकडुन या योजने अंतर्गत अनुदान १५ ते २० लक्ष रुपये वार्ड क्र.१०८ हमालवाडा रेल्वेस्टेशन यासाठी शासन निर्णय परिच्छेद अ.ii चे परिपुर्ती करीत आहे. करीता सदर प्रस्ताव मंजुर करुन वार्ड क्र.१०८ हमालवाडा रेल्वेस्टेशन या ठिकाणी कब्रस्तान व ईदगाह बांधकामासाठी महाराष्ट्र अल्पसंख्यांक विकास विभागाचे दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णय योजने प्रमाणे १० लक्ष कब्रस्तान दुरुस्ती कामासाठी व र.रु.१० लक्ष ईदगाह जवळील नाल्याच्या सुरक्षित भिंतीच्या बांधकामासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सलीमा बेगम खाजोद्दीन मुल्ला

**अनुमोदक:-**श्री.खान जहाँगीर मुलानी,श्री.खान फेरोज मोईनोद्दीन

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र अल्पसंख्यांक विकास विभागाचे दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णय योजने प्रमाणे वार्ड क्र.१०८ मधील हमालवाडा रेल्वेस्टेशन या ठिकाणी कब्रस्तान दुरुस्तीसाठी १० लक्ष व ईदगाह जवळील नाल्याच्या सुरक्षित भिंतीच्या बांधकामासाठी र.रु.१० लक्षच्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतुन प्रभाग क्र.१७ येथील दलित बहुल वसाहतीचा विकास होणे करीता प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविण्यात यावा करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

**अनुमोदक:-** श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.नितीन दशरथ साळवी.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रभाग क्र.१७ येथील दलित बहुल वसाहतीचा विकास होणे करीता प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी या वॉर्डातील ५० टक्के भाग दलित वसाहतीमध्ये असून अल्तमश कॉलनी हा घोषित स्लम आहे. त्यामुळे या वस्ती विकसीत करण्यासाठी शासनाकडून दलित सुधार योजनेअंतर्गत ६० लाख रुपये विविध कामे करण्यासाठी निधी देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जहागिरदार महम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्री.खान इरशाद इब्राहिम

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी विकसीत करण्यासाठी विविध कामे करण्यासाठी रक्कम रुपये ६० लाख रुपये निधीचा मिळण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.०१ हर्सुल परिसरातील दलीत वसाहतीमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रुपये ५०.०० लक्ष उपलब्ध करुन देण्यात यावे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.पुनमचंद सोनाजी बमणे **अनुमोदक:-** श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रभाग क्र.०१ हर्सुल परिसरात नागरी सुविधा पुरविण्यासाठी रक्कम रुपये ५० लक्षचा निधी मिळण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.१०६ कांचनवाडी,नक्षत्रवाडी या भागात दलित वसाहती असून शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत या प्रभागात मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी रुपये १ कोटीचा निधी आवश्यक आहे.

करीता वॉर्ड क्र.१०६ कांचनवाडी व नक्षत्रवाडी हा भाग स्लम घोषित असून या भागामध्ये दलित वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. या वस्ती मध्ये कुठलीही सुविधा नसल्याने नागरीकांची गैरसोय आहे. करीता या वॉर्डात मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते, गटार व जागोजागी पथदिवे व इतर कामासाठी निधी मिळण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती विमल जनार्धन कांबळे

**अनुमोदक:-**श्री.राहूल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती सरिता अरुण बोर्डे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१०६ कांचनवाडी व नक्षत्रवाडी येथे मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते, गटार व जागोजागी पथदिवे व इतर कामासाठी रुपये १ कोटीचा निधी मिळण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पडेगाव,छावणी टोलनाक्या शेजारी नागरीकांची वर्दळ असते तेथे शौचालय बांधणे गरजेचे असल्यामुळे “पे ॲण्ड युज” धर्तीवर सुलभ शौचालय बांधणे अत्यंत गरजेचे आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ

**अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी,श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगाव,छावणी टोलनाक्या शेजारी “पे ॲण्ड युज” धर्तीवर सुलभ शौचालय बांधणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, १) न्यु अन्सार कॉलनी १०० फुट डि.पी.रोड नाल्यावर पुल बांधणे अत्यंत गरजेचे आहे. २) महात्मा ज्योतिबा फुले गृह निर्माण संस्था ते साठेनगर मधील नाल्यावर पुल नसल्यामुळे नागरीकांची जाण्या-येण्यास गैरसोय होत आहे. तरी या ठिकाणी नाल्यावर पुल बांधणे अत्यंत गरजेचे आहे. ३) शिवपुरी ते जमधडे वाडा वस्ती अंतर्गत पुल बांधणे गरजेचे आहे.

करीता वरील तिन्ही नाल्यावर पुल नसल्यामुळे नागरीकांची अत्यंत गैरसोय होत असल्यामुळे पुल बांधणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ

**अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी,श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १) न्यु अन्सार कॉलनी १०० फुट डि.पी.रोड नाल्यावर पुल बांधणे, २) महात्मा ज्योतिबा फुले गृह निर्माण संस्था ते साठेनगर मधील नाल्यावर पुल बांधणे तसेच ३) शिवपुरी ते जमधडे वाडा वस्ती अंतर्गत पुल बांधणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १४५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई हायवे रोडवर स्मशानभुमी लगत दाट लोकवस्ती असल्यामुळे तेथे "पे ॲण्ड युज" शौचालय बांधण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ

**अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी,श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :-विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई हायवे रोडवर स्मशानभुमी येथे "पे ॲण्ड युज" शौचालय बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १४६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विषय समिती गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या नावामधून गलिच्छ हा शब्द वगळून त्या ऐवजी समाज कल्याण व अस्वच्छता वस्ती निर्मुलन, घर बांधणी समिती असे नाव ठेवण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे,श्रीमती ज्योती जयेश अभंग

श्री.सुभाष शेजवळ :दलित वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती असे नाव देण्यास मंजुरी द्यावी.

मा.महापौर :दुरूस्तीसह विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विषय समिती गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या नावामधून गलिच्छ हा शब्द वगळून त्या ऐवजी दलित वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती असे नाव ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १४७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वॉर्ड कार्यालय (क) अंतर्गत अनेक लहान मोठे १८ ते १९ वॉर्ड असून या वार्डातील लोकसंख्या दाट आहे. या ठिकाणी वारंवार जल:निसारणची

समस्या सर्वाधिक आहे. याचे निवारण करण्यासाठी वॉर्ड कार्यालय (क) मध्ये फक्त एकच जेटिंग मशीन आहे. मशीन एकच असल्यामुळे वॉर्डा-वॉर्डात सतत जल:निसारण लाईन चोकअप होत असते कारण जेटिंग मशीन एक असून १८ ते १९ वॉर्डातून सतत मागणी असते. लहान लहान गल्ली मध्ये मोठ्या गाड्या जात नसल्याने त्यामुळे दोन लहान जेटिंग मशीन व दोन मोठी जेटिंग मशीन प्रभाग (क) मध्ये व्यवस्था करण्यात यावी.करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जहागिरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्री.खान इरशाद इब्राहीम
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा वॉर्ड कार्यालय (क) अंतर्गत अनेक लहान मोठे १८ ते १९ वॉर्ड असून जल:निसारणची समस्या निवारण करण्यासाठी दोन लहान जेटिंग मशीन व दोन मोठी जेटिंग मशीन देण्याची व्यवस्था करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १४८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी या ठिकाणी आझाद चौक ते राम मंदीर पर्यंत ८० फुट रोड व्हाईट टॅपिंग (सिमेंट रस्ते) तयार करण्यात यावे. ८० फुट रोड न्यु औरंगाबाद सिडको व पुराने शहर औरंगाबाद या दोनही शहराचा एकमेव रस्ता आहे व या रस्त्यावर भव्य राम मंदीर असून या रस्त्यावरची हालत इतकी खराब आहे की रस्त्यावर चालणे फिरणे कठीण आहे. तर हा रस्ता शासन मान्य विकास योजनेअंतर्गत सन-२००७ च्या नुसार प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. ह्या रस्त्यावर सध्या काही अडचण नाही. ८० फुट रस्ता पुर्णपणे मोकळा करून घेण्यात आलेला आहे. या रोडचे काम पुर्ण करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचक:-**श्री.जहागिरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्री.खान इरशाद इब्राहीम
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी या ठिकणी आझाद चौक ते राम मंदीर पर्यंत ८० फुट रोड व्हाईट टॅपिंग (सिमेंट रस्ते) तयार करण्यास शासन मान्य विकास योजनेअंतर्गत सन-२००७ च्या नुसार रोडचे काम पुर्ण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १४९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३ भिमनगर उत्तर येथील नागरी दलित वस्ती विकास योजनेअंतर्गत मनपा औरंगाबाद मार्फत नागरी दलित वस्ती अंतर्गत मुलभूत नागरी सेवा पुरविण्यासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.३४ दिनांक २०.०७.२०१५ च्या ठरावानुसार शासनाच्या एकुण १६ कामांचा विविध नागरी दलित वस्ती अंतर्गत विकास कामे करण्यासाठी शासनास पाठपुरावा व निधी उपलब्ध करण्यासाठी कन्सलटन्सी मार्फत मनपा औरंगाबाद साठी आवश्यक तो निधी उपलब्धेतेसाठी शासन दरबारी कन्सलंटन्सी नेमण्याकरीता सर्वसाधारण सभेपुढे मंजुरी स्तव सादर.

**सुचक:-** श्री.चेतन जनार्धन कांबळे **अनुमोदक:-** श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१३ भिमनगर उत्तर येथील नागरी दलित वस्ती अंतर्गत मुलभूत नागरी सेवा पुरवण्यिासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.३४ दिनांक २०.०७.२०१५ च्या ठरावानुसार शासनाच्या एकुण १६ कामांचा विविध नागरी दलित वस्ती अंतर्गत विकास कामे करण्यासाठी शासनास पाठपुरावा व निधी उपलब्ध करण्यासाठी कन्सलटन्सी मार्फत मनपा औरंगाबाद साठी आवश्यक तो निधी उपलब्धेतेसाठी शासन दरबारी कन्सलंटन्सी नेमण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १५०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील विकास आराखडा रस्त्यात शहरातील गोरगरीब, दलित, हातमजुर,कष्टकरी अशा गोरगरीब नागरीकांचे रस्त्यामध्ये बाधीत होणाऱ्या मालमत्ता धारकांना महानगरपालिकेने पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी व या बाधीत मालमत्तेची नुकसान भरपाई व दलित समाजातील लोकांना घरकुल (रमाई आवास विकास योजना) योजनेअंतर्गत घरकुल देण्याच्या अटी व शर्तीवर महानगरपालिकेने शहरातील विकास आराखड्यात बाधीत होणाऱ्या गोरगरीब मालमत्ताधारकांना लेखी स्वरुपात हमी देऊन त्यानंतरच शहरातील विकास आराखड्यामधील अतिक्रमण हटवावे जेणेकरून बाधीत मालमत्ताधारकांना बेघर होणार नाही. त्यांचे पुनर्वसन करणे हे महानगरपालिका प्रशासनाचे कर्तव्य आहे. त्यामुळे त्यांना न्याय मिळेल आणि शहरातील विकास कामामध्ये कुठल्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही.

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.चेतन जनार्धन कांबळे **अनुमोदक:-** श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विकास आराखडा रस्त्यात शहरातील गोरगरीब, दलित, हातमजुर, कष्टकरी अशा गोरगरीब नागरीकांचे रस्त्यामध्ये बाधीत होणाऱ्या मालमत्ता धारकांना पर्यायी जागा किंवा बाधीत मालमत्तेची नुकसान भरपाई व दलित समाजातील लोकांना घरकुल (रमाई आवास विकास योजना) योजनेअंतर्गत घरकुल त्यांचे पुनर्वसन करणया करीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १५१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३ भिमनगर उत्तर मधील सर्व्हे क्र.गट क्र.३२/१/पार्ट महानगरपालिकेने भुसंपादित केलेल्या जागेचा आरक्षण क्र.१४७ हे खेळाचे मैदानासाठी राखीव असून मैदानाच्या जागेत खेळासाठी बहुउद्देशीय (मल्टीपर्पज) हॉलचे बांधकाम प्रगती पथावर आहे. सदर जागा ही सुमारे सात एकर असून त्या जागेचा त्या भागातील भिमनगर,पेठेनगर,श्रावस्ती कॉलनी,निसर्ग कॉलनी,शाक्यनगर,सम्राट अशोक सोसायटी,जेतवन सोसायटी,आदर्श सोसायटी,लालमाती इत्यादी परिसरातील सुमारे ५० हजार लोकवस्ती साठी महानगरपालिकेचे खेळाचे मैदान नाही त्या करीता या खेळाच्या मैदानाचा विकास करणेसाठी केंद्र सरकार तसेच SAI स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडिया तसेच क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडून क्रिडांगणे विकासासाठी निधी उपलब्धीसाठी प्रस्ताव केंद्र व राज्य शासनाकडे पाठवून

या जागेवर क्रिडांगण विकास करण्यासाठी निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.चेतन जनार्धन कांबळे **अनुमोदक:-** श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१३ भिमनगर उत्तर मधील भिमनगर,पेठेनगर,श्रावस्ती कॉलनी,निसर्ग कॉलनी, शाक्यनगर, सम्राट अशोक सोसायटी, जेतवन सोसायटी, आदर्श सोसायटी, लालमाती इत्यादी परिसरात खेळाच्या मैदानाचा विकास करणेसाठी केंद्र सरकार तसेच SAI स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडिया तसेच क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडून क्रिडांगणे विकासासाठी निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव केंद्र व राज्य शासनाकडे पाठवून या जागेवर क्रिडांगण विकास करण्यास निधी उपलब्ध करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारताचे दिवंगत राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे देशासाठीचे योगदान व शालेय विद्यार्थ्यांना राष्ट्रसमर्पण प्रेरणा देण्यासाठी भिमनगर, भावसिगंपुरा येथील मनपा प्राथमिक शाळा असे नाव देण्याबाबत भिमनगर येथील रहिवाश्यांच्या मागणीनुसार त्यांचे नाव देऊन शालेय विद्यार्थ्यांना सदैव प्रेरणेसाठी व त्यांच्या कार्याचा गौरव महानगरपालिकामार्फत करण्यासाठी भिमनगर येथील महानगरपालिकेच्या शाळेस भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मनपा प्राथमिक शाळा असे नामकरण करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.चेतन जनार्दन कांबळे **अनुमोदक:-** श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर, भावसिगंपुरा येथील महानगरपालिकेच्या शाळेस भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मनपा प्राथमिक शाळा असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८९ चिकलठाणा जूने गाव मुख्य रस्ता झेंडा चौक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या बाजूला महानगरपालिकेचे जुने कार्यालयासमोर महानगरपालिकेतर्फे आर.सी.सी.कमान बांधणे व त्या कमानीला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले प्रवेशद्वार असे नाव देण्यासह अर्थसंकल्पात सदरील कामासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष आर्थिक तरतुद ठेवण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे

**अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात,श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८९ चिकलठाणा जूने गाव मुख्य रस्ता झेंडा चौक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या बाजूला महानगरपालिकेचे जुने कार्यालयासमोर

महानगरपालिकेतर्फे आर.सी.सी.कमान बांधून त्या कमानीला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले प्रवेशद्वार असे नाव देण्यास तसेच सदरील कामासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष आर्थिक तरतुद ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८९ चिकलठाणा जूने गाव सराई वाड्याच्या बाजुला हनुमान चौकात महानगरपालिकेतर्फे आर.सी.सी.कमान बांधणे व त्या कमानीला छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार असे नाव देण्यासह अर्थसंकल्पात सदरील कामासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष आर्थिक तरतुद ठेवण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे

**अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात,श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८९ चिकलठाणा जूने गाव सराई वाड्याच्या बाजुला हनुमान चौकात महानगरपालिकेतर्फे आर.सी.सी.कमान बांधणे व त्या कमानीला छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार असे नाव देण्यास तसेच सदरील कामासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष आर्थिक तरतुद ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंती निमित्त संपुर्ण भारतात साजरी केली जाते. तसेच त्यांचे कार्य सर्वांनाच ज्ञात आहे. करीता आपल्या महानगरपालिकेच्या वतीने यावर्षी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती भव्य स्वरुपात साजरी करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकुल संपतसिंग मलके

श्री.कैलास गायकवाड :मोठया उत्साहात जयंती साजरी व्हावी त्यासाठी कमेटी करावी व योग्य नियोजन कार्यक्रमांचे करावे.

मा.महापौर :या बाबत कमिटी स्थापन करून त्या कमिटीने योग्य त्या उपाय योजना करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती भव्य स्वरूपात साजरी करण्यात यावी. विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती भव्य स्वरुपात साजरी करण्यासाठी कमिटी स्थापन करून त्या कमिटीने उपाययोजना करून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती भव्य स्वरुपात साजरी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझे मनपा वार्ड क्र.१०५ हा स्लम वसाहत असुन येथे गोर-गरीब व मोल मजुरी तथा रेल्वे स्टेशन व बस स्टँडवर हमाली करणारे रहिवासी जास्त प्रमाणांत राहतात त्यांच्या आरोग्याच्या तक्रारी बाबत ते खाजगी रुग्णालयात तपासणी करु

शकत नाही ज्यामुळे गरीब लोक आहे त्याच अवस्थेत जीवन जगतात त्यांच्या आरोग्याच्या दैनंदिन तक्रारी वाढत जात आहे.

करिता माझ्या वार्डात सादातनगर गल्ली नं.०३ मध्ये मनपाचे वाचनालय असुन ते आज पर्यंत सुरु झालेले नाही सदरील हॉल बंदच असतो या ठिकाणी एका डॉक्टरची व्यवस्था करुन व काही प्रमाणांत औषधे उपलब्ध करुन ओ.पी.डी.सुरु केल्यास गरीब लोकांना याचा फायदा होईल व त्यांच्या आरोग्याची निगा राखण्यास मदत होईल.

करीता मनपाचे सादातनगर येथे रिकामे पडलेले वाचनालयात ओ.पी.डी.सुरु करण्यात यावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशिद **अनुमोदक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१०५,गल्ली नं.३ सादातनगर येथे रिकामे पडलेले मनपाचे वाचनालयात आरोग्य सेवेसाठी ओ.पी.डी.सुरु करण्यात मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतीय स्वातंत्र्य लढयासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी उभारलेल्या इन्डीयन नॅशनल आर्मीचे आत्मघाती पथक खुनी ब्रिगेडचे रणगाडा विरोधी मानवी बॉम्ब व किलेअर्क येथील रहिवासी दिवंगत स्वातंत्र्य सैनिक मोहम्मद फैजोद्दीन यांचे नाव जामा मस्जिद टी.बी.दवाखाना ते रंगीनगेट अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्या पर्यंतच्या रस्त्याला देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री. खान अय्युब म.हुसेन खान **अनुमोदक:-**श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद

मा.महापौर :पुर्वी या रस्त्याला नाव दिले नसल्यास हा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जामा मस्जिद टी.बी.दवाखाना ते रंगीनगेट अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्या पर्यंतच्या रस्त्यास किलेअर्क येथील रहिवासी दिवंगत स्वातंत्र्य सैनिक मोहम्मद फैजोद्दीन यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी या परिसरात महानगरपालिकेची प्रियदर्शिनी इंदिरानगर प्राथमिक शाळा आहे. तथापि, प्रियदर्शिनी इंदिरानगर ही वसाहत दुसऱ्या प्रभागात येत असल्याने शाळेचा पत्ता शोधतांना पालकांना/नागरीकांना अडचणी येतात. पालक व नागरीक इंदिरानगर वसाहतीत जातात तरी त्यांना शाळेचा पत्ता शोधणे कठीण जाऊ नये यासाठी ही शाळा मयुरबन कॉलनी परिसरात असल्याने शाळेचे नांव प्रियदर्शनी इंदिरानगर प्राथमिक शाळे ऐवजी प्रियदर्शिनी मयुरबन कॉलनी प्राथमिक शाळा असे नांव देणे बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे. **अनुमोदक:-** श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक-११० मयुरबन कॉलनी परिसरातील शाळेचे नांव प्रियदर्शनी इंदिरानगर प्राथमिक शाळे ऐवजी प्रियदर्शिनी मयुरबन कॉलनी प्राथमिक शाळा असे नांव देणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात गादिया विहार परिसरातील श्रमजिवि हौसिंग सोसायटी व श्रमिक हौसिंग सोसायटी या दोन सोसायट्या जय गिरीजा हौसिंग सोसायटी गेल्या २५ वर्षापासुन असुन या सोसायट्यांना सेल्फ डेव्हलपमेंट मध्ये बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच या सोसायटयांना महानगरपालिकेतर्फे नागरी सुविधा पुरविण्याचा प्रश्न निर्माण झाल्यास प्रशासनामार्फत सेल्फ डेव्हलपमेंट चे कारण पुढे करण्यात येते.

तथापि, सदरील सोसायटी मध्ये तात्कालीन आयुक्त मा.श्री.कृष्णा भोगे साहेब व सभापती स्थायी समिती श्री.नरसिंग ढगे यांच्या कार्यकाळात जलनि:सारण वाहिनी टाकण्यात आलेली असुन या परिसरातील रहिवाशीयांनी देखिल अंतर्गत रस्ता डांबरीकरण करुन तात्कालीन उप महापौर प्रशांत देसरडा यांच्या कार्यकाळात हा रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेला आहे. तसेच नुकतेच या परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मा.संजयजी शिरसाट यांनी त्यांच्या आमदार निधीतुन डांबरीकरण केलेले आहे.

सेल्फ डेव्हलपमेंट मधील सोसायटीना यापूर्वी महानगरपालिकेतर्फे सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे एकतर गादिया विहार मधील सोसायटी २५ वर्ष जुनी व सेल्फडेव्हलपमेंटचा कालावधी संपलेला असल्याने तसेच रोड व जलनि:सारण सुविधा करण्यात आलेल्या असल्याने या सोसायटी महानगरपालिकेकडे तात्काळ हस्तांतरीत करुन घेण्यात याव्यात व तसे संबंधित सोसायटींना कळविण्यात यावे, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-** श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गादिया विहार परिसरातील श्रमजिवि हौसिंग सोसायटी व श्रमिक हौसिंग सोसायटी या दोन सोसायट्या जय गिरीजा हौसिंग सोसायटी या सोसायटयांचा सेल्फ डेव्हलपमेंटमध्ये बांधकाम परवानगी दिली. या भागात रोड व जलनि:सारण सुविधा करण्यात आलेल्या असल्याने व सेल्फ डेव्हलपमेंटचा कालावधी संपल्याने या सोसायटी महानगरपालिकेकडे तात्काळ हस्तांतरीत करुन घेण्यात याव्यात व तसे संबंधित सोसायटींना कळविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात सध्या प्री प्रायमरी (प्लेग्रुप/नर्सरी/केजी) शाळा साधाणत: ७००-८०० असून या शाळा सुरू करण्यासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी लागत नसल्याने कोणीही कोणत्याही परिसरात या शाळा सुरू करीत असून पालकांकडून अवाजवी रक्कम वसुल करीत आहेत.

सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असुन या शाळांना परवानगी घेणे महानगरपालिकेतर्फे बंधनकारक केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल तसेच

शाळेवर देखील बंधन येतील. तसेच ज्या इमारतीत या शाळा सुरू असतात त्या इमारतींना मात्र निवासी दराने कर आकारणी केलेली असल्याने महापालिकेचे उत्पन्न बुडत आहे व शाळा मालक मात्र पैसे कमवित आहे. वाढविण्यासाठी प्री-प्रायमरी स्कुलला फी आकारणी करून परवानगी देण्यात यावी. तसेच अशा शाळेचा सर्व्हे करुन त्या इमारतींना व्यावसायीक दराने कर आकारणी करावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे **अनुमोदक:-**श्री.राजगौरव हरीदास वानखेडे

श्री.शिवाजी दांडगे :प्रस्तावानुसार या शाळांना कमर्शियल टॅक्स लावून २५-३० कोटी उत्पन्न मनपास येईल. हा विषय मंजूर करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :खाजगी इंग्रजी शाळा मोठे डोनेशन घेतात. निवासी शाळा तेथे कमर्शियल म्हणून वापर होतो.मनपा हद्दीत आहे या शाळांना निवासी की कमर्शियल टॅक्स लावतो.खाजगी क्लासेस सुध्दा आहे निवासी म्हणून चालू आहे.ते व्यवसाय करतात कमर्शियल टॅक्स लावावा. मनपानेच त्यांना सुध्दा परवानगी दयावी.

श्री.नंदकुमार घोडेले :कोणता टॅक्स लावावा या आधी ठराव घेतला होता कमेटी नियुक्त केली होती कमेटीचा अहवाल आला त्यानुसार कर लावयाचा निर्णय घेतला आधीच्या ठरावाचा विचार करावा दोन्ही ठरावाची विसंगत होणार नाही त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :या शाळांवर मनपाचे कन्ट्रोल कसे असायला पाहिजे.इतर मनपात शालेय शिक्षण मंडळ आहे.फिस प्रवेश व गणवेश यावर हे मंडळाचे नियत्रंण असते.अशी समिती या मनपात नाही.ड मधून क वर्गात महापालिका आहे.वाढीव एखादी समिती करू शकतो शालेय शिक्षण समिती स्थापन करावी.

कर निर्धारक अधि. :२०१५-१६ या वर्षासाठी ज्या संस्था अनुदानित आहे त्यांना सामान्य कराचा दर ३० टक्के व इतर कर हे निवासी दराने आकारले जातील असे ठरले ज्या संस्थामध्ये मेडीकल कॉलेज इंजिनिअरींग कॉलेज व विना अनुदानित शाळा आहे त्यांना सामान्य कराचे दर हे ३७.५ टक्के आहे.इतर कर निवासी दराने आकारले जातील असे ठरले ज्या मेडीकल कॉलेजमध्ये हॉस्पीटलसाठी वापर होतो त्या जागेस कमर्शियल दर ४५ टक्के आहे.

श्री.राजू शिंदे :शैक्षणिक कराचे दर निश्चित केले त्याची अंमलबजावणी नाही.त्या त्या संस्थेला पत्र देऊन कळवावे की किती टक्के दराने कर आकारले जातात त्यांचेकडील थकबाकी वसुल करावे.

मा.महापौर :कर आकारणी बाबत मागे ठराव घेतला तो ठराव व या ठरावाचा समन्वय ठेवून एक समिती नेमून त्यावर अभ्यास करून योग्य नियोजन करून महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने तसा प्रस्ताव आणावा.

मा.आयुक्त :खाजगी क्लास यांचेकडून कमर्शियल टॅक्स वसुल करतो.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :माझ्या वार्डात अनेक क्लासेस चालतात. कोणता टॅक्स वसुल करतो.

मा.महापौर :सर्वे करावा योग्य कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सध्या प्री प्रायमरी (प्लेग्रुप/नर्सरी/केजी) स्कुलला फी आकारणी करून परवानगी देण्यास व शाळेचा सर्व्हे करुन त्या इमारतींना व्यावसायीक दराने कर आकारणी करणे संदर्भात कर आकारणी बाबत मागे ठराव घेतला तो ठराव व या ठरावाचा समन्वय ठेवून एक समिती नेमून त्यावर अभ्यास व योग्य नियोजन करून तसा प्रस्ताव सादर करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६१ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका सहाय्यक संचालक नगर रचना यांच्या अधिपत्त्याखाली १) नगर रचना विभाग ज्यात की, विकास योजने संदर्भातील रेखांकन, भुसंपादन, बांधकाम परवानगी आदि विषय हाताळले जातात. २) गुंठेवारी विभाग ३) भोगवटा प्रमाणपत्र विभाग असे तीन वेगवेगळे विभाग कार्यरत आहेत. त्यासाठी तीन ठिकाणी वेगवेगळे स्टाफ आहे.

जो विभाग नियमीत नगर रचना विभाग आहे. त्यातच संबंधीत कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्याकडेच त्या-त्या भागातील गुंठेवारी व भोगवटा प्रमाणपत्राचे काम दिल्यास कामात सुसुत्रता येईल. तसेच अनधिकृत बांधकाम नियमीत करतांना नगर रचनाशी विसंगत होणारी कार्यवाही टाळता येईल. व कमी कर्मचाऱ्यात काम चांगल्या पध्दतीने करता येईल. ही बाब लक्षात घेता त्यानुसार कार्यवाही करणेत यावी.करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

**अनुमोदक:-** श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ,श्री.रावसाहेब आमले

श्री.नंदकुमार घोडेले :या प्रस्तावानुसार तीन्हीही विभाग एकाच अधिका-याकडे असावे.

श्री.राजगौरव वानखेडे :अतिक्रमण विभागाचे जे.ई या विभागाच्या अंतर्गत असावे.

मा.महापौर :विषय मंजूर इतर महापालिकेत माहिती घेवून कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सहाय्यक संचालक नगर रचना यांच्या अधिपत्त्याखाली नगर रचना विभाग ज्यात की, रेखांकन, भुसंपादन, बांधकाम परवानगी आदि विषय हाताळले जातात, या सोबतच नगर रचना विभागाअंतर्गत गुंठेवारी विभाग, भोगवटा प्रमाणपत्र विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्याकडेच त्या-त्या भागातील गुंठेवारी व भोगवटा प्रमाणपत्राचे काम देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नगर रचना विभागात बांधकाम परवानगी प्रस्तावास मान्यता देतांना प्रस्ताव दाखल करण्यापुर्वीच बांधकाम झाले असल्यास सध्या नियमानुसार जास्तीत-जास्त रु.१०,०००/- पर्यंत दंड आकारणी करण्यात येते. मात्र काही मोठया बांधकामांना देखील तेवढी दंड आकारणी करण्यात येते त्यावेळी झालेल्या बांधकामास प्रत्येक क्षेत्रानुसार दंड आकारणी झाल्यास महानगरपालिकेस मोठया आर्थिक लाभ होऊ शकतो.

तरी बांधकाम क्षेत्रावर आधारीत दंड आकारणी करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-** श्री.सुभाष सयाजी शेजवळ

श्री.नंदकुमार घोडेले :नगर रचना विभागाचे वेगवेगळे चार्जेस आहेत. दंडात्मक कार्यवाही करतो. ॲक्ट मध्ये आहे. अनाधिकृत बांधकाम केले असेल तर दहा हजार रुपये दंड लावतो परंतु काही ठिकाणी ४-४ मजली इमारती झाल्या त्यांनाही १० हजार रुपये दंड लावतो. या प्रस्तावानुसार जेवढे क्षेत्र असेल तेवढया क्षेत्राला स्क्वे.मिटर किंवा स्क्वे.फुटा नुसार दर प्रस्तावित करुन सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव मंजुर करावा.

मा.महापौर :सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर रचना विभागात बांधकाम परवानगी प्रस्तावास मान्यता देतांना प्रस्ताव दाखल करण्यापुर्वीच बांधकाम झाले असल्यास सध्या नियमानुसार जास्तीत जास्त रु.१०,०००/- पर्यंत दंड आकारण्यात येतो. मात्र काही मोठया बांधकामांना देखील तेवढाच दंड आकारण्यात येतो. अशा वेळी बांधकाम क्षेत्रावर आधारीत दंड आकारणी करीता स्क्वे.मिटर किंवा स्क्वे.फुटानुसार दंडाचे दर निश्चित करुन मान्यता घेऊन नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विकास आराखड्यातील मंजुर डी.पी.रस्त्यावर प्रशासनातर्फे मार्किंग केली जाणार असल्याचे निदर्शनास आलेले आहे त्या मार्किंग अंतर्गत चंपाचौक ते जालना रोड तसेच नवाबपुरा ते बायजीपुरा या रस्त्याचा समावेश आहे.

परंतु या रस्त्यामध्ये बाधित होणारे मिळकती हे बहुतांश बाँडवर खरेदी-विक्री करुन विकत घेतलेले आहे. त्यामुळे या रस्त्यावरील मिळकतीचे भुसंपादन करते वेळेस ज्याच्याकडे मिळकतीचा ताबा असल्यास व त्यांच्याकडे जमीन मालकी हक्काचे कागदपत्रे असल्यास त्याची तपासणी करुनच त्यांनाच जागेचा मोबदला मनपातर्फे संबंधित मिळकत धारकास देण्यात यावा व त्यानंतरच जागेचे भुसंपादन करावे करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती नसीमबी हाजी सांडु खान **अनुमोदक:-** श्री.फेरोज मोईनोद्दीन खान

मा.महापौर :-विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विकास आराखड्यातील मंजुर डी.पी.रस्त्यावर प्रशासनातर्फे चंपाचौक ते जालना रोड तसेच नवाबपुरा ते बायजीपुरा या रस्त्यावरील जागा भुसंपादन करते वेळेस ज्याच्याकडे मिळकतीचा ताबा जमीन मालकी हक्काचे कागदपत्रे असल्यास त्याची तपासणी करुनच जागेचा मोबदला देण्यास व भुसंपादन करण्याबाबत प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकतर्फे नुकतेच मुकूंदवाडी रेल्वे स्टेशन ते जयभवानी नगर रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आलेले असून या रस्त्यावरील बऱ्याच मालमत्ता रस्त्यात बाधीत होत असल्याने पाडण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या नागरीकांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. शहर स्मार्ट सिटीकडे जात असतांना शहराच्या

सौंदर्यात भर पडावी व नागरीकांचा देखिल थोडाफार आर्थिक फायदा व्हावा यासाठी वसंतराव नाईक चौक ते मुकूंदवाडी रेल्वे स्टेशन या रस्त्यावरील जे मालमत्ता धारक आपल्या घरांना पांढरा रंग देतील त्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात ०५% सुट देण्यात यावी करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड **अनुमोदक:-** श्री.दिलीप गंगाधर थोरात

मा.उपमहापौर :वॉटर हार्वेस्टिंग साठी जशी सुट देतो तशी जे लोक घरे बांधतील व पांढरा रंग दिला तर ५ टक्के सुट दयावी

मा.आयुक्त :मा.कोर्टाच्या आदेशानुसार रस्ता क्लिअर केला अतिक्रमण धारकांना अशी सहानुभूती दाखविणे योग्य नाही.नगररचना विभागाने हा प्रस्ताव समजून घ्यावा.नगररचना विभागाच्या नियमाने कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी विषय मंजूर

श्री.गंगाधर ढगे :सुराणा अपार्टमेंन्ट ते बारूदगर नाला पर्यतचा रस्त्याचे काम होत नाही.

मा.महापौर :यासाठी बजेट मध्ये तरतूद केली जाईल.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकूंदवाडी रेल्वे स्टेशन ते जयभवानी नगर या रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत मालमत्ता धारकांचे नुकसान झाले आहे तसेच शहर स्मार्ट सिटीकडे जात असतांना शहराच्या सौंदर्यात भर पडावी व नागरीकांचा देखिल थोडाफार आर्थिक फायदा व्हावा करीता वसंतराव नाईक चौक ते मुकूंदवाडी रेल्वे स्टेशन या रस्त्यावरील जे मालमत्ता धारक आपल्या घरांना पांढरा रंग देतील त्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात ०५% सुट देण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रामनगर ते शिवाजीनगर या रस्त्यावर बऱ्याच प्रमाणात मध्यमवर्गीय व गरीब नागरीकांची घरे आहेत. त्यांनी आपल्या कमाईचा पैसा वाचवून घरे बांधली असल्याने त्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये यासाठी रामनगर ते शिवाजीनगर या सुधारीत डी.पी.रोडमध्ये ज्या मालमत्ता बाधीत होत आहेत. त्या मालमत्ता धारकांना महानगरपालिकेतर्फे पर्यायी जागा देण्यात यावी.

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड **अनुमोदक:-** श्री.दिलीप गंगाधर थोरात

श्रीमती मनीषा मुंडे :जयभवानी चौक ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन या रस्त्यावरील गरीब नागरीकांची घरे पाडली त्यांना मोबदला नुकसान भरपाई दयावी.

मा.उपमहापौर :जयभवानी चौक ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे रूंदीकरण करीत असतांना बरीच अतिक्रमण निष्कषित केली. या संदर्भात मा.न्यायालयाचे आदेश होते ते कळविले होते. यात ज्यांचे नुकसान झाले त्यांना मोबदला द्यावा. आता शिवाजीनगर ते रामनगर या डीपी रोडची मार्कींग केली तेथील अतिक्रमण काढणार असे समजले. प्रशासकीय अधिकारी इमारत निरीक्षक यांचेमुळे अतिक्रमणे वाढली. अनेक गरीब नागरीकांनी पै-पै जमा करून घरे बांधली होती. वेळीच कार्यवाही झाली असती, तर त्या गरीबांची घरे पाडून जे नुकसान झाले ते झाले नसते.

यामध्ये जी घरे तुटली त्यांना पर्यायी जागा देण्याची व्यवस्था करावी. रामनगर ते शिवाजीनगर या रस्त्यावर जी घरे झाली, मुळ मालक कदाचित मोबदला मागतील, डबल मोबदला दिल्या जाऊ शकतो. तसे न होता ज्या गरीबांनी बॉण्डवर प्लॉट घेवून घरे बाधंली, सातबारावर त्यांचे नाव नाही, ज्यांची घरे जाणार आहे, जे तेथे राहतात. त्यांना मोबदला मिळाला पाहिजे.

श्री.कैलास गायकवाड :प्रस्ताव मंजूर करावा. जयभवानी चौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यावरील अतिक्रमण काढले. ८० फुट रस्ता झाला हे शहर स्मार्ट सिटी मध्ये येते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशनच्या परीसरात पार्कीगसाठी जागेचे आजच नियोजन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :विषय क्रमांक-१३१ नुसार ज्यांची घरे पाडली गेली ते खरोखरच गरीब आहे. अशा लोकांच्या घराची त्या जागेची व्हिडीओ शुटींग करून पंचनामा करावा. या लोकांची पोलीस विभागास तक्रार दयायला पाहिजे. रेकॉर्ड तयार होईल व दोन्ही बाजू विचारात घेऊन मोबदला देता येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :तेथे घरे का होऊ दिली? यात महापालिकेचे कोण अधिकारी दोषी आहे? त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.मनोज गांगवे :शिवाजीनगर ते रामनगर तसेच एअरपोर्ट येथील मार्कींग केली. कोणते अतिक्रमण काढणार कळाले नाही? तेथील पंचनामा करून मोबदला द्यावा त्यानंतर काढावे. जयभवानी नगर येथील अतिक्रमण काढले. पंचनामा अगोदर करायला पाहिजे होता.

श्री.भाऊसाहेब जगताप :मा.कोर्टाच्या आदेशाने ज्यांची घरे पडली ही जमीन एका व्यक्तीने विकत घेतली व लोकांना विकली होती. प्रस्ताव क्रमांक-१३१ नुसार ज्यांची घरे पडली त्यांना मोबदला किंवा पर्यायी जागा द्यावी. चिकलठाणा भागात ओल्ड बँकेने अतिक्रमण काढले. प्रत्येक नागरीकांना जागेचा मोबदला दिला. धार्मीक स्थळे आली त्यांनाही मोबदला दिला.

श्री.गजानन बारवाल :कालावधी निश्चित करून एक महिन्याच्या आत मोबदला कसा देता येईल? कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :शिवाजीनगर ते रामनगर ही सिडकोची वसाहत आहे. परवानगी घेऊन घरे झाली. नेमके किती फुट रस्ता मोकळा करणार आहे?

सहा.संचालक(न.र) :जयभवानी चौक ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन हा रस्ता मा.कोर्टाच्या आदेशनुसार मोकळा केला. हा सिडकोचा डी नोटीफाईड एरिया शिवाजीनगर ते मुंकूदवाडी रेल्वेस्टेशन पर्यतचा १८ मी.रस्ता आहे. रेल्वेस्टेशनच्या जवळ अतिक्रमणे आहे.पुढे शिवाजीनगर कडे जसजसे जातो तेथे अतिक्रमण नाही. डीपी रोड हा सिडकोने डेव्हलपमेंन्ट प्लॅन केला त्यानुसार आहे. शिवाजीनगर मुकूंदवाडी रेल्वेस्टेशनचा ६० फुटाचा रस्ता आहे. २००६ ला हा एरिया मनपास हस्तांरीत केला.

मा.उपमहापौर :मनपाकडे २००६ मध्ये हस्तांतर केले, यानंतर अतिक्रमणे झाली. डी-नोटी फाईड आहे हे आधीपासून डिक्लेर होते, तरी कार्यवाही केली

नाही. प्रशासकीय अधिकारी व इमारत निरीक्षक जबाबदार आहे. पुर्नवसन करण्याची आपली जबाबदारी येते तोही खुलासा करावा.

सहा.संचालक(न.र) :जे मुळ मालक आहे, त्यांनी मोबदला मागितला नाही. ज्यांची घरे आहे, त्या बाबतीत चित्रिकरण करून पंचनामा करून तसेच पोलीसांनी पंचनामा करून नांवे निश्चित करून मानवतेचा दृष्टीकोन समोर ठेवून कार्यवाही करता येईल. यापुर्वी २०१२-१३ मध्ये रस्ता रूंदीकरण केले, तेव्हा तेथील लोकांना हर्सुल गट नं.२१६,२१७ मध्ये त्या नागरीकांना भुखंड दिले. त्या धर्तीवर विचार करून शासनाकडे जमिनीची मागणी करता येईल. त्यासाठी रेकॉर्ड तयार करणे आवश्यक आहे. पार्कींगच्या संदर्भात २०१०-११ मध्ये वाढीव क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचे काम चालू त्यात या गोष्टी अंतर्भूत झाल्या. डीपी प्लॅनमध्ये घेण्यात येईल.

मा.महापौर :विषय क्रमांक १३१,१६५ संदर्भात एकत्रित चर्चा केली. शहराचा विकास करीत असतांना पुढील उपाय आजच करणे आवश्यक आहे. अधिकारी कर्मचारी सोबत घेऊन जे डीपी रस्ते आहे त्यावर मार्कींग करावे. २००६ च्या नंतर अतिक्रमण झाले त्याकडे लक्ष देण्याची गरज होती. वारवांर चर्चा होते मिटमिटा भावसिंगपुरा, दादा कॉलनी येथील अतिक्रमणाचा वारंवार चर्चा होते. आजही प्लॉट विकतात. अतिक्रमण वाढवू नये दखल घ्यावी. डीपी रस्त्याची मार्कींग करावी तेथे किती फुटाचा रस्ता आहे बोर्ड लावावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :इमारत निरीक्षकांची संख्या कमी आहे. त्यामूळे स्व.निरीक्षक व जवान यांचे मार्फत होत असलेली अतिक्रमणाची माहिती घेऊन कार्यवाही करावी.

मा.महापौर :सर्व सदस्यांच्या सुचनांचा विचार करून कार्यवाही करावी. कुणावरही अन्याय होऊ नये. असे अतिक्रमण होणार नाही तसेच या नागरीकांना मनपाच्या जागेवर घरकुल किंवा इतर स्कीमच्या माध्यमातून घरे देता येतील का? याचा अभ्यास करावा. ५० रस्त्यांचे मार्कींग करण्यासाठी आतापासून प्लॅनींग करावे. त्याही नागरीकांवर अन्याय होऊ नये. त्यासाठी वेळीच मार्कींग करायला पाहिजे मनपाच्या नावाचा बोर्ड त्या रस्त्यावर लावला पाहिजे भविष्यात त्या रस्त्यावर अतिक्रमण होणार नाही जे लोक प्लॉट विकतात. त्यांचेवर कार्यवाही करावी. मा.कोर्टाच्या आदेशाचे पालन करावे. या प्रस्तावानुसार माणुसकीच्या नात्याने व प्रशासनाच्या नियमानुसार काय मदत करता येईल. ती करावी. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार रामनगर ते शिवाजीनगर या सुधारीत डी.पी.रोडमध्ये ज्या मालमत्ता बाधीत होतात त्या मालमत्ता धारकांना मनपाच्या

जागेवर घरकुल किंवा इतर स्कीमच्या माध्यमातून घरे किंवा पर्यायी जागा देणे करीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,शासन आदेश क्रमांक मुमंस-२०१३/औमपा/प्र.क्र.१६२/१३/नवि-२४ दिनांक २५ ऑगस्ट २०१४ अन्वये श्री.बी.एल.जाधव, उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांची उपआयुक्त औरंगाबाद महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने ते दिनांक २६ ऑगस्ट २०१४ रोजी महानगरपालिका सेवेत रुजू झालेले आहेत.

सदरील आदेशात श्री.बी.एल.जाधव यांची प्रतिनियुक्तीवरील नियुक्ती ज्या दिनांकास करण्यात येईल ती नियुक्ती त्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीपुरती मर्यादीत राहील असे स्पष्ट नमुद करण्यात आलेले आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता श्री.बी.एल.जाधव यांचा औरंगाबाद महानगरपालिकेतील कार्यकाल संपुष्टात आलेला आहे. तथापि, महागनरपालिका प्रशासनाने संबंधीतास अद्याप पर्यंत शासनसेवेत रुजू होण्यासाठी कार्यमुक्त केलेले नाही. त्यामुळे शासन आदेशाचे पालन होण्याच्या दृष्टीकोनातून त्यांना तात्काळ शासनाकडे परत पाठविणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राहूल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती सुनिता रामराव चव्हाण, श्री.कचरू छगनराव घोडके
**अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्रीमती लता मगन निकाळजे.
मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.बी.एल.जाधव, उपआयुक्त,औरंगाबाद महानगरपालिका यांचा महापालिका सेवेत एक वर्षाकरीता दिलेला प्रतिनियुक्तीचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून कार्यमुक्त करुन शासनाकडे परत पाठविण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, १) वार्ड क्र.६१ मधील हॉटेल इराणी समोरील चौकाचे नामकरण हश्मत रहिम चौक असे करण्यात यावे कारण हश्मत रहिम यांनी अनेक गोरगरीबांना मदत केली आहे. तसेच रहीम नगर सुध्दा त्यांच्या नावानेच आहे. त्यासाठी या चौकाचे नामकरण “हश्मत रहिम चौक” असे करण्यात यावे. २) बायजीपुरा येथील सेंट्रल नाका परिसरात असलेल्या मनपा दवाखान्याचे नामकरण “हाजी रहिमखॉन रुग्णालय” असे नामांतर करण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब **अनुमोदक:-** श्री.खान इरशाद इब्राहिम
मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १) वार्ड क्र.६१ मधील हॉटेल इराणी समोरील चौकाचे “हश्मत रहिम चौक”असे नामकरण करण्यास तसेच २) बायजीपुरा येथील सेंट्रल नाका परिसरात असलेल्या मनपा दवाखान्याचे “हाजी रहिमखॉन रुग्णालय” असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सेंट्रल नाका ते मौलाना आझाद चौक मार्गे सावरकर चौक पोलिस मेस पर्यंत या रस्त्याला स्व.नसीबखान बालेखान यांचे नांव देण्यात यावे. संबंधीतांनी आपली जागा नगर परिषद औरंगाबाद व सिडको, नारेगांव एमआयडीसी यांना विकास व रस्त्यासाठी दिलेली होती. त्यामुळेच नगर परिषद औरंगाबाद सिडको वसाहतीचे रोड रस्ते होण्यास त्यावेळेस मदत झालेली होती. त्यांच्या पुर्वी कोणीही आपली जागा नगरपरिषद व सिडकोस देण्यास तयार होत नव्हते संबंधितांनी बाधित मिळकतधारकास समजावुन त्यांचे मन परिवर्तन करुन जागा देण्यास तयार केलेले होते.

सेंट्रल नाका ते मौलाना आझाद चौक मार्गे सावरकर चौक पोलिस मेस पर्यंत या रस्त्याला स्व.नसीबखान बालेखान यांचे नाव देण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.खान इरशाद इब्राहिम

**अनुमोदक:-**श्री.खान जहाँगीर मुलानी, श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :जेथे सावरकर यांच्या नावाचा चौक आहे ते सोडून उर्वरित रस्त्यासाठी नाव देण्यास मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेंट्रल नाका ते मौलाना आझाद चौक व पुढे पोलिस मेस पर्यंत जेथे सावरकर यांच्या नावाचा चौक आहे ते सोडून उर्वरित रस्त्याला स्व.नसीबखान बालेखान यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भावसिंगपुरा गावात प्रवेश करतांना मंदिराच्या बाजुला असलेल्या वसाहतीला मुक्ताईनगर नाव देण्यात यावे व महानगरपालिकेच्या इतर वसाहती प्रमाणे सदरील वसाहतीचे नाव समाविष्ट करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-** श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा गावात प्रवेश करतांना मंदिराच्या बाजुला असलेल्या वसाहतीला मुक्ताईनगर नाव देऊन महानगरपालिकेच्या इतर वसाहती प्रमाणे सदरील वसाहतीचे नाव समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भावसिंगपुरा गावातील सुरू असलेल्या इमारतीत वाचनालय व अंगणवाडी शाळेस “राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब” हे नाव देणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-** श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :- विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा गावातील सुरू असलेल्या इमारतीत वाचनालय व अंगणवाडी शाळेस "राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब" हे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १७१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अल्पसंख्यांक बहुल वसाहत विकास योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.१६ मधील आमेन चौक ते कत्तलखान्याकडे व पडेगाव मारोती मंदिर ते कत्तलखान्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास्तव. आमेन चौक ते मनपा कत्तलखान्याकडे जाण्याचा रस्ता व्हाईट टॉपींग करण्यात येणे. जेणे करून या भागातील सुमारे ५० हजार लोकसंख्येची वसाहत आहे व त्या भागात कासंबरी नगर दर्गा असून तेथे अनेक भाविक दर्शनासाठी जातात तसेच या रस्त्यावर स्मशानभूमी असून भावसिंगपुरा, भिमनगर, प्रभातनगर, निसर्ग कॉलनी, लालमाती परिसरातील नागरीक या स्मशान भुमीचा वापर करतात.

या भागात बौध्द,ख्रिश्चन,मुस्लिम (अल्पसंख्यांक) नागरीक जास्त संख्याने असल्याने सदर रस्त्याचे काम अल्पसंख्यांक बहुल वसाहत योजनेअंतर्गत या रस्त्याचे विकास निधी मिळविण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ

मा.महापौर :-विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या योजने अंतर्गत वॉर्ड क्र.१६ मधील आमेन चौक ते कत्तलखान्याकडे व पडेगाव मारोती मंदिर ते कत्तलखान्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे व्हाईट टॉपींगसाठी विकास निधी मिळणेकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १७२:-</u>**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, सातारा गांव येथील मुख्य पुला पासुन ते मनपा कार्यालय व खंडोबा मंदिरा पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन २०१३-२०१४ नुसार रक्कम रु.९६,८०,५००/-चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असुन सदर कामासाठी लागणारा खर्च तेरावा वित्त आयोगाच्या निधीतुन महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती निमित्त घ्यावयाच्या उपक्रम मध्ये नमुद सुवर्ण जयंती पथ म्हणुन शहरातील एक प्रमुख्य रस्ता एकात्मिक पध्दतीने विकसित करणे या तरतुदी मधुन प्रस्तावित करता येईल.

करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.९६,८०,५००/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :- विषय मंजुर, अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सातारा गांव येथील मुख्य पुला पासुन ते मनपा कार्यालय व खंडोबा मंदिरा पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे सन २०१३-२०१४ चे रक्कम रु.९६,८०,५००/- चे च्या अंदाजपत्रकास तसेच या कामासाठी लागणारा खर्च तेरावा वित्त आयोगाच्या निधीतुन महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती निमित्त घ्यावयाच्या उपक्रमामध्ये नमुद सुवर्ण जयंती पथ म्हणुन शहरातील एक प्रमुख रस्ता एकात्मिक पध्दतीने विकसित करण्यास व अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १७३:-**

आयुक्त तथा अध्यक्ष, औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करत आहेत की, सन २०१३-१४ मध्ये केंद्र व राज्य शासनाकडुन औरंगाबाद महानगरपालिकेस ०३ नवीन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे नवीन बांधकाम - गांधीनगर, राजनगर व पवननगर (सिडको एन-७) व अस्तित्वात असलेल्या ०७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे देखभाल व दुरुस्तीसाठी- नारेगाव, क्रांतीचौक, हर्सुल, अंबिकानगर, पीरबाजार, जवाहरकॉलनी व सिडको एन-८ तसेच ५० खाटांचे ०२ रुग्णालये चिकलठाणा व नेहरुनगर यांची अस्तित्वात असलेल्या बिल्डींगची देखभाल व दुरुस्ती यासाठी प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

राज्य शासनाच्या मंजुरीनुसार पीएमसी मार्फत सदरील कामाचे इस्टीमेट तयार करुन राज्य शासनास सादर केले होते. सदरील इस्टीमेटसना शासनाची दि.२६.०५.२०१५ रोजी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर सदरील इस्टीमेट ला शहर अभियंता,महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात येऊन शहर अभियंता यांनी या इस्टीमेटसला तांत्रिक मान्यता दिलेली आहे. या इस्टीमेटसचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**A) नविन नागरी प्राथामिक आरोग्य केंद्राची नवीन बिल्डींग बांधणे:-**

| अ.क्र | आरोग्य संस्थेचे नाव | प्रकार | कामाचे स्वरुप | प्रशासकीय व तांत्रिक मान्यता रक्कम (लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १. | पवननगर (सिडको एन-७) | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | नविन बिल्डींग बांधणे | रु.७०.०० |
| २. | गांधीनगर | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | नविन बिल्डींग बांधणे | रु.७०.०० |
| | | | **एकुण** | **रु.१४०.००** |

* राजनगर येथील जागेचे प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने याठिकाणी नविन आरोग्य केंद्र बांधकामास विलंब होऊ शकतो. करीता सदरील राजनगर येथील आरोग्य केंद्र सातारा-देवळाई येथे स्थलांतरित करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. तेव्हा सातारा-देवळाई येथे नविन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची नविन बिल्डींग बांधणे सादर.

**B) अस्तित्वात असलेल्या नागरी सामान्य आरोग्य केंद्राची दुरुस्ती व देखभाल:-**

| अ.क्र | आरोग्य संस्थेचे नाव | प्रकार | कामाचे स्वरुप | प्रशासकीय व तांत्रिक मान्यता रक्कम (लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १. | नेहरु नगर | नागरी सा.आ.केंद्र | दुरुस्ती व देखभाल | रु.१९.७२ |
| २. | चिकलठाणा | नागरी सा.आ.केंद्र | दुरुस्ती व देखभाल | रु.१९.७९ |
| | | | **एकुण** | **रु.३९.५१** |

**C) अस्तित्वात असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती व देखभाल:-**

| अ.क्र | आरोग्य संस्थेचे नाव | अस्तित्वात असलेले आ. केंद्राचे नाव | कामाचे स्वरुप | प्रशासकीय व तांत्रिक मान्यता रक्कम (लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १. | नारेगांव | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | दुरुस्ती व देखभाल | रु.१२.२३ |
| २. | क्रांतीचौक | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | दुरुस्ती व देखभाल | रु.११.७० |
| ३. | हर्सुल | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | दुरुस्ती व देखभाल | रु.१०.९७ |
| ४. | अंबिकानगर | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | दुरुस्ती व देखभाल | रु.१०.२१ |
| ५. | पीरबाजार | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | दुरुस्ती व देखभाल | रु.११.९९ |
| ६. | जवाहर कॉलनी | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | दुरुस्ती व देखभाल | रु.११.२९ |
| ७. | सिडको एन-८ | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | दुरुस्ती व देखभाल | रु.१०.९९ |
| | | | **एकुण** | **रु.७९.३८** |

A+B+C एकुण रु.२५८.८९ लक्ष चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व पुढील कार्यवाही करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

श्री.राजगौरव वानखेडे :आरोग्य अधिकारी येथे नाही स्थगित करावे.एन-११ येथील आरोग्य केंद्रांचे तीन वर्षापासून काम चालू दोन वर्षापासून बजेट असतांना का बंद आहे.

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावातील परिच्छेद A+B+C मध्ये दर्शविल्याप्रमाणे नविन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची नविन बिल्डींग बांधणे, अस्तीत्वात असलेल्या नागरी सामान्य आरोग्य केंद्राची दुरुस्ती व देखभाल तसेच अस्तीत्वात असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरुस्ती व देखभाल इत्यादी कामासाठीच्या एकत्रित एकुण रक्कम रु.२५८.८९ लक्षच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १७४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरासाठी महानगरपालिका हे नियोजन व स्थानिक प्राधिकरण आहे. शहरालगतच्या सातारा व देवळाई परिसरासाठी स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्यात आली होती. मात्र परीसराचे सुसूत्रीत व नियोजनबध्द विकासासाठी समन्वय राहावा व एकत्रित धोरण ठरुन विकास व्हावा. या उद्देशाने दिनांक १४.०५.२०१५ रोजी शासनाने उपरोक्त नगरपालिका क्षेत्र महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट केले आहे. मात्र अद्यापी शहरा लगतच्या २६ गावांसाठी सिडको हे नियोजन प्राधिकरण व संबंधीत

ग्रामपंचायत हे स्थानिक प्राधिकरण आहे. शहर व लगतचा परिसर याचा संयुक्तपणे, एकमेकांशी सुसंगत व प्रभावी विकास व्हावा. यासाठी एकच नियोजन प्राधिकरण व स्थानिक प्राधिकरण असणे सोईस्कर ठरते.

त्यामुळे मा.महापौर यांनी दिनांक १०.०९.२०१५ रोजी पत्र देऊन या संपूर्ण क्षेत्राचा महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करणे बाबत कार्यवाही करणेसाठी सुचित केले आहे.

त्यानुसार सिडको नियोजन प्राधिकरण असलेल्या २६ गावांचा महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३ चे पोटकलम-३ खंड(अ) नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याचा भाग म्हणून महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता होणे आवश्यक आहे. त्यास्तव प्रस्ताव सादर.

**<u>चर्चा:-</u>**

श्री.रेणुकादास वैद्य :एमआयडीसी वाळूज पंढरपूर क्षेत्रफळ हा भाग घेता आला तर महापालिकेचे उत्पन्न वाढेल व आवश्यक सुविधा देता येईल. जेव्हा एमआयडीसीची निर्मिती झाली तेंव्हा २०-२५ वर्षासाठीच कर मुक्त सवलत होती.लिगली समावेश केल्यास अडचण येणार नाही. या गावांचा समावेश केल्यास योग्य होईल.

श्री.राजू शिंदे :यापूर्वी १८ खेडी घेतली तेथील ५०-६० डीपी रस्ते पैकी १० टक्के सुध्दा विकास होऊ शकला नाही. शिवाय सातारा परीसर मनपाकडे येत आहे. शिवाय गुंठेवारी वाढलेली आहे. झालर क्षेत्र सिडकोने घेतले फक्त प्लॅनींग केले लोकांकडून ८० कोटी भरून घेतले व नंतर शासनाकडे पत्र देऊन कळविले की या भागाचा विकास करू शकत नाही. २६ गांवचा समावेश केल्यास विकास या शहराचा करू शकत नाही या गावाचे क्षेत्र भौगोलिक दृष्टया हे झालर क्षेत्र म्हणून आहे. हे करण्यास १०-१५ वर्ष लागतील शासनाला विनंती करावी की या क्षेत्राचे नवीन प्राधीकरण करावे ही गांवे समाविष्ट केल्यास पुन्हा २०X३० प्लॉटींग होईल या शहरातील आता आहे त्या परीसराचा विकास कसा होईल ते पहावे. २६ गांवे समाविष्ट करू नये. विषय रद्द करावा माझा यास विरोध आहे.

श्री.भाऊसाहेब जगताप : सन १९८७-८८ मनपात १८ खेडयाचा समाविष्ट झाला. मनपात येऊन २७ वर्ष झाले सुविधा मिळत नाही. २६ गावांचा समावेश करू नये. शहरातील बराच भाग असा की तेथे सुविधा उपलब्ध नाही.

श्री.अ.रहिम नाईकवाडी : २६ गावामध्ये एमआयडीसी भाग किती आहे.१९८५ पासून कोणतेही कर्मचारी भरती केले नाही. शहरातीलच सुविधा पुरवू शकत नाही.हे क्षेत्र मनपात घेवू नये.

श्री.गजानन बारवाल :यापुर्वी १८ खेडी समावेश केली. आजही अनेक सुविधा नाही जनता नाराज आहे. गुंठेवारी भाग वाढला आहे. त्यामूळे हा विषय मंजूर करू नये.

| | |
|---|---|
| श्री.नंदकुमार घोडेले | :मंजुर करावे. या २६ गावांचा विकास करणार जे आर्थीक नियोजन करतात त्या बाबतीत प्रेझेन्टेशन प्रिट सभागृहास दाखवावी पीएमसी नियुक्त करून तज्ञाचे मत घेवून कार्यवाही करावी. |
| श्री.राजू शिंदे | :मा.आयुक्ताचे या विषयी काय मत आहे. गरज पडल्यास यावर मतदान घ्यावे. हा विषय मंजूर करण्यास माझा विरोध आहे. |
| श्री.अ.रहिम नाईकवाडी | :मतदान घ्यावे. आज मंजूर करू नये चर्चा व्हावी. |
| श्री.राजू शिंदे | :स्थगित ठेवावे नसता मतदान घ्यावे. |
| मा.महापौर | :औरंगाबाद महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या झालर क्षेत्रातील दोन गावांचा (सातारा-देवळाई) समावेश महानगरपालिका हद्दीत झालेला आहे. उर्वरित गावांसाठी महानगरपालिके व्यतिरीक्त इतरही नियोजन प्राधिकरण आहेत. या शिवाय मनपा हद्दीलगत असलेल्या व मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झालेल्या वाळूज, पंढरपुर व रावरसपुरा या भागासाठीही वेगवेगळे नियोजन प्राधिकरण आहेत. त्यामुळे विकास प्रक्रियेत व एकत्रितपणे काही योजना आखण्यास अडथळा येतो. ही बाब लक्षात घेता, संपुर्ण झालर क्षेत्र (२६ गावे) मनपा क्षेत्रात समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येते.<br>याशिवाय रावरसपुरा, वाळूज, पंढरपूर या गावांचा एम.आय.डी.सी.सह महानगरपालिका क्षेत्रात समावेश करण्यास मान्यता देण्यात येते. वाळूज, पंढरपूर एम.आय.डी.सी.स्थापनेवेळी औद्योगिक वसाहत व स्थानिक प्राधिकरणात झालेल्या कराराची माहिती घेऊन एम.आय.डी.सी.सह वाळूज, पंढरपूर या गावांचा समावेश महानगरपालिका हद्दीत करण्याची कार्यवाही एकत्रित पणे करण्यात यावी. प्रस्तावास दुरूस्तीसह मान्यता देण्यात येते. |

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या झालर क्षेत्रातील २८ गावांपैकी दोन गावांचा (सातारा व देवळाई) समावेश महानगरपालिका हद्दीत झालेला आहे. उर्वरित २६ गावांसाठी महानगरपालिका व्यतिरीक्त इतर नियोजन प्राधिकरण व स्थानिक प्राधिकरण आहेत. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत व विकास प्रक्रियेत एकसंघपणा राहत नाही व एकत्रितपणे काही योजना आखण्यास अडथळा येतो. ही बाब लक्षात घेता झालर क्षेत्रातील सर्व २६ गावे व रावरसपुरा या गावाचा समावेश महानगरपालिका हद्दीत करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच महाराष्ट्र शासन व वाळूज,पंढरपुर औद्योगिक वसाहत तथा स्थानिक प्राधिकरण यांच्यात झालेल्या कराराची माहिती घेऊन त्या करारानुसार काही कायदेशीर अडचण नसल्यास औद्योगिक वसाहत,वाळुज,पंढरपुर या गावांचा समावेश महानगरपालिका हद्दीत करण्याची कार्यवाही एकत्रितपणे करण्यात यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३ चे पोटकलम-३ खंड(अ) नुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. यासंदर्भाने पुढील कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यात येतात. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १७५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात अनेक गुंठेवारी वसाहती आहेत. या वसाहतीमध्ये जलवाहिनी व जलनि:सारण वाहिनी टाकण्यात येत नाहीत, त्यामुळे नागरीकांना अनेक समस्यांना सामोरी जावे लागते. याचा दुष्परिणाम संपूर्ण शहरावर होतो.

आपले शहर स्मार्ट सिटीकडे वाटचाल करीत असतांना शहरातील ड्रेनेज सिस्टिम अद्यावत असणे आवश्यक आहे. गुंठेवारी वसाहतीमधून निघणारे मल:जलाची जर योग्यरित्या विल्हेवाट लावली गेली नाही तर संपूर्ण शहरावर त्याचा अनिष्ट परिणाम होऊन घाणीचे साम्राज्य पसरेल.

आपल्या शहराचा स्मार्ट सिटी मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने व शहरातील नागरीकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी गुंठेवारी वसाहतीमध्ये जलवाहिनी व जलनि:सारण वाहिनी टाकण्याबाबतचा प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविण्यात यावा.

**सुचक:-**श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य.

**अनुमोदक:-** श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.दिलीप गंगाधर थोरात, श्री. खान जहाँगीर मुलानी,श्री. भगवान देविदास घडमोडे श्री.गजानन रामकिसन बारवाल,श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप,श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन.

मा.महापौर :स्मार्ट सिटी कडे जात असतांना शहराचे अधिकृत व अनधिकृत असे दोन भाग करता येणार नाही. काम करण्यास काही कायदेशीर अडचणी येत असतील म्हणुन शहरातील सर्व भागासाठी ड्रेनेज व जलवाहिनी टाकण्याची व संबंधीत कामे करण्याकरीता या ठरावास मंजुरी देण्यात येते. शासनाकडे पाठवून स.पदाधिकारी आपण सर्व यासाठी मा.मुख्यमंत्री यांना तसेच संबंधीत खात्याचे मा.मंत्री महोदय व मा.पालकमंत्री यांना सुध्दा विनंती करु की यास मान्यता द्यावी. शहराच्या मध्यभागी व परीसरात २०-३० वर्षापासून वसाहती आहे. लोकांनी गुंठेवारी भरली तेथे कामे सुध्दा झाली. आता तेथे कामे करता येणार नाही. हा निकष लावता येणार नाही.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराचा स्मार्ट सिटी मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने व शहरातील नागरीकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी गुंठेवारी वसाहतीमध्ये जलवाहिनी व जलनि:सारण वाहिनी टाकण्याबाबतचा प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक १७६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरातील खेळाडुंसाठी महापौर चषक स्पर्धा घेण्यात येत होत्या. परंतु गेल्या काही वर्षापासून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने सदरील स्पर्धा घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे शहरातील खेळाडु स्पर्धेपासून वंचित राहीलेले असल्याने त्यांच्या खेळाला चालना मिळावी यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे औरंगाबाद डिस्ट्रीक्ट पॅरालिंपीक

असोसिएशनच्या वतीने अंध,अपंग व मतीमंद खेळाडूंसाठी महापौर चषक ११ वी पॅरा राज्य जलतरण स्पर्धेचे सप्टेंबर-२०१५ मध्ये आयोजन करण्यात यावे व या स्पर्धेसाठी रक्कम रूपये ०२.०० लक्ष पर्यंत खर्चास मान्यता देणेबाबत चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-**श्री.नितीन रमन चित्ते

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे औरंगाबाद डिस्ट्रीक्ट पॅरालिंपीक असोसिएशनच्या वतीने अंध,अपंग व मतीमंद खेळाडूंसाठी ११ वी पॅरा राज्य जलतरण महापौर चषक स्पर्धेचे आयोजन करण्यास व या स्पर्धेसाठी लागणाऱ्या रक्कम रूपये १.५० लक्षच्या खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १७७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रात दररोज सरासरी ४५० मेट्रीक टन घनकच-याची उत्पत्ती होते. मात्र दररोज उत्पत्ती होणा-या घनकच-याच्या साठवणुकीसाठी व वाहतुकीसाठी पुरेशी यंत्रणा औरंगाबाद महानगरपालिकेकडे नाही. महानगरपालिकेकडे असलेल्या ५८ हैड्रॉलिक हॉपर्सद्वारे घनकचरा संकलित करुन स्कीप लोडर बिन्स व हुक लोडर कंटेनर मध्ये टाकण्यात येतो. परंतु घनकचरा साठविण्यासाठी असलेले बिन्स /कंटेनर्स कमी असल्यामुळे अनेक ठिकाणी ओपन डंपिंग स्पॉट्स तयार झाले आहेत. तसेच अपार्टमेंटस मधील नागरीकांना एकत्रीत कचरा साठवणुकीसाठी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे देखील ओपन डंपिंग स्पॉटसच्या संख्येत वाढ होत आहे. सदरील ओपन डंपिंग स्पॉट्समुळे लगतच्या परिसरात दुर्गंधी पसरुन साथीच्या रोगाची लागण होण्याची शक्यता असते.

ओपन डंपिंग स्पॉटस कमी करण्याच्या दृष्टीने हैड्रॉलिक हॉपरद्वारे संकलित केलेला घनकचरा साठविण्यासाठी ४.७ घ.मी. क्षमतेचे ६० स्कीपलोडर बिन्स, या स्कीपलोडर बिन्सच्या वाहतुकीसाठी ०६ स्कीपलोडर मशिन्स आणि अपार्टमेंटस मधील नागरीकांसाठी १००० नग बल्क जनरेशन बिन्स (क्षमता २४० लिटर) खरेदी करणे गरजेचे आहे. सदरील बिन्स व मशिनरीच्या खरेदीसाठी रक्कम रुपये २२७.०० लक्ष खर्च अपेक्षीत असुन खरेदीसाठी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यास निधी उपलब्धतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत महाराष्ट्र सूवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. महाराष्ट्र सूवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने नुसार प्रस्तावास मान्यता मिळाली तर अपेक्षीत खर्चापैकी ५० टक्के निधी (रुपये ११३.५० लक्ष) शासनाकडुन प्राप्त होईल. उर्वरीत ५० टक्के रक्कम महानगरपालिकेस खर्च करावी लागेल.

करीता घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी आवश्यक ०६ स्कीप लोडर मशिन्स, ६० स्कीपलोडर बिन्स व १००० बल्क जनरेशन बिन्स खरेदी करीता रुपये २२७.०० लक्ष खर्चाचे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील घनकचरा वाहतुकीसाठी पुरेशी यंत्रणा नसल्यामुळे घनकचरा संकलीत करुन वाहतुक करण्यासाठी ४.७ घ.मी. क्षमतेचे ६० नग स्कीपलोडर बिन्स, या बिन्सच्या वाहतुकीसाठी ०६ नग स्कीपलोडर मशिन्स व २४० लिटर क्षमतेच्या १००० नग बल्क जनरेशन बिन्स खरेदी करणेसाठी रक्कम रुपये २२७.०० लक्षच्या खर्चास मान्यता देण्यात येते. सदरील बिन्स व मशिनरी खरेदीसाठी ५० टक्के निधी (११३.५० लक्ष)

शासनाकडुन प्राप्त झाल्यास उर्वरीत ५० टक्के रक्कम महानगरपालिकेच्या फंडातुन खर्च करणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.सुभाष शेजवळ :दलित वस्ती सुधार योजनेचा २७ कोटीचा निधी परत गेला त्या विषयी चर्चा करावी.

श्री.कैलास गायकवाड :सन २०११ ला शासनाने महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ९० टक्के शासकीय अनुदान व उर्वरीत लाभार्थी सहभाग म्हणून शौचालयसाठी १२ व नळ जोडणीसाठी ४ हजार असा महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान प्रोजेक्ट आणले व पीएमसी नेमली त्या एजन्सीने स्लम व झोपडपट्टी भागात शौचालय व नळ जोडणीचा सर्वे करून वर्षभर काम केले शासनाकडे पाठविले.शासनाने ऑगस्ट २०११ ला मान्यता दिली ३७ कोटी मंजूर केले १० टक्के लाभार्थी निधी म्हणून ३० लक्ष शासनाकडे पाठवायचे होते.ते तात्काळ पाठविले नाही.स्थायी समितीने आदेशीत केले लेखा विभागाने पाठविले नाही.मागिल तीन महिण्यापूर्वी व्ही.सी झाली मा.आयुक्त उपस्थित होते चार दिवसात धनादेश पाठविला जाईल असे त्यावेळी सांगण्यात आले तरी ही चेक दिला नाही ५ महिणे प्रलंबीत होते त्यावर लेखा विभागाने ११० कोटीचे चेक वितरीत केले.शासनाने योजना मंजूर केली होती प्रशासनाला यांचे गांभीर्य वाटले नाही.जाणीवपुर्वक दिरगांई झाली.शासन अनुदान मिळाले नाही जे या प्रकरणात दोषी असतील त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

श्री.सुभाष शेजवळ :या संबधीचा जीआर व शासनाचे पत्र आहे शासनाचा परत गेलेला निधी पुन्हा मिळविण्यासाठी प्रयत्न करावे व दलित वस्तीमध्ये यातून कामे व्हावी.

श्री.कैलास गायकवाड :योजना बंद झाल्यानंतर ३० लक्षचा धनादेश दिला ते परत मिळणार की नाही.कोण जबाबदार आहे.जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.चेतन कांबळे :घरकूल व इतर दलित वसाहतील योजने पासून वंचित ठेवणारे जे कुणी असेल चौकशी करावी त्याचेवर कायदयानुसार कार्यवाही करावी.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : ५ सप्टेंबर २०१४ रोजी शासनाने पत्र पाठूवन २७ कोटीचा डीपीआर मंजूर केला टेक्नीकल स्कुटनीसाठी ३०.६४ लक्ष भरावे म्हणून कळविले ही योजना बंद झाली नाही ही योजना स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजनेमध्ये समाविष्ट झाली दोन घटकासाठी होते आता सर्व गरजू लाभार्थीसाठी १२ हजार अनुदान राज्यशासन देणार आहे.

श्री.कैलास गायकवाड :ही योजना शासन राबविणार का चुकीची माहिती देऊ नये.

श्री.चेतन कांबळे :नवीन योजनेत दलित वस्तीमध्ये नळ व पाईप जोडणी होणार का ?

कार्य.अभियंता(स्लम) : राज्य शासनाचे संबधीत विभागात चौकशी केली मा.उपसचिव यांनी म्हटले की जरी वैयक्तिक शौचालय स्कीम स्वच्छ महाराष्ट्र शासन मध्ये

| | |
|---|---|
| | समावेश केली तरी नळ जोडणी स्कीम लागू आहे ४ हजार रूपये नळ जोडणी लाभार्थीस नळ जोडणीस मिळतील. |
| श्री.सुभाष शेजवळ | : जो निर्णय सांगता तो केंद्र शासनाचा आहे.हा निधी महाराष्ट्र शासनाचा होता.२३ नगरपरिषदेला मंजूरी होती २२ नगरपरिषदेने फायदा घेतला या महापालिकेने घेतला नाही गेलेला निधी परत आणावा. |
| मा.महापौर | :योजना कधी आली किती अधिकारी यांचे संबधीत हे प्रकरण होते. |
| कार्य.अभियंता(ड्रेनेज) | : २०१० ला शासन निर्णय २०११ ला योजना सुरू झाली.पीएमसीची नेमणूक केली रितसर सर्वे करून १८०५४ घरे शोधली रेकॉर्ड केले डीपीआर तयार केले. |
| श्री.राजू शिंदे | :१४ जाने.२०११ ला ही स्कीम लागू झाली २०१५ चालू आहे. योजना आली शासनाचे पत्रानुसार १० टक्के लाभार्थी व ९० टक्के शासन अनुदान यात १२ हजार शौचालय व ४ हजार नळ जोडणीसाठी होते. ३७ कोटी १४ हजार रकमेचे पत्र आले. त्यानंतर ४ फेब्रुवारी १४ ला महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी राज्य स्तरीय समन्वय समीतीची बैठक झाली इतरही अनेक बैठका झाल्या. शासनाने वेळोवेळी निर्देशीत केले २३ महापालिकेला योजना लागू झाली. २२ महापालिकेने योजनेचा लाभ घेतला या महापालिकेने घेतला नाही.या संदर्भात मा.आयुक्तांकडेही पत्राची प्रत आली विभागीय आयुक्त कार्यालय बैठक झाली. त्यावेळी आयुक्तांनी हे पैसे भरण्या संदर्भात कळविले. मनपाची आर्थीक परीस्थिती खराब आहे.असे असतांना २७ कोटी निधी का मिळवून घेतला नाही.शासनास ३० लक्ष रक्कम वेळेवर का भरली नाही उशीर का केला शासनाचे अनुदान तर मिळालेच नाही परंतु महापालिकेने ३० लक्ष भरणा केले कुणाची जबाबदारी येते.दलित वस्ती मध्ये खर्च होत होते म्हणून पैसे भरणा केले नाही का. १० कोटीचा हप्ता मिळणार होता शहरात ११४ अनधिकृत वस्ती व ५२ स्लम दलित वस्ती घोषीत आहे ही रक्कम येथे खर्च केली असती तर महापालिकेला खर्च करावा लागला नसता संबधीत अधिकारी यांचेवर काय कार्यवाही करणार आहे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :आर्थीक परीस्थिती खराब असतांना शासनाचा निधी परत जातो गंभीर बाब आहे.आयुक्तांनी निर्देश देऊन पैसे भरले नाही जे कुणी दोषी असेल कार्यवाही करावी. |
| श्री.राजू शिंदे | :पीएमसीचे १.५० कोटी खर्च केले.पीएमसीने वेळोवेळी सांगितले मा.आयुक्तांनी सुध्दा निर्देश दिले मुदत संपल्यानंतर पैसे भरले. |
| मा.आयुक्त | :हा निधी परत गेला असला तरी पुन्हा शासनाकडे प्रस्ताव पाठवून हा निधी परत मिळण्याची कार्यवाही करू.पैसे मिळविण्याचा प्रयत्न करू. |
| मा.महापौर | :३० लक्ष भरायचे होते ३७ कोटी मिळणार होते यामुळे बजेटमधील कामे करण्याची गरज पडली नसती.मा.आयुक्तांनी या संदर्भात चौकशी करावी आठ दिवसात अहवाल सादर करावा. |

श्री.चेतन कांबळे :१४-७-१५ च्या व्हिडीओ कॉन्फंरन्सचे पत्र लेखाधिकारी यांना आहे त्यात दिले की निधी प्राप्त न झाल्यास आपल्या विभागाची जबाबदारी राहिल असे असतांना पैसे का भरले नाही. दलित लोकांना त्यांचे हक्कापासून वंचित ठेवण्याचे काम करीत असेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.कैलास गायकवाड :३७ कोटी मिळणार होते. संबधीत जे कुणी जबाबदार असतील त्यांना निलंबीत करावे नंतर चौकशी करावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-७)

**सोमवार दिनांक १४.०९.२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.पालिका सदस्य श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ (प्रभाग क्रमांक-११२) :-**

**प्रश्न क्रमांक १३३:-**

एअरटेल कंपनीला आपण पावसाळयानंतर खोदकामाची परवानगी दिली असतांना त्यांनी पावसाळयात खोदकाम केले. याबाबत मनपा प्रशासनाने काय कार्यवाही केली?

**उत्तर: अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १३४:-**

महानगरपालिकेने ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी जी रॉड्रींग मशीन खरेदी केली त्यासाठी किती खर्च झाला? व ती मशीन किती ठिकाणी उपयोगात आणल्या?

**उत्तर: कार्यकारी अभियंता (वार्ड ब/क), महानगरपालिका औरंगाबाद.**

महानगरपालिका हद्दीतील प्रभाग-अ ते फ मधील एकुण ९९ निवडणुक वार्डाचे ड्रेनेज चोकअप व ड्रेनेज लाईन मधील काळानुरुप गाळ/मलबा साचल्याने वार्ड कार्यालयात ड्रेनेज चोकअपच्या दैनंदिन तक्रारी मोठ्या प्रमाणात येत होत्या. चोकअप व गाळ काढणेच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी व ड्रेनेज लाईन मध्ये गाळ काढणे/साचणारा गाळ साफ करणे करीता माणसाऐवजी पॉवर बकेट मशीन व पॉवर रॉडींग मशीनचा वापर करुन प्रभाग निहाय प्रभाग-अ ते फ या प्रमाणे एकुण सहा यंत्राचे संच खरेदी करण्यास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६९७/११, दिनांक २०.०१.२००७ च्या मंजुरी नुसार निविदा प्रक्रिया करुन निविदेस मा.स्थायी समिती ठराव क्र.१२१, दिनांक ०४.०९.२००७ अन्वये प्रती संच रक्कम रु.७,१४,०००/- प्रमाणे एकुण रक्कम रु.४२,८४,०००/- यास मान्यता प्राप्त झाली होती. त्यानुसार दिनांक १०.१०.२००७ अन्वये सदरील मशीन खरेदी करण्यात आल्या आहेत.

सदरील कामासाठी एकुण रक्कम रु.४२,८४,०००/- खर्च झालेला आहे. खरेदी केलेल्या मशीन प्रभाग अ ते फ या वार्डात विविध ठिकाणी वापर करण्यात आलेला आहे. त्याची वार्डनिहाय यादी सोबत जोडण्यात आली आहे.

**प्रश्न क्रमांक १३५:-**

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्लास्टीक कचरा हाताळणी बाबत त्रैमासिक अहवाल शासनास पाठविला आहे काय?

**उत्तर: उपआयुक्त (प्रशासन) तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख , महानगरपालिका औरंगाबाद.**

घनकचरा व्यवस्थापन कक्षातील उपलब्ध अभिलेखे तपासले असता मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्लास्टीक कचरा हाताळणीबाबत त्रैमासिक अहवाल आलेला नसल्याचे दिसते.

**स.पालिका सदस्य श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे (प्रभाग क्रमांक-८६)**

**प्रश्न क्रमांक १३६ ते १३८:-**

**उत्तर:- मुख्य अग्निशम अधिकारी, अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १३६ | औरंगाबाद शहरात व्यावसायीक इमारती एकुण किती आहेत? | १९८७ ते २०१५ पर्यंत औरंगाबाद शहरात व्यावसायीक इमारती एकुण ५५० आहेत. |
| १३७ | अग्निशमन विभागातर्फे आज पर्यंत किती इमारतींना Fire NOC देण्यात आली आहे? ज्या इमारतींना किंवा मालकांना NOC दिली त्यांनी कोणत्या एजन्सीकडुन Fire चे साहित्य खरेदी केले त्याची माहिती घेण्यात येते काय? त्याची Receipt घेण्यात येते काय? व्यावसायीक इमारतीचे परत रिव्हिजन करण्यात येते का? | अग्निशमन विभागातर्फे १९८७ ते २०१५ पर्यंत व्यावसायीक एकुण ५०९ इमारतीस फायर एनओसी देण्यात आली व त्या इमारतीस महाराष्ट्र शासनातर्फे लायसन्सधारक खालील प्रमाणे फायर एजन्सीजकडुन अग्निशमन सुरखा उपकरणाची पुर्तता करण्याचे कामे संबंधीत इमारत मालकातर्फे करण्यात येते.<br>१) रचना इंजिनिअरींग फायर सर्व्हिसेस<br>२) न्युओसेस फायर एजन्सी<br>३) मनिष फायर<br>४) मे.ॲडव्हान्टेज साई प्रोजेक्टस प्रा.लि.<br>५) रुद्राणी फायर सर्व्हिसेस<br>६) ग्राफिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७) सदगुरु फायर<br>८) श्री फायर सर्व्हिसेस<br>९) के.व्ही. कार्पोरेशन<br>१०) ओम फायर सर्व्हिसेस<br>११) जी एम पी फायर सर्व्हिसेस<br>१२) प्राक.तिक फायर सर्व्हिसेस<br>१३) निरो फायर सर्व्हिसेस<br>१४) के के फायर सर्व्हिसेस इत्यादी फायर एजन्सीकडुन कामे इमारत मालकाकडुन करण्यात आलेला आहेत. सदरील व्यवसायीक इमारतीस प्रत्येक वर्षी नुतनीकरणासाठी इमारती मालकाकडुन लायसन्स एजन्सी तर्फे ए. व बी. फॉर्म मध्ये रिपोर्ट मागविण्यात येतो व नुतनीकरण करण्यात येते. |
| १३८ | अग्निशमन साहित्य विक्रीच्या शहरात अधिकृत किती एजन्सी आहेत? त्याची नावे व माहिती देण्यात यावी. | अग्निशमन साहित्या विक्रीच्या शहरात अधिकृत एकुण १४ फायर एजन्सी आहेत त्याची नावे पुढील प्रमाणे<br>१) रचना इंजिनिअरींग फायर सर्व्हिसेस |

| | | |
|---|---|---|
| | | २) न्युओसेस फायर एजन्सी<br>३) मनिष फायर<br>४) मे.ॲडव्हान्टेज साई प्रोजेक्टस प्रा.लि.<br>५) रुद्राणी फायर सर्व्हिसेस<br>६) ग्राफिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७) सदगुरु फायर<br>८) श्री फायर सर्व्हिसेस<br>९) के.व्ही. कार्पोरेशन<br>१०) ओम फायर सर्व्हिसेस<br>११) जी एम पी फायर सर्व्हिसेस<br>१२) प्राक.तिक फायर सर्व्हिसेस<br>१३) निरो फायर सर्व्हिसेस<br>१४) के के फायर सर्व्हिसेस इत्यादी |

**प्रश्न क्रमांक १३९:-**

मा.आयुक्त कार्यालयाकडे मागील सहा महिन्यापासुन किती संचिका प्रलंबित आहेत? त्याची विभागवार माहिती प्रलंबित कोणत्या कारणास्तव आहे यासह देण्यात यावी.

**उत्तर: अप्राप्त.**

**स.पालिका सदस्य श्री.विजय साईनाथ औताडे (प्रभाग क्रमांक-०७)**

**प्रश्न क्रमांक १४०:-**

मालमत्ता कराविषयी मा.उच्च न्यायालय/मा.दिवाणी न्यायालय येथे थकबाकी संदर्भात किती प्रकरणे चालू आहेत? व करमुल्य निर्धारक व संकलक या विभागाने शहराचा (Block) सर्व्हे केला आहे का?

**उत्तर: विधी सल्लागार, महानगरपालिका औरंगाबाद.**

मालमत्ता करा विषयी सन-२०१३ ते सन-२०१५ या कालावधीत मा.उच्च न्यायालय व दिवाणी न्यायालयात चालु असलेल्या प्रकरणाची माहिती खालील प्रमाणे.

मा.उच्च न्यायालयात मालमत्ता कराची २१ प्रकरणे व मा.दिवाणी न्यायालयात मालमत्ता कराची ८२ प्रकरणे आहेत.

**स.पालिका सदस्य खान इरशाद इब्राहिम (प्रभाग क्रमांक-४१)**

**प्रश्न क्रमांक १४१:-**

सेंट्रल नाका ते टी.व्ही.सेंटर चौक पोलीस कॉलनी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम कोणत्या गुत्तेदारास किंवा एजन्सीला देण्यात आलेले होते. संबंधित गुत्तेदाराने निवीदेतील अटी व शर्ती प्रमाणे काम पुर्ण केलेले आहे का? सदरील कामाचे आज पर्यंत किती देयक अदा करण्यात आलेले आहे. तसेच या कामाच्या निवीदेची प्रत देण्यात यावी व सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर : कार्यकारी अभियंता (अ व ड), महानगरपालिका औरंगाबाद.**

सेंट्रल नाका ते टि.व्ही. सेंटर पोलिस कॉलनी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांना सन २००६-०७ मध्ये देण्यात आले होते. होय, संबंधीत गुत्तेदाराने

निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे काम पुर्ण केलेले आहे. तसेच सदरील रस्त्याचा सदोष दायित्व कालावधी देखील पुर्ण झालेला आहे.

सदरील कामे हे डिफर्ड पेमेंट (२००६-०७) अंतर्गत असुन सदरील कामामध्ये एकुण ६ रस्त्यांचा समावेश करुन एकत्रित निविदा काढलेली होती. याच एकत्रित निविदेतील एक काम म्हणजे सेव्हन हिल ते टि.व्ही. सेंटर पर्यंतचा रस्त्याचे होते. या प्रमाणे निविदेतील ६ रस्त्यांच्या कामाची निविदा एकच होती. या रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ६.५९ कोटी इतके होते व या कामावर रक्कम रुपये ५.५० कोटी खर्च झालेला आहे.

**प्रश्न क्रमांक १४२:-**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या उपआयुक्त पदांच्या संदर्भात मी माहिती घेतली असता उप आयुक्त महसुल यांनी त्यांचे पत्र जाक्र/मनपा/आस्था-१/२०१५/६०४ दिनांक १६.०७.२०१५ प्रमाणे दिलेल्या माहितीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उप आयुक्त संवर्गातील (कर निर्धारक व संकलक या पदासह) एकुण ०४ पदे मंजुर असुन सदर पदावर शासनाकडुन आलेले दोन उप आयुक्त तसेच मनपाचे दोन उप आयुक्त व त्याचेकडील विभागाचे नांव नमुद करण्यात आलेले असुन कोणत्या ही उपायुक्ताकडे (कर निर्धारक व संकलक) या पदाचा कार्यभार देण्यात आलेला नाही.

करीता सध्या कर निर्धारक व संकलक या पदाचा कार्यभार मनपा मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्याकडे देण्यात आलेला आहे. मुख्य अग्निशमन अधिकारी हे अति आवश्यक सेवेत येत असल्याने मनपा अधिनियमातील कोणत्या तरतुदी किंवा कलमा प्रमाणे पदभार देता येतो का? तसेच वरील प्रमाणे चार ही उपायुक्तां पैकी एकही उपायुक्त कर निर्धारक व संकलक या पदासाठी सक्षम नाही का? याचा खुलास करण्यात यावा.

**उत्तर:- आस्थापना अधिकारी-१, महानगरपालिका औरंगाबाद.**

कार्यालयीन कामकाज व्यवस्थितपणे चालविण्याचे दृष्टीने कोणत्या अधिकाऱ्याकडुन कोणते काम करुन घ्यावयाचे याबाबतचे प्रशासकीय अधिकार आयुक्तांना आहेत. महापालिकेत अधिकाऱ्यांची संख्या कमी असल्याने उपलब्ध अधिकाऱ्यांकडुन आवश्यक असेल त्या पदाचे कामकाज करुन घेण्यात येते. तथापि, श्री.एस.बी.झनझन, मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्याकडील कर निर्धारक व संकलक या पदाचा अतिरिक्त कार्यभार काढण्यात आलेला आहे.

**प्रश्न क्रमांक १४३:-**

औरंगाबाद शहरात व्हॉईट टॉपिंगचे रस्ते कुठे कुठे झाले, व ते किती किलो मिटरचे झाले व त्याकामावर किती खर्च करण्यात आलेला आहे? तसेच त्यापैकी किती रस्ते पूर्ण झाले व किती अपूर्ण आहे याची माहिती देण्यात यावी.

**उत्तर: उपअभियंता (वार्ड-ब), महानगरपालिका औरंगाबाद.**

**वार्ड अभियंता (ब) उप विभागा अंतर्गत सन २०१३-१४ करीता विशेष रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत**

**हाती घेण्यात आलेल्या रस्त्यांचे व्हाईट टॉपिंग कामाची यादी.**

| अ. क्र | कामाचे नाव | अं.प.र.रु. | कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च र.रु. | तयार करण्यात आलेल्या रस्त्यांची लांबी | रस्त्याची सद्यस्थिती काम पुर्ण/अपुर्ण |
|---|---|---|---|---|---|

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १. | भाई उध्दवराव पाटील चौक ते सिध्दार्थ नगर चौक ते टि.व्ही. सेंटर डांबरीकरण व व्हाईट टॉपींग करणे.(Part A & B) | २,७५,८३,००० | २,४१,५०,६४५/- | एकुण लांबी (Part A & B) १७१० मी.आहे. Part A - सरासरी काम पुर्ण-८१५ मी. Part B - सरासरी काम पुर्ण-५०५ मी. | काम अपुर्ण/ प्रगती पथावर |
| २. | सेंट्रल जकात नाका ते एस.बी.आय.एन -१ चौक जळगाव रोड पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. | ४,५२,५८,५५७ | ३,७९,३४,४१८/- | एकुण लांबी १२०५ मी. आहे. सद्यस्थितीत कॅरेजवे कॉंक्रीटीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे. फुटपाथची व रोड फर्निचरची कामे बाकी आहेत. | काम अपुर्ण/ प्रगती पथावर |
| ३. | लेमन ट्री हॉटेल ते जालना रोड ते हर्सुल टी पाईंट पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे. | ३,१२,७८,००० | ३,१७,५१,९७२/- | एकुण लांबी ३५०० मी. लांबीच्या रस्त्याचे कॅरेजवे कॉंक्रीटीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे. साईड शोल्डर फिलींगचे काम बाकी आहे. | काम अपुर्ण/ प्रगती पथावर |
| ४. | सिडको वार्ड ब अंतर्गत एन-८ भागातील पोलिस मेस ते बळीराम पाटील शाळा ते आंबेडकर नगर चौक पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे. | २,५२,०६,९१८ | निरंक | अद्याप काम सुर झालेले नाही. | --------- |
| ५. | वार्ड क्र.२५ सिडको एन-७ येथिल हॉटेल | १,१३,०७,३०० | ६७,३१,८६४/- | एकुण लांबी ५५६.६१ मी. असुन सद्यस्थितीत कॅरेजवे कॉंक्रीटीकरणाचे | काम अपुर्ण/ प्रगती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सनी ते ओंकार गॅस एजन्सी पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे. | | | काम पुर्ण झालेले आहे. फुटपाथाची व रोड फर्निचरची कामे बाकी आहेत. | पथावर |
| ६. | वार्ड ब अंतर्गत टि.व्ही.सेंटर चौक ते जळगाव टी जंक्शन या मुख्य रस्त्याचे मजबुतीकरण व व्हाईट टॉपींग | ९९,९९,१०० | निरंक | एकुण लांबी ४६०मी. एका बाजुचे ४६० मी. कॉंक्रीटीकरण पुर्ण झालेले असुन दुसऱ्या बाजुचे १६० मी.कॉंक्रीटीकरण पूर्ण झालेले आहे. फुटपाथची व रोड फर्निचरची कामे बाकी आहेत. | काम अपुर्ण/ प्रगती पथावर |

**उत्तर : कार्यकारी अभियंता (अ व ड), महानगरपालिका औरंगाबाद.**

| अ. क्र | रस्त्याचे नांव | रस्त्यांची लांबी | काम झालेल्या रस्त्याची लांबी | झालेला खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | क्रांतीचौक ते पैठणगेट या विकास योजना रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे. तसेच सावरकर चौक ते क्रांती चौक पोलिस स्टेशन या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे. | ९५०.०० मी. | ५५० मी. | १.८४ कोटी | या रस्त्या अंतर्गत पैठणगेट जवळील पश्चिम बाजुचा रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. |
| २. | सावरकर चौक ते सतिश पेट्रोल पंप ते कोकणवाडी चौक या २४.०० मीटर वि.यो.रस्त्याचे तसेच नुतन कॉलनी ते क्रांतीचौक पोलिस स्टेशन या १५.०० मिटर वि.यो.रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे. | १६९०.०० मी. | १६९० मी. | ३.०० कोटी | या रस्त्याचे कॉंक्रेटींगचे काम पुर्ण झालेले आहे. |

**स.पालिका सदस्य श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले (प्रभाग क्रमांक- १०७)**

**प्रश्न क्रमांक १४४:-**

वॉटर ग्रेस प्रॉडक्टर्स जैविक कचरा प्रकल्प केव्हापासून सुरू झाला? सर्वसाधारण सभेच्या ठरावाची प्रत, संबंधीत एजन्सीची सेवा शुल्क वसूली केव्हापासून महानगरपालिका

उपायुक्त यांच्या नावे होती व केव्हापासून मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टर्सच्या नावे आहे? आतापर्यंत किती वसूली झाली व किती रॉयल्टी मिळाली? १००% वसूली झाली का? एजन्सीच्या नावे धनादेश घेण्याचे आदेश कोणी दिले? त्यास सर्वसाधारण सभेची मंजुरी आहे काय? सदर एजन्सीचे लेखापरिक्षण महानगरपालिका, लोकल फंड लेखा परिक्षण, ए.जी.नागपूरांचा रिपोर्ट व त्यावर खुलासा, प्रशासनाने केलेली प्रशायकीय कार्यवाही काय झाली? महाराष्ट्राच्या इतर महानगरपालिकां मध्ये २००३ ते २०१५ पर्यंत सदर एजन्सी काळ्या यादीत टाकण्यात आली का?

**<u>उत्तर: मुख्यलेखापरिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

**<u>जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाच्या चौकशीबाबत प्राथमिक अहवाल</u>**

**<u>प्रस्तावना :-</u>**

औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व हॉस्पीटल, क्लिनीक, डायग्नोस्टिक सेंटर, पॅथालॉजी लॅबोरेटरीज इत्यांदीचा जैविक कचरा विल्हेवाटी साठी BOLT तत्वावर २००३ पासून प्रकल्प कार्यान्वित असून सदरील प्रकल्पाचे काम खाजगी एजन्सी मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस् नाशिक यांचे मार्फत करण्यात येत आहे. एजन्सी तर्फे करण्यात येत असलेल्या कामाबाबत चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत मा.सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी दि. ८.११.२०१२ च्या स्थायी समिती सभेत आदेशित केलेले आहे.

**<u>जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाबाबत प्रामुख्याने आढळलेल्या बाबी :-</u>**

जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प खाजगी एजन्सीमार्फत कार्यान्वीत करताना मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस् यांचे समवेत दि.१९.९.२००२ रोजी केलेल्या करारनाम्यातील अट क्र.११ नुसार सभासदाकडुन प्राप्त होणाऱ्या शुल्कातून रॉयल्टीची रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम प्रकल्प चालविणाऱ्या एजन्सीस प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत अदा करावी, असा स्पष्ट उल्लेख आहे. प्रत्यक्षात मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस् यांचे कडुन सभासदांकडुन वसूल होणारी पूर्ण रक्कम महानगरपालिका फंडात जमा होणे आवश्यक होते. तसे न होता एजन्सी केवळ रॉयल्टीची रक्कम महानगरपालिका फंडात जमा करुन करारनाम्याच्या अटीचा भंग करीत आहे.

करारनाम्यातील अट क्र.२४ प्रमाणे एजन्सीने दररोज सभासदाकडुन जैविक कचरा गोळा करणे बंधनकारक असून जर सभासदाने जैविक कचरा गोळा करणेबाबत संबंधित एजन्सी विरुध्द तक्रार दिल्यास त्याची शहानिशा महानगरपालिके कडुन केली जाईल आणि जर संबंधित एजन्सीने सभासदाच्या तक्रारी नुसार कचरा उचलला नसेल तर प्रतिदिन रु.५००/- दंड आकारण्याची तरतूद आहे. जर एजन्सी ने दंड भरला नाही तर एजन्सीस अदा करावयाच्या रक्कमेतुन दंड कपात करावा. अशी तरतूद नमूद आहे. याबाबत प्राप्त अभिलेखे तपासली असता महानगरपालिकेकडे जैविक कचरा संबंधीत एजन्सीने कचरा गोळा न केल्याबाबत तक्रारी प्राप्त आहेत परंतु करारनाम्यातील अटीनुसार कोणतीही कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेली नाही.

करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी Advisory Committee नेमण्यात आली आहे. कमिटी प्रकल्पास केव्हाही भेट देवू शकेल किंवा महिन्यातुन किमान एक वेळा तरी कमिटीने प्रकल्पास भेट देवून प्रकल्पाच्या कामकाजा बाबतचा अहवाल तयार करुन महानगरपालिकेस सादर करण्याचे अटी शर्तीत नमूद

आहे. जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाचे लेखापरीक्षण विभागास प्राप्त अभिलेखे तपासले असताना Advisory Committee ने प्रकल्पास दिलेल्या भेटी व कमिटीचे प्रकल्पाचे कामकाजाबाबत अहवाल संचिकेत आढळुन आलेले नाहीत. यासंबंधी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना पत्र क्र.मनपा/मुलेप/३६६/२०१२ दि.३०.११.२०१२ अन्वये समितीने प्रकल्पास वेळोवेळी दिलेल्या भेटी संबंधिची अहवाल संचिका आणि प्रकल्पाचे इतर अभिलेखे सादर करण्याबाबत कळविण्यात आले. परंतु आरोग्य विभागाने लेखापरीक्षण विभागास अभिलेखे पुरविलेली नाहीत. प्रकल्पाच्या कामकाजाबाबत करारनाम्यातील अटी शर्ती नुसार Advisory Committee ने भेटी देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न होणे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. कारण प्रकल्प सुस्थितीत चालु आहे काय? प्रकल्पात काही तांत्रिक अडचणी आहेत काय? प्रकल्प चालु नसल्यास जैविक कचऱ्याची विल्हेवाट कशा प्रकारे होते? जर जैविक कचरा विल्हेवाट योग्य त्या शास्त्रोक्त पध्दतीने होत नसेल तर नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होवू शकतो इत्यादी बाबी संबंधी नविनच पेच निर्माण होतो.करारनाम्यातील अटी शर्ती ची पुर्तता न होणे म्हणजेच आरोग्य विभागाची अकार्यक्षमता सिध्द होते.

जैविक कचरा विल्हेवाटी सोबतच महानगरपालिकेस प्राप्त होणारे सेवाशुल्क वसूली बाबतचे आकडेवारी विभागाकडुन प्राप्त झाली आहे. विवरण तक्ता सोबत संलग्न करण्यात येत आहे.

सन २००३-०४ ते सन २०११-१२ या कालवधीत सभासदांकडे सेवाशुल्क स्वरुपात रु १,४१,६२,८७४/- थकीत आहे. तसेच एजन्सी कडे उपरोक्त कालावधीची रु.३१,८९,९९६/- रॉयल्टीची रक्कम थकीत आहे.

करारनाम्यातील अट क्र.११ प्रमाणे वसूल केलेली रक्कम प्रथमत: महानगरपालिका फंडात भरणा केली असती तर एजन्सी कडे थकीत रॉयल्टीची रक्कम प्रलंबीत राहण्याचा प्रश्नच उद्‌भवला नसता. परंतु करारनाम्यातील अटीची पूर्तता आरोग्य विभागाने केलेली नाही यासंबंधी जबाबदारी निश्चित करणे उचीत राहील.

**<u>निष्कर्ष :-</u>**

१) या प्रकल्पाचे संनियंत्रण (Monitoring) अजिबात केले जात नसल्याचे स्पष्ट होते.
२) कराराच्या अटी /शर्तीचे पालन केले जात नाही.
३) नविन दवाखान्यांची नोंदणी, बंद झालेले दवाखाने अनोंदणीकृत करणे (De-Registration) या बाबींवर या प्रकल्पाचे दृष्टीकोणातून,विभागाचे नियंत्रण असल्याचे आढळून आलेले नाही.
४) मोठया प्रमाणात रॉयल्टीची रक्कम थकित आहे, या करीता करारातील अट क्र.११ चे प्रकर्षाने पालन करणे गरजेचे आहे.
५) प्रकल्पाचा प्रमुख उद्देश हा शहरातील जैविक कचरा व्यवस्थितरित्या नष्ट व्हावा हा आहे,परंतू या बाबीवरच विभागाचे नियंत्रण नसल्याने असा घातक (Hazzardous) कचरा शहरातील इतर कचऱ्यासोबत मिसळून गंभीर दुष्परिणाम शहरास भोगावे लागू शकतील.

**<u>उत्तर: आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ०१. | वॉटर ग्रेस प्रॉडक्टस जैविक कचरा प्रकल्प केव्हापासून सुरु झाला? | दि.०१/११/२००३ पासुन वॉटर ग्रेस प्रॉडक्टस जैविक कचरा प्रकल्प सुरु झाले. |
| ०२. | मा. सर्वसाधारण सभा या ठरावाची प्रत | मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५३४ दि. |

| | | |
|---|---|---|
| | | १७/११/२००१ ची प्रत सोबत जोडली आहे. |
| ०३. | संबंधित एजन्सीची सेवा शुल्क वसुली केव्हापासून मनपा उपायुक्त याच्या नावे होती व केव्हापासून मे वॉटर ग्रेस प्रॉडक्टसच्या नावे आहे? | मा. उपायुक्त यांच्या नावे दि. ०१/११/२००३ ते दि.३१/०३/२००७ तत्कालीन मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार मे वॉटर ग्रेस प्रॉडक्टसच्या नावे दि. ०१/०४/२००७ ते पुढे |
| ०४. | आतापर्यंत किती वसुली झाली व किती रॉयल्टी मिळाली? १००% वसुली झाली का? | सभासदाकडून वसुल झालेले वार्षिक सेवा शुल्क रु.८२,३२,९३४/- ठेकेदारास अदा केलेली रक्कम रु.६५,०४,०४१/- मनपास मिळालेली वार्षिक रॉयल्टी रु. १७,२८,९२२/- |
| ०५. | एजन्सीच्या नावे धनादेश घेण्याचे आदेश कोणी दिले? त्यास सर्वसाधारण सभेची मंजुरी आहे काय? | जैविक कचरा प्रकल्प सल्लागार समितीची बैठक दि.१६/०४/२००७ अन्वये मा.आयुक्त मनपा औरंगाबाद यांचे आदेश जा.क्र.मनपा/आरोग्य ९१२/२००७ दि.२०/०७/२००७ आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. |
| ०६. | सदर एजन्सीचे लेखापरिक्षण मनपा, लोकल फंड लेखापरिक्षक ए.जी नागपूर चा अहवाल व खुलासा व प्रशासकीय कार्यवाही काय झाली? | संबंधित माहिती मुख्य लेखापरिक्षक मनपा औरंगाबाद यांच्याशी संबंधित आहे. |
| ०७. | महाराष्ट्र इतर मनपा मध्ये २००३ ते २०१५ पर्यंत सदर एजन्सी काळया यादीत टाकण्यात आले का? | अशी कोणतीही माहिती या कार्यालयास मिळालेली नाही. |

**स.पालिका सदस्या शेख समिना शेख इलियास (प्रभाग क्रमांक-५७)**

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

**प्रश्न क्रमांक १४५ ते १४६:-**

| प्रक्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १४५ | औरंगाबाद शहराच्या मंजुर विकास योजने अंतर्गत जालना रोड ते बायजीपुरा इंदिरानगर ६० फुट रस्ता रुंद करण्यासाठी भुसंपादन का करण्यात येत नाही? या रस्त्यात ज्या मालमत्ता येतात त्यास शासनाच्या वतीने अवार्ड ही झालेले आहेत. या प्रकरणी मा.विभागीय आयुक्त यांच्याकडे वेळोवेळी सुनावणी होऊन आदेश ही देण्यात | औरंगाबाद शहराचा मंजुर विकास योजने अंतर्गत जालनारोड ते इंदिरानगर बायजीपुरा मार्ग टाकळकर सोसायटी ६० फुट रुंद रस्त्यामधील ॲपेक्स हॉस्पीटल मे इंदिरानगर बायजीपुरा या ६० फुट रुंद रस्त्याचे भुसंपादन प्रकरणी विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्यामार्फत अंतिम निवाडा (अवार्ड) घोषित |

| | | |
|---|---|---|
| | आलेले आहे.मग त्यावर अंमलबजावणी का होत नाही? कार्यवाही कधी करण्यात येईल याचा खुलासा करण्यात यावा. | करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी भुसंपादनाची रक्कमही जमा केलेली आहे. भुसंपादनाची कार्यवाही त्वरीत करणे बाबत विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. |
| १४६ | औरंगाबाद शहराचा मंजुर विकास योजनेअंतर्गत इंदिरानगर बायजीपुरा ते टाकळकर सोसायटी ६० फुट रुंद रस्ता करण्यासाठी शासनातर्फे अवार्ड ही घोषित करण्यात आले असून महानगरपालिकेकडून भुसंपादन अधिकारी यांच्याकडे रक्कम ही जमा करण्यात आलेली आहे. मग आजपर्यंत भुसंपादन का करण्यात आलेले नाही ? खुलासा करण्यात यावा व भुसंपादन कधी करण्यात येईल ही माहिती देण्यात यावी. | औरंगाबाद शहराचा मंजुर विकास योजने अंतर्गत जालनारोड ते इंदिरानगर बायजीपुरा मार्ग टाकळकर सोसायटी ६० फुट रुंद रस्त्यामधील ॲपेक्स हॉस्पीटल ते इंदिरानगर बायजीपुरा या ६० फुट रुंद रस्त्याचे भुसंपादन प्रकरणी विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्यामार्फत अंतिम निवाडा (अवार्ड) घोषित करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी भुसंपादनाची रक्कमही जमा केलेली आहे. भुसंपादनाची कार्यवाही त्वरीत करणे बाबत विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. |

**स.नामनिर्देशित पालिका सदस्या श्रीमती सुनिता तुकाराम आऊलवार.**

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

**प्रश्न क्रमांक १४७:-**

मा.विभागीय आयुक्तांच्या निवासस्थाना समोर व भुमी अभिलेख कार्यालयाच्या शेजारी एक बिल्डींग पुर्ण होण्याच्या मार्गावर आहे त्या बिल्डींगच्या समोर ऐतिहासीक मलीक अंबर यांनी बांधलेल्या ऐतिहासीक नहरीचा भाग असलेला बंबा असून या बिल्डींगला बांधकाम परवानगी कशी देण्यात आली?

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

मा.विभागीय आयुक्तांच्या निवासस्थाना समोर असलेली मिळकत न.भू.क्र. ११३४४ फाजलपुरा ही मिळकत औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना आराखडयानुसार निवासी क्षेत्रात स्थित आहे. सदर मिळकतीस परवाना क्र.७४/२०१४-१५ दि.२९.०४.२०१४ अन्वये बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. मंजुर बांधकाम परवानगी आदेशामध्ये अट क्र.२२ नुसार भुखंडामध्ये पुरातन नहर बंब आहे त्यास कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच कायम स्वरुपी जतन करावे लागेल अशी अट नमुद करण्यात आलेली आहे. (बांधकाम परवानगीच्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.)

**प्रश्न क्रमांक १४८:-**

या बाबत भारतीय वस्तु पुरातत्व विभागाचे बांधकाम विषयक नियमांची झेरॉक्स प्रत व या बाबतचा समाधान कारक लेखी खुलासा मला सर्व दस्तावेजासह लेखी स्वरुपात देण्यात यावा.

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

याबाबत केंद्र शासनाने प्रसिध्द केलेले दिनांक १८ सप्टेंबर-२००९ चे नोटीफिकेशनची प्रत सोबत देण्यात येत आहे. तद्नुषंगाने नहर पासुन ३.०० मीटर मासीक अंतर सोडुन बांधकाम परवानगी अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. बांधकाम परवानगी धारक मंजुर बांधकाम परवानगी विसंगत बांधकाम करीत असल्याने त्वरीत कार्यवाही करणे बाबत पदनिर्देशित अधिकारी (अतिक्रमण) मनपा औरंगाबाद यांना दि.११.०३.२०१५ व ०७.०७.२०१५ रोजी कळविण्यात आलेले आहे. तसेच तहसिलदार, औरंगाबाद यांनी सुध्दा दि.१०.०४.२०१५ अन्वये कळविलेले आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

**प्रश्न क्रमांक १४९:-**

सलीम अली सरोवरासमोर व मौलाना आझाद संशोधन केंद्राच्या बाजुला ऐतिहासीक दरवाज्याच्या बाजुला कंपाउंड वॉल तोडुन तेथून एक अनधिकृत रस्ता पहाडामागील वस्तीकडे जाण्यासाठी बनविण्यात आला असून याकडे मनपाच्या प्रशासकीय विभागाचे अजून पर्यंत लक्ष का गेले नाही?

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

प्रशासकीय विभागाशी संबंधीत असल्याने सदर पत्राची प्रत पदनिर्देशित अधिकारी (अतिक्रमण) मनपा औरंगाबाद यांना देण्यात येत आहे.

**उत्तर: कार्यकारी अभियंता वार्ड ब आणि क, महानगरपालिका औरंगाबाद**

डॉ.सलीम अली सरोवरासमोर व डॉ.मौलाना आझाद संशोधन केंद्राच्या बाजुला मनपाची खुली जागा आहे. सदरील जागेतून नागरीक वाहतुक करीत असल्याचे या विभागाच्या निदर्शनास येताच तातडीने विभागाच्या जेसीबी द्वारे ५ ठिकाणी मोठ्या नाल्या करुन वाहतुक बंद केली आहे. दक्षिणेकडील बाजुने असलेली संरक्षक भिंत, मुख्य गेट, दर्शनी भागातील मुख्य संरक्षित भिंतीची दुरुस्ती, रंगकाम इत्यादी कामाचे मा.आयुक्त महोदय यांच्या आदेशा नुसार अंदाजपत्रक तयार करुन निविदेअंतर्गत आहे. सदरील कामाचा कार्यादेश होताच सर्व परिसर सुरक्षित करण्यात येईल.

**प्रश्न क्रमांक १५०:-**

हा रस्ता व्ही.आय.पी.रोड असल्याने या रस्त्याने नेहमी वरिष्ठ अधिकारी व मंत्र्यांचे ताफे जात येत असतात,तरी सुध्दा मनपाच्या जमीनीवर झालेले अतिक्रमण मनपा प्रशासनाला दिसत नाही का? या बाबत लेखी खुलासा देण्यात यावा.

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

प्रशासकीय विभागाशी संबंधीत असल्याने सदर पत्राची प्रत पदनिर्देशित अधिकारी (अतिक्रमण) मनपा औरंगाबाद यांना देण्यात येत आहे.

**उत्तर: कार्यकारी अभियंता वार्ड ब आणि क, महानगरपालिका औरंगाबाद**

या विभागाच्या निदर्शनास प्रभागातील नागरीक वाहतुक करीत आल्याचे निदर्शनास येताच मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने या विभागातर्फे सदरील कामाचे तातडीने

अंदाजपत्रक तयार करुन निविदे अंतर्गत आहे. लवकरच काम पूर्ण करुन परिसर सुरक्षित करण्यात येईल.

**स.पालिका सदस्य श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड (प्रभाग क्रमांक-११३).**

**उत्तर: करनिर्धारक व संकलक तथा आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद.**

**प्रश्न क्रमांक १५१:-**

महानगरपालिका हद्दीत मालमत्ता कर लागला नसलेल्या मालमत्तांची एकुण संख्या किती आहे? अशा मालमत्तांना कर लावण्याची कार्यवाही विभागामार्फत किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे?

**उत्तर:** महानगरपालिका हद्दी मधील सर्व मिळकतीचे मालमत्ता करा बाबत फेर सर्वेक्षणाचे काम पुर्ण झाल्यानंतरच करापासुन वंचीत असलेल्या मिळकतींची संख्या निश्चित देता येईल. मालमत्ता करापासुन वंचित असलेल्या मिळकतींचा शोध घेवुन अशा मिळकतींना कर आकारणी करण्याचे काम वार्ड अधिकारी वार्ड अ ते फ यांच्या मार्फत हाती घेण्यात आले आहे.

**प्रश्न क्रमांक १५२:-**

जुन्या पध्दतीची घरे मातीची किंवा पत्राची इं.या ठिकाणी नवीन घरे उभारण्यात आली आहे. त्याचा तपशिल पुरवण्यात यावा व अशा आर.सी.सी.घरांना सुधारीत दराने मालमत्ता कर आकारण्याची कार्यवाही करण्यात आली आहे का? असल्यास वर्षनिहाय तपशिल देण्यात यावा, जर अशी कार्यवाही झाली नसेल ती किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे?

मालमत्ता धारकांना बील दिल्यानंतर म.न.पा अधिनियमानुसार किती दिवसात रक्कम भरणा करावी लागते व किती दिवसानंतर शास्तीची रक्कम आकारण्या बाबत तरतुद आहे?

**उत्तर:** कर सुधारणा केलेल्या मिळकती बाबतची माहिती उद्या उपलब्ध नाही माहिती संकलीत करण्याचे काम हाती घेण्यात आले असुन पुर्ण होताच आपणास माहिती देण्यात येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची-ड चे प्रकरण-८ कराधान नियम-४१ अन्वये मालमत्ता कराच्या मागणी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम, बील दिल्याच्या दिनांकापासुन तीन महिन्याच्या आत भरावयाची असेल आणि बीलामध्ये विनिर्दिष्ट केल्या प्रमाणे दुसऱ्या सहामाही कराची रक्कम, प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबर पुर्वी भरावयाची असेल, आणि जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रक्कमेचा भाग या व्यतिरिक्त, त्यांने ज्या दिनांका पर्यंत असा कर भरावयाची होता. त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा करच्या २% इतकी रक्कम शास्ती म्हणुन भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पुर्ण रक्कम देई पर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असल्याचे चालु राहील. अशी नियमात तरतुद आहे.

**प्रश्न क्रमांक १५३:-**

गुंठेवारी कायद्यानुसार फक्त २००१ पूर्वी झालेली घरे नियमित करण्याची तरतुद आहे प्रत्यक्षात त्यानंतरही ही मोठया प्रमाणात गुंठेवारी वसाहती म.न.पा.हद्दीत वाढल्या आहेत. २००१ नंतर गुंठेवारी वसाहतीत किती घरे आहेत? व अशा घरांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ अ नुसार कर आकारणी शास्तीसह केलेली आहे काय? असल्यास त्याची वर्षनिहाय माहिती देण्यात यावी व नसल्यास त्याची कारणे सभागृहास देण्यात यावी.

**उत्तर:** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम क्र.२६७ अ नुसार मागील तीन वर्षात आकारण्यात आलेल्या शास्ती सह कर आकारणी केलेल्या मालमत्ताची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | शास्ती सह कर आकारणी संख्या | कर योग्य मूल्य रु. | मालमत्ता कर रु. |
|---|---|---|---|---|
| १. | २०१२-२०१३ | ३२८१ | १,७४,५८,९८६/- | ३,००,३६,८९८/- |
| २. | २०१३-२०१४ | १७९० | ८४,२८,२७४/- | १,३७,५१,८१८/- |
| ३. | २०१४-२०१५ | १५३५ | ६८,३५,९६४/- | १,०३,९२,९९८/- |

**उत्तर: सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १५४ | सन १९८२ ते आजपर्यंत मौजे गारखेडा परिसरातील विकास आराखडयानुसार आरक्षणाने बाधित मालमत्ताची यादी सदर मालमत्तांची भुसंपादन केल्याचा तपशील, त्यांना देण्यात आलेला मोबदला, (T.D.R.,F.S.I.,रोख रक्कम स्वरुपात) आरक्षणाने बाधित मालमत्ताचे भुसंपादन न झालेल्या मालमत्ताची यादी तसेच आरक्षणाने बाधीत झालेल्या मालमत्ताचे पी.आर.कार्ड अथवा सातबाऱ्यात नोंद घेण्यात आली आहे काय? असल्यास किती मालमत्ताची नोंद घेण्यात आलेली आहे? | मौजे गारखेडा परिसरात विकास आराखडयानुसार आरक्षणाने व डी.पी.रस्त्याने बाधीत मालमत्तांचे भुसंपादन केल्याबाबत उपलब्ध अभिलेखानुसार खालील प्रमाणे संचिका आढळुन येत आहे. (१) मौजे गारखेडा स.नं.६१ मधील १५ व १८.०० मीटर रुंद रस्ता (२) मौजे गारखेडा न.भू.क्र.१५१८६ व्हॅलूयशन फाईल (३) मौजे गारखेडा स.नं.५१ मधील २४.०० मी.रुंद रस्ता. (४) मौजे गारखेडा खिंवसरापार्क ते श्रीकृष्णनगर १८.०० मी.रुंद रस्ता. (५) मौजे गारखेडा सं.नं.८/१ साईट नं.१८१ अलका हौ.सो.(६) मौजे गारखेडा सं.नं.१६,१७ चे मुल्यनिर्धारणा बाबत (७) मौजे गारखेडा सं.नं.१/३ श्री.त्र्यंबक जाधव यांच्या मोबदल्याबाबत या प्रकरणामध्ये रितसर भुसंपादन करण्याचा प्रस्ताव असून या कार्यालयात उपलब्ध असलेल्या संचिका मधील जे दस्ताऐवज आपणास आवश्यक आहे ते प्रत्यक्ष पाहुन सुचना केल्यास ते सर्व दस्ताऐवजाचा तपशील (छायाप्रती) आपणांस उपलब्ध करुन देणे शक्य होईल. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वरुपात |
| १५५ | सन १९८२ ते आजपर्यंत गारखेडा परिसरातील विकास आराखडयानुसार डी.पी.रोडने बाधीत मालमत्तांची यादी, सदर मालमत्तांचे भुसंपादन केल्याचा तपशील,त्यांना देण्यात आलेला मोबदला ((T.D.R.,F.S.I.,रोख स्वरुपात) डी.पी.रोडने बाधित मालमत्ताचे भुसंपादन न झालेल्या | |

| | | |
|---|---|---|
| | मालमत्तांची यादी. उपरोक्त माहिती मला स्वयंस्पष्ट लेखी स्वरुपात देण्यात यावी. | अभिलेख जतन केल्याचे उपलब्ध अभिलेखानुसार आढळुन येत नाही. तसेच टि.डी.आर.देय करणे बाबत विहीत नमुन्यात विभागाने रितसर नोंदीचे रजिस्टर ठेवलेले आहेत. त्या रजिस्टरमध्ये माहिती पाहणीकरीता एक खिडकी योजनेमध्ये संबंधीत कर्मचाऱ्याजवळ कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध आहेत.<br>ज्या मालमत्तांचे भूसंपादन करण्यात आलेले नाही. त्यांचा तपशील असणारा अभिलेख या विभागात आढळुन येत नाही. करीता एखाद्या विशिष्ट विकास योजना आरक्षणाबाबत किंवा विकास योजना रस्त्याबाबत संपूर्ण तपशील देण्याची अथवा विशिष्ट मिळकती विषयी माहिती देण्याची विचारणा केल्यास मी उपलब्ध मनुष्य बळाचा वापर करुन लवकर देणे शक्य होईल. |

**स.पालिका सदस्य श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख (प्रभाग क्रमांक-६३)**

**प्रश्न क्रमांक १५६:-**

सलीम अली सरोवर येथील (STP) पाणी फिल्टर करण्याचा प्लॉट बनवून किती वर्ष झाले व त्याच्या किती खर्च झाले व कधी चालु करणार याची पुर्ण तपशील द्यावी.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता, वार्ड ब आणि क,महानगरपालिका औरंगाबाद.**

डॉ.सलीम अली सरोवरात मंजुरी नुसार ५ द.ल.लि. क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट तयार करण्यात आला असुन यावर आतापर्यंत रक्कम रु.६.८३ कोटी खर्च करण्यात आला आहे. सदर प्रकल्प मार्च-२०१२ मध्ये सुरु करण्यात आला आहे.

**प्रश्न क्रमांक १५७:-**

स्मार्ट सिटी मध्ये औरंगाबाद शहर शामील झाले आहे. परंतु शहरात मोठ मोठ्या नाले वाहत आहे. याला भुमीगत करण्या करीता कोणती योजना आखली आहे का आखली असेल तर त्याची सुविस्तर माहिती द्यावी.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (ब/क) तथा विभाग प्रमुख (ड्रेनेज विभाग),महानगरपालिका औरंगाबाद.**

शहरातील कोणत्याही ठिकाणचा नाला भुमीगत करणे बाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन नाही परंतु औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मनपा निविदा सुचना क्रं.शअ/१११/२०१० दिनांक १२.०५.२०१० अन्वये शहरातील नैसर्गिक नाला प्रवाहाच्या दोन्ही बाजुने भिंत बांधुन नाला ट्रेनिंग करणेच्या कामाचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे करीता पीएमसी नियुक्ती बाबत निविदा मागविलेली होती.

या अंतर्गत मा.स्थायी समिती ठराव क्रं.३९ दिनांक ३०.०८.२०10 च्या मंजुरीन्वये पीएमसी म्हणुन मुंबई येथील मे.फोट्रेस इंन्फ्रास्ट्रक्चर यांची नियुक्ती मनपा जा.क्र./वॉर्ड ब व क/इवउबां/३८० दिनांक २२.१०.२010 अन्वये करण्यात आलेली होती.

सदरील नियुक्तीच्या अनुषंगाने संबंधीत पीएमसी यांनी महानगरपालिकेस त्यांचे कडील दिनांक १०.०५.२०१२ च्या पत्रान्वये Approcach Paper सादर केलेला होता. परंतु त्याच वेळेस महानगरपालिकेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गतच मलनिःसारण बाबतचा प्रकल्प प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदरील प्रस्तावास मंजुरी मिळण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची आर्थिक क्षमता पाहता तसेच शहरातील प्रस्तावित मुख्य मलनिःसारण वाहीन्या हया नाल्यातुन टाकण्यात येणार असल्याने जो पर्यंत मुख्य मलनिःसारण वाहीन्यांची कामे होणार नाहीत तो पर्यंत नाला ट्रेनिंगचा प्रकल्प प्रस्ताव शासनास सादर करणे संयुक्तीक नसल्याने नाला ट्रेनिंग बाबतचा सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात आलेला होता.

सदरील नाला ट्रेनिंग बाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत सादर करणे करीता प्रकल्पाचे नियुक्त ऐीएमसी मे.फोट्रेस इंन्फ्रास्ट्रक्चर मुंबई यांना सत्वर सुचना करण्यात येणार आहे.

**प्रश्न क्रमांक १५८:-**

एम.जी.एम.शेजारील उद्यान सिडको ने हस्तांतर केले आहे का केले असेल तर त्याच्यावर आजपर्यंत किती खर्च केले आहे व त्याच्या विकास करण्याचा आरखडा तयार केला आहे का?केला असेल तर त्याचे पेपर सहीत माहिति दयावी व केला नसेल तर का नाही केला याची माहिती दयावी.

**उत्तर:- उपआयुक्त (मालमत्ता),महानगरपालिका औरंगाबाद.**

सन-२००६ मध्ये सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले. हस्तांतरच्या वेळी एम.जी.एम. शेजारील नर्सरीची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली आहे.

**उत्तर:- उद्यान अधिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद.**

एम.जी.एम. शेजारील नर्सरी सिडकोने सन-२००६ मध्ये महानगरपालिकेकडे हस्तांतर केलेली आहे. सदर नर्सरीवर आज पर्यंत विकास कामावर कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

**प्रश्न क्रमांक १५९:-**

सेंटर नाका येथील भाजी व मटन मार्केट करीता महानगरपालिका जी बी मध्ये कधी प्रस्ताव पास झाले होते. प्रस्ताव पास झाले होते तर त्याची अंमलबजावणी का करण्यात आली नाही? व कधी अंमल करणार? याची पेपरासहीत माहिती द्यावी.

**उत्तर: अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १६०:-**

मनपा हद्दीत व मनपाचे औरंगाबाद शहरात पार्कींग झोन किती आहे. व त्यापासुन महसुल किती मिळते व कोणते कंत्राट दाराला कंत्राट दिला आहे का त्याच्याकडे किती थकबाकी आहे? सर्व पेपर सहित माहिती द्यावी.

**उत्तर:- उपआयुक्त (मालमत्ता),महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या शहरात एकूण ६ पार्किंग वाहनतळ आहेत. त्या खालीलप्रमाणे

१. **पैठण गेटः-** सदरील वाहनतळ हे श्री विनोद सुभाष बेदमुथा यांना प्रतिमहा रु.२०,७४१/- (सेवाकरासहीत), प्रमाणे दि.२३.११.२०१४ ते २२.११.२०१५ पर्यंत दिलेले आहे. त्यांचेकडुन रु.१,४२,२२५/- चा भरणा केलेला आहे.

२. गुलमंडी, नागेश्वरवाडी, संत एकनाथ रंगमंदिर, सलिम अली सरोवर, आयसीआयसीआय बँक अदालत रोड या वाहनतळाच्या निविदा काढण्यात आल्या असून निविदा प्रक्रीया कार्यवाही अंतर्गत आहे.

**स.पालिका सदस्या श्रीमती खान सायरा बानो अजमल (प्रभाग क्रमांक-२३)**

**प्रश्न क्रमांक १६१:-**

प्रभाग क्रमांक-२३ चेलीपुरा-काचीवाडा मध्ये घनकचरा संकलणासाठी फिरते लोडिंग रिक्षा, स्कीप लोडर, घंटा गाडी व सफाई कामगार वाढवून मिळणे बाबत. माझे दि.१३.०५.२०१५ उप अभियंता यांत्रिकी विभाग यांना उद्देशुन, दि.२७.०५.२०१४ (शहर अभियंता), दि.२८.०५.२०१५ (वार्ड अधिकारी) यांना उद्देशुन दि.०३.०६.२०१५ व दि.१५.०६.२०१५ (शहर अभियंता), दि.१५.०६.२०१५ (शहर अभियंता, यांत्रिकी विभाग),दि.१७.०६.२०१५ (वार्ड अधिकारी-अ), दि.२७.०७.२०१५ (वार्ड अधिकारी-अ) व दि.१२.०८.२०१५ (वार्ड अधिकारी-अ) यांना उद्देशुन लिहिलेले पत्र.

वरील पत्रे पहावे. या बाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली त्यांचे उत्तर सर्वसाधारण सभेत देण्यात यावे. कार्यवाही झालेली असली असेल तर काय कार्यवाही करण्यात आली? नसली तर का करण्यात आली नाही? याचा तपशील देण्यात यावा. कार्यवाही न करण्याचे कारण काय आहे? कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली?

**उत्तरः- उपआयुक्त (प्र) तथा घनकचरा व्यवस्थापक कक्ष,महानगरपालिका औरंगाबाद.**

प्रभाग क्र.२३ चेलीपुरा,काचीवाडा करीता फिरते लोडिंग रिक्षा, स्कीप लोडर, घंटा गाडी व सफाई कामगारांची माहिती खालील प्रमाणे देण्यांत येत आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्यांची संख्या | पद | प्रभागाचे नांव | मनपा वाहने | खाजगी वाहने | हुकलोडर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ०१ | वाहन चालक | २३ चेलीपुरा | ०१ मोठी ट्रक | ०१ आटो रिक्षा | ०१ | |
| | ०१ | जवान | | | | | |
| | ११ | पु.मजुर | | | | | |
| | ०६ | स्त्री मजुर | | | | | |
| **एकुण** | १८ | | | ०१ | ०१ | ०१ | |

लोडिंग रिक्षा, स्किप लोडर, घंटा गाडी, इ.देणे बाबत यांत्रिकी विभाागास कळविण्यांत आलेले आहेत. तसेच प्रभाग क्र.२३ मधील शहागंज भाजी मंडी, दररोज साफ सफाई होईल याची काळजी घेण्यात येईल व आपल्या प्रभागात साफ सफाईकडे विशेष लक्ष देयांत येईल.

**उत्तरः- उपअभियंता (यांत्रिकी),महानगरपालिका औरंगाबाद.**

घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी वार्ड अधिकारी अ यांच्या मागणी प्रमाणे खालील प्रमाणे यंत्रणा देण्यात आलेली आहे.

| स्कीप लोडर | हुक लोडर | मनपा ट्रक/ टिप्पर्स | खाजगी टिप्पर्स/ ट्रॅक्टर्स | मोठी वाहने | मनपा ॲटोटिप्पर्स/ हॉपर्स | खाजगी ॲटो लोडींग | एकुण ॲटोटिप्पर्स /लोडींग/ हॉपर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1<br>10 बिन्स (4.5 घ.मी.) | 2<br>9 कंटेनर (9 घ.मी.) | 6 | 2 टिप्पर<br>2 ट्रॅक्टर | 13 | 08<br>दुपारपाळी -1 | 12 | 20<br>दुपारपाळी-1 |

सदरील वाहने/मशीनरीचा प्रभाग निहाय आवश्यकते प्रमाणे वापर करण्याचे नियोजन वार्ड कार्यालया मार्फत करण्यात येते.

आपण दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने अतिरिक्त हायड्रोलिक हॉपर्स (ॲटो) उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संचिका सादर करण्यात येवून, ६० नग हॉपर्स खरेदी करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली आहे. मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार निधी उपलब्धतेसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच स्कीपलोडर्स खरेदी साठी देखील प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असुन मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. घेटागाड्या व इतर आवश्यक मशिनरी खरेदीसाठी महानगरपालिकेच्या आगामी बजेट मध्ये रुपये १० कोटी तरतुद ठेवणे बाबत मा.स्थायी समिती सभेस विनंती पत्र सादर करण्यात आलेले आहे.

आपल्या पत्राच्या अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात येत असुन, निधी उपलब्ध होताच मागणी करण्यात आलेली अतिरिक्त मशिनरी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**<u>उत्तर:- वार्ड अधिकारी (वार्ड-अ) ,महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

| अ.क्र | कर्मचाऱ्यांची संख्या | पद | प्रभागाचे नांव | मनपा वाहने | खाजगी वाहने | हुकलोडर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 02 | वाहन चालक | 23 चेलीपुरा | 01 मोठी ट्रक | 01 आटो रिक्षा | 01 | |
| | 01 | प्र.जवान | | | | | |
| | 11 | पु.मजुर | | | | | |
| | 06 | स्त्री मजुर | | | | | |
| | निरंक | स्विपर | | | | | |
| **एकुण** | **19** | | | | | | |

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य श्री.अब्दुल ताहेर अब्दुल करीम.</u>**

**<u>प्रश्न क्रमांक १६२:-</u>**

आरिफ कॉलनी ते जटवाडा रोड या रस्त्याकरीता कृषि विद्यापीठाचा हिमायत बागातुन जाण्याकरीता अडचण होती व ती अडचण आता दुर झाली आहे असे प्रेस रिपोर्टवरुन दिसते. हा रस्ता झाल्यास जटवाडा रोडकडील लोकांची फार सोय होईल. हा रस्ता होण्याकरीता आता काय अडचणी आहेत?

**उत्तरः सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

सदर रस्त्याने बाधीत क्षेत्राचे भूसंपादन झालेले नाही. भूसंपादनाचा प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे आर्थिक नियोजन करुन पाठविण्यात येईल.

**प्रश्न क्रमांक १६३:-**

हेडगेवार मेमोरियल पब्लिक स्कुल, सातारा परिसर ही सेवाभावी संस्था आहे. या संस्थेने मराठवाडयातील आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांचे निराश्रीत २०० मुले एका छताखाली आणले आहेत व त्यांची संस्थेच्या खर्चाने सर्व व्यवस्था, शिक्षणासहीत करीत आहे. त्यांचे समोर मुलांचे खेळांकरीता प्ले ग्राऊंड व पिण्याचे पाण्याची अशा दोन मोठ्या समस्या आहेत. याबाबतीत महानगरपालिका त्यांना काय मदत करु शकते?

**उत्तर:- उपआयुक्त (मालमत्ता),महानगरपालिका औरंगाबाद.**

सातारा देवळाई परिसराचा नुकताच महानगरपालिकेत समावेश झालेला आहे. तथापि, अद्याप तेथील खुल्या जागा महानगरपालिकेच्या नांवे झालेल्या नाहीत. करीता याबाबतीत महानगरपालिकेला मदत करणे शक्त नाही.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),महानगरपालिका औरंगाबाद.**

आपण अपेक्षिल्यानुसार सदर संस्थेला कन्सेशनर यांचेकडुन शुल्क भरून टँकरद्वारे पाणी घेता येईल.

**प्रश्न क्रमांक १६४:-**

श्रुती कुलकर्णी सारख्या त्रस्त मुलीने आत्महत्या करु नये म्हणून महानगरपालिका त्यांचे करीता नगर सेवक म्हणून काय करु शकते?

**उत्तरः अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १६५:-**

रस्त्यावर माल विक्रेते यांचे (Protection of Livelihood Regulation of Street Venders Act 1914) खालील अधिकार व सुप्रिम कोर्टाने महाराष्ट्र एकता हॉकर युनियन वि.म्युनिसीपल कॉपोरेशन मध्ये दिलेल्या आदेशाचे मनपाने काय पालन केले आहे?

**उत्तर:- उपआयुक्त (मालमत्ता),महानगरपालिका औरंगाबाद.**

**राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ अंमलबजावणी बाबत**

संदर्भः शासन निर्णय क्र.राफेधो-२०१३/प्र.क्र.३२/नवि-३४ दि.२१.१०.२०१३

औरंगाबाद शहरात राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी संदर्भाने उपरोक्त संदर्भीय शासन आदेशानुसार सदस्य नियुक्तीची खालील प्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

**प्रवर्ग-१ सदस्य नियुक्ती बाबत.**

प्रवर्ग-१ : स्थानिक प्राधीकरण, नियोजन प्राधीकरण पोलीस व इतर प्रवर्ग संख्या पुर्ण होऊन तसे आदेश पारित झालेले आहेत. सदरील आदेशाची प्रत (जा.क्र.मनपा/मामअ/१५५७/२०१४ दिनांक २९.०४.२०१४) यासोबत जोडण्यात आलेली असुन त्यानुसार खालील प्रामणे सदस्य नियुक्ती झालेली आहे.

१. अध्यक्ष - आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.
२. सदस्य - पोलिस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद.
३. सदस्य - सहाय्यक संचालक नगर रचना, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.
४. सदस्य - उपआयुक्त (सि), औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

५. सदस्य - सहाय्यक पोलीस आयुक्त, (वाहतुक) शाखा, औरंगाबाद.

६. सदस्य - आरोग्य अधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

**प्रवर्ग-२, प्रवर्ग-३, प्रवर्ग-४ सदस्य नियुक्ती बाबत.**

फेरीवाला समिती प्रवर्ग-२,प्रवर्ग-३,प्रवर्ग-४ करीता दि.१५.१२.२०१४ रोजी वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन देण्यात आले, त्यानुसार आवश्यक ती सदस्य संख्या पुर्ण न झाल्यामुळे दि.१२.०३.२०१५ रोजी वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन देऊन अर्ज मागविण्यात आले आहे.

**प्रवर्ग-२ : फेरीवाला संघटनाचे प्रतिनिधी एकुण सदस्य संख्या १२.**

**प्रवर्ग-३ : रेसिडेंट वेलफेअर असोसिएशन समुदाय आधारीत संघटना (Community Base Organization) एकुण सदस्य संख्या ६.**

**प्रवर्ग-४ : इतर नागरी (सिव्हील) संस्था संघटना जशा एन.जी.ओ. व्यावसायीक समुहातील प्रतिनिधी (जसे वकील, डॉक्टर, नगर रचनाकार, आर्किटेक्ट, व्यापारी, व वाणिज्य समुहाचे प्रतिनिधी, बँकेचे प्रतिनिधी) इत्यादी. एकुण सदस्य संख्या ६.**

सदरील प्रकरणी प्राप्त अर्जाची संख्या पाहता सोडत पधीतीने सदस्य निवड करावयाची असून मा.पोलीस आयुक्त यांची बैठकीची वेळ निश्चित करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**स.पालिका सदस्या श्रीमती सरिता अरुण बोर्डे (प्रभाग क्रमांक-७१)**

**प्रश्न क्रमांक १६६:-**

मा.मुख्य लेखाधिकारी यांना मी दिनांक २५.०८.२०१५ रोजी पत्र देऊन औरंगाबाद महानगरपालिके तर्फे वाटप करण्यात येणारे धनादेश वाटप बाबत माहिती मागितलेली होती परंतु आज पर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. जेव्हा मनपा लेखा विभागात देण्यात येणारे प्रत्येक धनादेशाची नोंदणी केली जाते त्यामुळे नोंदणी रजिस्टरची प्रत मला का देण्यात येत नाही हे समजत नाही. करीता या बाबतचा खुलासा सर्वसाधारण सभेत करण्यात यावा.

**उत्तर: अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १६७:-**

माझे वार्ड क्र.७१ मध्ये भिमपूरा येथे मनपाची सार्वजनिक खुली जागा असुन या जागेवर खेळाचे मैदानासाठी आरक्षण आहे परंतु या ठिकाणी तेथील काही रहिवासीयांनी त्या जागेवर अतिक्रमण करुन टिनशेड बांधुन राहत होते परंतु आता त्यांनी त्या जागेवर पक्क्या स्वरुपात सिमेंटच्या मोठ्या विटामध्ये बांधकाम केलेले आहे सध्या आणखीन रुम बांधुन त्यांचे बांधकाम चालु आहे या बाबत मी प्रशासकिय विभागात १७.०८.२०१५ रोजी तक्रार केलेली आहे. परंतु संबंधित विभागाने कोणती ही दखल घेतलेली नाही त्यामुळे अतिक्रमणास प्रोत्साहन मिळत आहे.

करिता मी दिलेल्या पत्रा बाबत का कार्यवाही करण्यात आलेली नाही?मनपा प्रशासन अतिक्रमणास प्रोत्साहन देत आहेत का? याचा खुलासा सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात यावा.

**उत्तर: अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १६८:-**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मनपा विद्युत पोल लावलेले आहे त्या पोलवर मनपा किंवा इतर कंपनीची केबल आहे याचा खुलासा करावा तसेच मनपाची केबल नसेल तर मनपा त्या केबल धारकांकडुन कर वसुली करते का? नसता त्या केबल मुळे अनेक ठिकाणी केबल तुटल्याने रस्त्यावर पडून त्याच्यामुळे नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण होतो.

जर सदरील केबलधारकांकडुन कर वसुली होत नसेल तर केबल त्वरीत मनपाच्या पोलवरुन काढुन टाकण्यात यावे किंवा त्यांनी स्वत:पोल लावुन त्यावर केबल टाकावी व मनपाने त्याच्याकडून कर वसुल करावा. अशा प्रकारे कार्यवाही प्रस्तावित करता येते का? यामुळे मनपास आर्थिक फायदा होऊ शकेल याचा सविस्तर खुलासा संबंधित विभागाने करावा.

**उत्तर: अप्राप्त.**

**स.पालिका सदस्य श्री.रमेश भानुदास जायभाय (प्रभाग क्रमांक-५९)**

**उत्तर: आस्थापना अधिकारी-१, महानगरपालिका औरंगाबाद.**

**प्रश्न क्रमांक १६९ ते १७२:-**

| प्र.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १६९ | मुख्य लेखाधिकारी यांच्या औरंगाबाद महानगरपालिकेवरील प्रतिनियुक्तीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कोणत्या कलमान्वये ठराव क्रमांक ७९५ दिनांक २०.०६.२०१२ नुसार सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली होती? | तत्कालीन मा.आयुक्त यांनी मान्यता दिल्यामुळे मुख्य लेखाधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीस मान्यता देणेबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात आला होता. |
| १७० | दिनांक २०.०६.२०१३ नंतर पुढील (प्रतिनियुक्ती) सर्वसाधारण सभा (नियुक्ती प्राधिकारी) यांची मुदतवाढीस मान्यता का घेण्यात आली नाही? कोणत्या कारणास्तव? | प्रतिनियुक्तीवर अधिकारी नेमणे ही बाब शासन अधिकारातील आहे. |
| १७१ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार औरंगाबाद शहरासाठी सर्वसाधारण सभा हे शासन आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या संमती शिवाय, मान्यते शिवाय मुख्य लेखाधिकारी यांची प्रतिनियुक्ती विधी ग्राह्य आहे काय? | मुख्यलेखाधिकारी या पदावर शासनाने बदलीने पाठविलेले अधिकारी ज्या दिनांकापर्यंत महानगरपालिकेत कार्यरत आहेत तोपर्यंत त्यांची नियुक्ती विधीग्राह्य राहील. |
| १७२ | मुख्य लेखाधिकारी यांच्या महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीस अधिनियमांचे कलम ४५(ब) नुसार असल्याचे सदस्यास दिलेल्या लेखी उत्तरात आस्थापना शाखेने कळविले आहे त्यानुसार विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहाची मान्यता आहे काय? त्याची प्रत,अधिसुचना गॅझेट उपलब्ध करुन द्यावे, नसल्यास अशी अधिसुचना प्रसिध्द झालेली नसतांना सदस्यास चुकीची माहिती देवुन हक्कभंग करणाऱ्या विरुध्द मा.आयुक्त यांनी काय कारवाई केली? | सदर बाब ही शासनाशी संबंधीत आहे. प्रतिनियुक्तीने भरावयाची पदे अधिसूचित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे. |

**<u>स.पालिका सदस्य श्री.गंगाधर नामदेव ढगे (प्रभाग क्रमांक-४९)</u>**

**<u>प्रश्न क्रमांक १७३:-</u>**

महानगरपालिकेने वॉटर युटीलिटी कंपनी सोबत करार करतांना करारनाम्यातील कोणत्या अटी क्रमांकानुसार पाणी पट्टी वसुलीचे काम सोपविण्यात आले आहे? पाणी पट्टी वसुली करण्याकरीता त्यांना किती टक्के कमिशन देण्याचे ठरले आहे, तसेच वॉटर युटीलिटी कंपनीकडे पाणी पुरवठा हस्तांतरीत केल्यानंतर आतापर्यंत किती पाणी पट्टी वसुली झाली व त्यांचे कमिशन वजा जाता मनपा फंडात त्यांनी किती व केंव्हा-केंव्हा रक्कम जमा केली?

**<u>उत्तर: मुख्यलेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

कन्सेशन ॲग्रीमेंट मधील कलम २.१ (k) नुसार पाणीपट्टी वसुलीचे काम महानगरपालिकेच्या वतीने कन्सेशनर करीत आहे. पाणीपट्टी संदर्भाने कन्सेशन ॲग्रीमेंटमध्ये कलम २२ तसेच परिशिष्ट VIII व परिशिष्ट XVI मध्ये तरतुद आहे. तसेच महानगरपालिकेची पाणी पुरवठा व पाणीपट्टी उपविधी शासनाने मंजुर केलेली असून ही उपविधी कन्सेशन ॲग्रीमेंटचे परिशिष्ट III चा भाग आहे.या तरतुदींनसार कन्सेशनरमार्फत पाणीपट्टी संदर्भाने कार्यवाही सुरु आहे. कन्सेशनर करीत असलेल्या चालू मागणीतील पाणीपट्टी वसुलीपैकी कन्सेशन ॲग्रीमेंटमधील परिशिष्ट XVI मध्ये दिलेल्या दराने कन्सेशनर यांना पाणीपट्टीची रककम देय असून उर्वरित पाणीपट्टीची रक्कम ही महानगपालिकेची आहे. पाणीपट्टीची रक्कम ही महानगरपालिकेच्या स्वतंत्र बँक खात्यामध्ये जमा होते.

योजना हस्तांतरणापूर्वी नागरीकांकडे असलेली पाणीपट्टीच्या थकबाकी रकमेची वसुली कन्सेशनर करीत असुन फक्त थकबाकीपोटी वसूल होणाऱ्या रकमेवर कन्सेशनर यांना इन्सेंटीव्ह देण्याबाबत कन्सेशन ॲग्रीमेंटचे परिशिष्ट VIII मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

| **अ.क्र** | **वसुल केलेली थकबाकीची रक्कम** | **इन्सेंटीव्ह** |
|---|---|---|
| १ | ५०% पर्यंत | १५% |
| २ | ५०% - ७५%पर्यंत | २०% |
| ३ | ७५% पेक्षा जास्त | ३०% |

प्रकल्पाचे स्वतंत्र लेखापरिक्षक यांचे अहवालानुसार योजना हस्तांतरणापासुन म्हणजेच १ सप्टेंबर-२०१४ पासून जुन-२०१५ पर्यंत चालु मागणी व थकबाकी अंतर्गत पाणीपट्टीपोटी रुपये २०,९६,३७,६५७/- एवढी रक्कम महानगरपालिकेच्या बँक खात्यावर जमा झालेली आहे. त्यापैकी रुपये १२,०८,३३,६४३/- एवढी रक्कम महानगरपालिकेच्या हिश्याची असून उर्वरित रक्कम रुपये ८,८८,०४,०१४/- एवढी रक्कम कन्सेशनर यांच्या हिश्याची आहे. त्याअंतर्गत कन्सेशनर यांनी हस्तांतरणापूर्वी असलेल्या पाणीपट्टी थकबाकीपोटी जमा केलेल्या रकमेवर म्हणजेच रुपये ४,७१,९२,०१६/- वर रुपये ७०,७८,८०२/- एवढा इन्सेंटीव्ह कन्सेशनर यांना देय आहे.

**<u>प्रश्न क्रमांक १७४:-</u>**

नगर रचना विभागात वर्षानुवर्षे कार्यरत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कार्यरत असलेल्या इतरत्र बदल्या होऊन ही परत ते कर्मचारी त्याच विभागात का आले? त्यांच्या ऐवजी त्या विभागात महानगरपालिकेत सक्षम अधिकारी नाहीत का? या कर्मचाऱ्यांनी चुकीच्या बांधकाम परवानग्या दिल्यामुळे हर्सुल जेल, मकबराच्या पाठीमागचा एरिया, मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन परिसर या भागामध्ये नागरीकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे,नागरीक बेघर झाले आहेत त्यामुळे

नगर रचना विभागातील अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर प्रशासकीय कायदेशीर कार्यवाही करण्यात का येत नाही?

**उत्तर: सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद.**

हर्सुल जेल परिसरातील गट क्र.२१० हर्सुल चे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तर बीबी का मकबरा पाठीमागील एरिया, मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन परीसर या भागातील जी बांधकामे तोडण्यात आली त्यांना नगर रचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देण्यात आलेली नव्हती.

**उत्तर: आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद.**

नगर रचना विभागातील कर्मचाऱ्यांच्या कर्तव्य कालावधीचा आढावा घेवून यथोचित कार्यवाही करण्यात येईल. तथापि, काही महत्त्वाच्या विभागामध्ये कर्मचाऱ्यांची क्षमता व ज्ञान याचा विचार करुनच त्यांचेकडूनच कामकाज करुन घेणे उचित असते.

**स.पालिका सदस्य श्री.गोकुळ संपतसिंग मलके (प्रभाग क्रमांक-३५)**

**प्रश्न क्रमांक १७५:-**

नारेगाव येथील डेपो संदर्भात मा.उच्च न्यायालय यांनी आपणास काही आदेशीत केलेले आहे का? केलेले असेल तर त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर: अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १७६:-**

वॉर्ड क्र.३५ नारेगाव येथे मागील ३० वर्षापासून एक ही घरकुल योजनेचे काम का झाले नाही याचे कारण काय? याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर :- कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका औरंगाबाद.**

घरकुल योजनेच्या सर्व्हेक्षणाचे काम प्रकल्प विभागमार्फत करण्यात येते. सर्व्हेक्षणानुसार नारेगाव विभागात बी.पी.एल. च्या ५७ व ए.पी.एल.च्या ३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

वर नमुद केलेले सर्व लाभार्थी हे घोषित झोपडपट्टीच्या बाहेर वास्तव्य करतात. रमाई आवास घरकुल योजनेच्या शासनाने दिलेल्या निर्देशानुसार लाभार्थ्यांचे वास्तव्य करीत असलेल्या जागेचा ७/१२ चा उतारा किंवा पी.आर.कार्ड आवश्यक आहे. सर्व लाभार्थ्यांकडे उपरोक्त कागदपत्रांची चौकशी केली असता, त्यांचेकडे कागदपत्र उपलब्ध नाहीत. रमाई आवास योजनेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता केल्यास त्यांना लाभ देण्यात येईल.

**प्रश्न क्रमांक १७७:-**

स्लम झोपडपट्टी घोषित झालेल्या वस्तीला शास्ती (टॅक्स) लावता येते का? याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर: अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १७८:-**

नारेगाव येथील कचरा डेपो संदर्भात काय उपाय योजना केली आहे?

**उत्तर :- बीओटी कक्ष प्रमुख, महानगरपालिका औरंगाबाद**

औरंगाबाद शहरातील तीन दिशेने असलेल्या मुख्य रस्ते (१) जालना रोड व त्याच्या परिसरातील जागा पाहण्यात आली परंतु या दिशेला चिकलठाणा येथे औरंगाबाद विमानतळ असल्याने कायद्याने तेथील जागा अंतिम करण्यात आली नाही. (२) अजिंठा हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे राष्ट्रीय पर्यटन स्थळ आहे व हर्सुल येथे औरंगाबाद शहराचा पाणी पुरवठा तलाव आहे.

त्यामुळे या परिसरातील जागा अंतिम करणे शक्य झाले नाही. मुंबई रोडवर प्रसिध्द दौलताबाद किल्ला तसेच औरंगाबाद मुंबई राज्य महामार्ग असल्याने या दिशेनेही जागा अंतिम करण्यात आली नाही. सर्व बाबींचा विचार करून मौजे करोडी ता.जिल्हा औरंगाबाद मौजे तिसगाव, मौजे गांधीली, मौजे नायगाव, मौजे लायगाव,मौजे पोखरी, मौजे आडगाव, मौजे मिटमिटा इत्यादी शासकीय जमीनीची मागणी शासनाकडे करण्यात आली होती. परंतु स्थानिक नागरिकांनी केलेल्या विराधामुळे व इतर कारणांमुळे सदर जागा मनपास प्राप्त झाली नाही.

तसेच खाजगी जागा घेणे व विकास करणेसाठी तिसऱ्या वेळेस निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात औरंगाबादच्या चारही बाजुच्या जमीनी निविदाधारका यांनी सदर प्रकल्पासाठी प्रस्तावित केल्या होत्या. त्यामध्ये मौजे चौका, सावंगी, नायगांव, जटवाडा, वडखा, जोगवाडा, रसुलपूर, वडगाव, माहोली, गांदेली, सिंदुन बिंदुन, मुस्तफाबाद, करोडी, जांभाडा, लायगाव ईत्यादी जागेचा समावेश होता. दोन ठिकाणची जागा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची नियमावली MSW-2000 च्या अधिनियमाप्रमाणे योग्य होती व त्यासाठी संबंधीत खात्याकडून ना हरकत प्रमाणपत्र हस्तगत करण्याची कार्यवाही सुध्दा करण्यात आली होती. परंतु ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने सर्व प्रस्ताव रद्द करावे लागले.

तथापि, नवीन कचरा डेपोसाठी औरंगाबाद शहराच्या चारही बाजुंना जागा मिळणेसाठी प्रयत्न चालु आहे. यापुर्वी काही जागांसाठी शासनाच्या विविध विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त होतात तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व मा.विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर देखील संबंधीत उपलबध जागांबाबत होकार दर्शविण्यात येतो. परंतु त्या जागेस संबंधीत ग्रामपंचायत ना हरकत देत नाही म्हणुन पुढे कारवाई प्रलंबित आहे. मो.आडगाव या ठिकाणी संबंधीत ग्रामपंचायत यांनी नाहरकत न दिल्यामुळे तेथील प्रस्ताव प्रलंबित आहे. तसेच मो.तिसगाव व मो.पोखरी या ठिकाणच्या उपलब्ध जागांसाठी इतर शासकीय कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र उपलब्ध असूनही ग्रामपंचायत यांनी नाहरकत प्रमाणपत्र न दिल्यामुळे पुढील कार्यवाही प्रलंबित आहे. मागील तीन ते चार वर्षापासून पाठपुरावा करूनही संबंधीत ग्रामपंचायत यांची नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त न होणे हा मुख्य अडथळा असल्याने प्रकरणी कार्यवाही प्रलंबित आहे .

**प्रश्न क्रमांक १७९:-**

वॉर्ड क्र.३५ नारेगाव येथे रोज औषध फवारणी का होत नाही? याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर: अप्राप्त.**

**स.पालिका सदस्य श्री.राजु रामराव शिंदे (प्रभाग क्रमांक-३८)**

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (ब/क) तथा विभाग प्रमुख (ड्रेनेज विभाग),महानगरपालिका औरंगाबाद.**

**प्रश्न क्रमांक १८० ते १८२:-**

| प्र.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १८० | जे भुमीगत गटार योजनेतील चालू असलेल्या कामाची P.M.C. कोणती आहे? त्या P.M.C. ने पाईपची गुणवत्ता कोणत्या प्रमाणीत कंपनीकडून तपासणी केली आहे | १. शहरातील भुमीगत गटार योजने करीता महानगरपालिकेने रितसर कार्यवाही अंती/मा.सक्षम समितीच्या मंजुरीन्वये पीएमसी म्हणुन मे.फोट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर मुंबई यांची नियुक्ती मनपा कार्यादेश क्रं/वॉर्ड ब व क |

| | | |
|---|---|---|
| | की नाही? त्याची सविस्तर माहिति देण्यात यावी. | /इवउबां/३८२/२०१० दि.२२.१०.२०१० अन्वये करण्यात आलेली आहे.<br>२. शहरात टाकण्यात येत असलेल्या आरसीसी व डीडब्ल्युसी एचडीपीई पाईपची तपासणी RITES व SGS या त्रयस्त शासन मान्यता प्राप्त संस्थेकडुन करुन घेण्यात येत आहे. |
| १८१ | सदरील कामाच्या ठिकाणी टाकत असलेल्या पाईपची आयुमर्यादा (लाईफ) किती असणार? व नंतर ते पाईप काढल्यास दुसऱ्या ठिकाणी पुर्नवापर करता येऊ शकतो का? | १. सदरील प्रकल्पा अंतर्गत शहरातील विविध भागात टाकण्यात येणारे डीडब्ल्युसी एचडीपीई पाईपची आयुष्य मर्यादा भारतीय मानक IS CODE 14333 नुसार ५० वर्ष गृहीत धरण्यात आलेली आहे. तसेच शहरात ४०० मी.मी.ते २००० मी.मी. व्यासाचे आरसीसी मलनिःसारण वाहीन्या टाकण्यात येत आहे. आरसीसी पाईपही सरासरी ५० वर्ष आयुमर्यादा गृहीत धरुन तयार करण्यात येत असतात.<br>२. शहरात टाकण्यात येत असलेल्या मुख्य मलनिःसारण वाहीन्या करीता जे आरसीसी पाईप टाकण्यात येत आहे. ते ३० वर्षा करीता डिजाईन केलेले आहे आवश्यकता असल्यास त्याची नियमित देखभाल दुरुस्ती करणे शक्य होईल. |

**प्रश्न क्रमांक १८२:-**

महानगरपालिकेच्या वतीने पाणी पुरवठा करण्यासाठी बऱ्याच ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करत होते. तर त्या वेळेसचे आपले दर कोणत्या निकषा प्रमाणे कि.मी.साठी निश्चित करण्यात आले होते. इन एवरेज काय पडत होते?

**उत्तर: कार्यकारी अभियंता (वार्ड अ व ड), महानगरपालिका औरंगाबाद.**

शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे अकरा पाण्याचे टँकर कार्यरत होते हे टँकर पाणी पुरवठा करण्यासाठी कमी पडत असल्यामुळे आवश्यकतेनुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर घेण्यात आलेले आहे. भाडेतत्वावरील टँकरचे दर खालील प्रमाणे होते.

| अ.क्र | टँकर क्षमता | प्रतिदिन दर (फिक्स) | प्रति कि.मी.दर |
|---|---|---|---|
| 1. | 5000 लिटर | रुपये 1530/- | रुपये 20=20 |
| 2. | 10000 लिटर | रुपये 2323/- | रुपये 26=26 |

वरील प्रमाणे मंजुर दरानुसार भाडेतत्वावरील वॉटर टँकरसाठी दरमहा सर्वसाधारणपणे रुपये ५० लक्ष खर्च येत होता.

**प्रश्न क्रमांक १८३:-**

औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या शाळेत किती बालवर्ग आहे व किती बालवर्गासाठी शिक्षक नेमण्यात आले? अशोकनगर मसनतपुर येथील महानगरपालिकेच्या शाळेत बालवर्गासाठी किती व कधीपासून शिक्षकांची नेमणुक केलेली आहे व त्याठिकाणी सद्य परिस्थीतीत बालवर्गासाठी किती शिक्षक आहे? याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर: शिक्षणाधिकारी तथा उपआयुक्त महानगरपालिका औरंगाबाद.**

१. महानगरपालिकेच्या एकुण ७८ शाळांअंतर्गत एकूण १३४ बालवाडी वर्ग आहेत. त्याकरीता सन २०१५-२०१६ करिता एकुण १२८ बालवाडी शिक्षिकांना मुदतवाड देण्यात आली आहे.
२. अशोकनगर मसनतपुर येथील बालवर्गाकरीता सन २०१४-२०१५ मध्ये श्रीमती कांता दाभाडे यांची नियुक्ती करण्यात आली होती परंतु सदर शिक्षिका या शाळेवर हजर न झाल्यामुळे त्यांना सन २०१५-१६ करीता मुदतवाढ न देता श्रीमती वंदना साळूबा सुरडकर यांची मिसारवाडी येथून अशोकनगर येथे बदली करण्यात आली आहे. तसेच श्रीमती सपना सुनिल निंबाळकर व श्रीमती ज्योती संपतराव जाधव यांना दिनांक १०.०९.२०१५ रोजी अशोकनगर मसनतपुर शाळेवर नियुक्ती देण्यात आली आहे.

**स.पालिका सदस्य श्री.गजानन भानुदास मनगटे (प्रभाग क्रमांक-७९)**

**प्रश्न क्रमांक १८४ ते १८७ :-**

**उत्तर: आस्थापना अधिकारी-१, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १८४ | कार्यालयीन परिपत्रक दिनांक ०१.११.१९९८ अन्वये प्रमुख लेखापाल हे एकच पद भरण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते. परंतु सन-१९९९ मध्ये पद भरतांना दोन पदे सरळ सेवेने का भरण्यात आले? बिंदु नामावली नुसार दुसरे पद मागासवर्गीयांसाठी भरणे आवश्यक असतांना व मागासवर्गीयाचा उमेदवार उपलब्ध असतांना मागासवर्गीय उमेदवाराची नियुक्ती न करता सर्वसाधारण प्रवर्गातून वरिष्ठ लेखा परिक्षक या पदावर नियुक्ती का करण्यात आली? | सदर प्रकरणातील संबंधीत अभिलेखे तपासून त्याबाबत कळविण्यात येईल. |
| १८५ | सदरील दोन्ही पदे सर्वसाधारण प्रवर्गाच्या उमेदवाराने भरल्यामुळे विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्गीय कक्षांनी तपासणी करून श्री.एम.एम.पाटणी यांची झालेली निवड अवैध असल्याने त्यांची निवड रद्द करून सदरील पदावर योग्य तो मागासवर्गीय उमेदवार नियुक्त करावा या संदर्भाने विभागीय आयुक्त यांनी दि.१९.१२.२००५ रोजी उपसचिव (कार्यासन-१६-ब) सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांना पत्र देऊन त्याची प्रत महानगरपालिकेस देण्यात आली होती. परंतु | सदर प्रकरणातील संबंधीत अभिलेखे तपासून त्याबाबत कळविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | श्री.पाटणी यांची वरिष्ठ लेखापरिक्षक या पदावरील नियुक्ती रद्द का करण्यात आली नाही? यास कोणते अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत? त्यांची नावे काय व त्यांच्यावर काय कार्यवाही करणार? | |
| १८६ | श्री.एम.एम.पाटणी यांना वरिष्ठ लेखापरिक्षक या पदावर नियुक्ती केल्यानंतर स्थायी समितीच्या ठरावा अन्वये त्यांची नियुक्ती भांडार लेखापाल, भांडार विभागात कोणत्या नियमाप्रमाणे करण्यात आली?जर श्री.पाटणी यांचा संवर्ग बदलण्यात आला असतांना लेखा संवर्गातील उपमुख्य लेखा परिक्षक या पदावर पदोन्नती कोणत्या नियमानुसार देण्यात आली? | सदर प्रकरणातील संबंधीत अभिलेखे तपासून त्याबाबत कळविण्यात येईल. |
| १८७ | शासनाने दिनांक २०.०४.२००७ रोजी उपमुख्य लेखा परिक्षक या पदास मंजुरी दिली. परंतु त्यामध्ये पद भरण्याची पध्दती व अर्हता नमुद केलेली नाही. औरंगाबाद महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांची निवड करणेसाठी सन-१९९४ मध्ये स्वतंत्र सेवाभरती नियम तयार केलेले आहे त्यामध्ये उपमुख्य लेखा परिक्षक या पदासाठी अर्हता निश्चीत नसतांना त्यांना उपमुख्य लेखा परिक्षक या पदावर कोणती अर्हता व भरतीची कोणती पध्दत अवलंबुन पदोन्नती देण्यात आली? व त्यांची पदस्थापना उपमुख्य लेखा परिक्षक या पदावर न करता प्रभाग अधिकारी या पदावर का करण्यात आली? शासन निर्णय दिनांक ०४.०५.२००६ अन्वये निर्देशित केल्यानुसार नियमांचा भंग होत नाही काय? यास कोणते अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत. त्यांची नावे काय आहेत?व दोषींवर प्रशासनाने काय कार्यवाही केली?व केली नसल्यास काय कार्यवाही करणार? | कार्यालयीन कामकाज व्यवस्थितपणे चालविण्याचे दृष्टीने कोणत्या अधिकाऱ्यांकडुन कोणते काम करुन घ्यावयाचे या बाबतचे प्रशासकीय अधिकार आयुक्तांना आहेत. महापालिकेत अधिकाऱ्यांची संख्या कमी असल्याने उपलब्ध अधिकाऱ्यांकडुन आवश्यक असेल त्या पदाचे कामकाज करुन घेण्यात येत आहे. |

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.